वर्ष सातवे, अंक पाचवा, जानेवारी, २०१४ मासिक अंकाची किंमत रु. पाच
वार्षिक वर्गणी रुपये १००/– (विशेषांक रु.२५/–)

# ‘स्व’–रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१३




## शारदामणि महिला विभाग रौप्यमहोत्सवी वर्ष

श्री माऊलीविश्व आयुर्वेद संशोधन केंद्र

माऊली.... एक मायेची सावली.



# श्री माऊली विश्व

## आयुर्वेद संशोधन केंद्र

१५ वर्षांची गुणवत्तापूर्व सेवा

# डॉ. विनेश चंद्रकांत नगरे

**एम.एस. (स्त्री रोग)**

**आयुर्वेद**

स्त्रियांचे सर्व आजारांसाठी
शास्त्रोक्त आयुर्वेद आणि पंचकर्म उपचार

| पुणे | मुंबई | अहमदाबाद | चिंचवड | नगर | शिरूर |
|---|---|---|---|---|---|
| सदाशिव पेठ | दादर पश्चिम | आश्रम रोड | चाफेकर चौक | सावेडी | मारूती आळी |

संपर्क : 020 24451585 / 020 64001992 / 96894 71315

Website : www.ayurvedinpcod.com Email : coolvineshnagare@gmail.com

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१३


**संपादक**
श्री. जयंत कवठेकर
**संपादकीय मंडळ**
श्री. सुनील कुलकर्णी
श्री. गणेश पवार
कु. अहिल्या धायगुडे



**दूरध्वनी संपर्क**
श्री. जयंत शंकर कवठेकर
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४
(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०
मो. : ९०११३८६३८६


किंमत रूपये ५/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/-
(विशेषांकासह)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त चेक अथवा ड्राफ्ट ‘स्व’-रूपवर्धिनी या नावाने काढावा.

## अंतरंग


- हृद्गत
- मुखपृष्ठ संकल्पना
- विशेष लेख
- शारदामणि महिला विभाग रौप्य महोत्सवी वृत्तांत
- विभागश: वार्षिक वृत्त
- आर्थिक स्थिती व आवाहन



**छपाई**
प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक ‘स्व’-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.


**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ** : श्री. विक्रांत दिघे

# 'स्व'–रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

* पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर   * श्री. प्रमोद चौधरी   * श्री. प्रतापराव पवार

### *संस्थापक सदस्य*

- *कै. पु. व. श्रॉफ*
- *कै. कृ. ल. पटवर्धन*
- *कै. कां. गि. शहा*
- *कै. दत्तोबा तांबे*
- *कै. अ. न. गोगावले*
- *श्री. श्री. शं. सामळ*
- *श्री. कृ. गो. लवळेकर*
- *श्री. रा. प. देसाई*

### *विद्यमान कार्यकारी समिती*

***अध्यक्ष***
*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

***उपाध्यक्ष***
*श्री. उदय गुजर*
*श्री. आर. ए. मेहता*
*श्री. श्रीकांत सामळ*

***कार्याध्यक्ष***
*श्री. कल्याण वर्दे*

***सहकार्याध्यक्ष***
*श्री. शिरीष पटवर्धन*
*श्री. रामभाऊ डिंबळे*

***कोषाध्यक्ष***
*श्री. कन्हैयालाल बलदोटा*

***सहकोषाध्यक्ष***
*श्री. विलास कुलकर्णी*

***कार्यवाह***
*श्री. ज्ञानेश पुरंदरे*

***सहकार्यवाह***
*श्रीमती पुष्पाताई नडे*
*श्री. विश्वास कुलकर्णी*
*श्री. अमोल उंदरे*

***सदस्य***

- श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी
- श्री. अरविंद केळकर
- श्री. विनोद बिबवे
- कु. लता टिळेकर
- कु. दीपाली पवार
- सौ. बागेश्री पोंक्षे
- प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर
- डॉ. प्रदीप आगाशे
- श्री. संजय तांबट
- डॉ. विनेश नगरे
- श्री. किशोर सोंडूर
- श्री. अविनाश जोशी
- श्री. अजय कदम
- श्री. सुनील कुलकर्णी
- सौ. मेघना अत्रे
- श्री. पराग लकडे
- ॲड. सौ. निलिमाताई गोखले


**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**

**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६०**

संपर्काचा पत्ता : – 'स्व'–रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.

दूरध्वनी : – (कार्यालय) – २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६

**PAN No. : AAATS 5461K**

**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**

भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)

ई–मेल : wardhinee@gmail.com   वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org

**धनादेश 'स्व'–रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

## 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच....

- सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था
- व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था
- आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
- विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा
- राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक 'राष्ट्रीय प्रकल्प'
- परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था
- अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.

आपल्या स्वत:च्या कर्मांमुळेच आपल्याला दु:ख सोसावे लागते. त्यासाठी इतरांना दोष देणे अयोग्य.

# हृद्गत

'कृण्वन्तो विश्वम् आर्यम् ।' हा स्वामी विवेकानंदांचा अभिप्रेत असलेला उद्घोष पुणे येथील वाड्यावस्त्यांमध्ये प्रसारित करण्यासाठी स्वामीजींच्या सार्धशतीनिमित्त संपर्क अभियानामध्ये सर्व वर्धक-वर्धिका यावर्षी संमिलित झाल्या. स्वामीजींचे प्रचोदक विचार घरोघरी जाऊन मांडताना वक्ता आणि श्रोता या दोघांनाही अंत:करणात 'जागृतीचे भावतरंग' अनुभवास येत होते.

संकल्पित योजनेप्रमाणे सर्व शाखांवर ई-लर्निंग हा उपक्रम रुजतो आहे. तसेच क्रीडा-प्रज्ञा विकसनाचा शास्त्रशुद्ध प्रयोग मूळ धरू लागला आहे. क्रीडा-कला-शालेय अभ्यास या सर्वच विषयांमध्ये कौशल्य साधून सर्वार्थाने चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व घडावे यास्तव सर्व स्तरांवरील बैठकांमध्ये रचना-योजनांचे नियोजन होत आहे. हा वर्धिनीच्या कार्यसंस्कृतीचाच एक भाग आहे. **पण हे सर्व विकसन अंततोगत्वा सामाजिक समर्पणाच्या दिशेने मार्गस्थ होण्यासाठीही काळजी घेणे हे कै. किशाभाऊंना अभिप्रेत आहे,** याचीही जाणीव सर्व कार्यकर्ता गटाला आहे. म्हणूनच दरवर्षी विंझरच्या शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी भातलावणीला जायचेच तसेच टाटा मोटर्ससारख्या कंपन्यांच्या माध्यमातून भीमाशंकर परिसरातील आदिवासी मुला-मुलींची व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे घेणे इत्यादी उपक्रमांचे संचालन युवक-युवती गट मोठ्या आत्मीयतेने करताना दिसतो आहे.

सर्व स्तरांवरील परीक्षांचे डोंगर पार करून स्पर्धा परीक्षा केंद्राचे २५ विजयी शिलेदार महाराष्ट्र शासनात कर्तबगारी गाजवण्यासाठी यावर्षी प्रवेश करत आहेत. स्वामी योगानंद शाखेचा युवक सागर काटदरे याची पाँडेचरीच्या उपजिल्हाधिकारीपदी नेमणूक झाली आहे. या आणि अशा सर्वांचा उत्साह वाढविणाऱ्या घटनांनी पुढील विद्यार्थ्यांची अधिक जोमाने परिश्रम करून यश संपादन करण्याची जबाबदारी अर्थातच वाढते आहे.

राजगुरुनगर परिसरातील दहा गावांमध्ये वर्धिनीची फिरती विज्ञान प्रयोगशाळा कार्यरत आहे. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गास मिळणारा प्रतिसादही उत्साहवर्धक आहे.

शारदामणि महिला विभागाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने अनुषंगिक विविध विषयांवरील व्याख्याने, कार्यशाळांचे आयोजन केले जात आहे. या विभागाच्या गत २५ वर्षांतील कार्याच्या अवलोकनार्थ आधीच्या कार्यवृत्तांतील काही लेखनाचे पुनर्मुद्रण या अंकात हेतूत: केले आहे. परमवात्सल्यमूर्ती शारदामातांची अमृतवचने या निमित्ताने अंकाच्या प्रत्येक पानावरील तळटीपांमध्ये उद्धृत केली आहेत.

आळंदीजवळील चऱ्होली व नीळकंठेश्वराजवळील कातवडी येथे वर्धिनीची जागा आहे. या जागांवर नजीकच्या काळात बहुआयामी प्रशिक्षण संकुल, शिबिर स्थान, ग्रामविकसन, कृषी, महिला सबलीकरण, योग व निसर्गोपचार या विषयांवरील प्रस्तावित प्रकल्पांचा आराखडा निश्चित होत आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता भासणार आहे. समाजातील सत्शक्ती या कामी भक्कमपणे पाठीशी असेल हा विश्वास नक्कीच आहे.

वर्धिनीच्या सर्व शाखांवर वर्षाचे ३६५ दिवस काम पाहणारा महाविद्यालयीन वयोगटातील कार्यकर्ता गट हा अत्यंत उत्साही असा युवा समूह आहे. या गटाला अनुभवी मंडळींकडून काही गोष्टींची जोड मिळणे गरजेचे आहे. त्यातील सर्वात महत्त्वाची व प्राधान्याची गोष्ट म्हणजे प्रेरणा. त्यानंतर क्षमता वर्धनासाठी विविध विषयांचे प्रशिक्षण. अंगिकारलेल्या योजनांच्या परिपूर्तीसाठी आवश्यक असलेला पाठपुरावा आणि कार्यऊर्जेच्या अक्षय्य निर्मितीसाठी सकारात्मक प्रोत्साहन.

प्रेरणा-प्रशिक्षण-पाठपुरावा व प्रोत्साहन या चतु:सूत्रीच्या प्रभावी क्रियान्वयनासाठी समाजातील जाणकारांनी वर्धिनीसाठी आवर्जून वेळ द्यावा हे आग्रहाचे आवाहन.

**आपण श्रद्धाभक्तियुक्त भावाने ईश्वराला संपूर्णपणे शरण गेले पाहिजे.**

## मुखपृष्ठ संकल्पना

**स**माजातील स्त्रीशक्तीचं जागरण झाल्याशिवाय समाजातील सर्वच घटकांचा विकास हा अपूर्ण आहे. जोपर्यंत घरातील महिला सुशिक्षित होत नाही तोपर्यंत ते कुटुंब सुशिक्षित होऊ शकत नाही. केवळ 'चूल आणि मूल' या मर्यादेत न अडकवता समाजानं महिलेची एक वेगळी, स्वतंत्र परिपूर्ण व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख करून घेणं गरजेचं आहे. समाजात आपलंही महत्त्वाचं स्थान आहे, समाजाला आपलीही गरज आहे, आपल्यामध्येही काही सत्व आहे हे प्रत्येक स्त्रीला जाणवणं आणि त्या दिशेने पाऊल उचलणं आवश्यक आहे. हे थोरामोठ्यांनीही मान्य केलं आहे. स्वामी विवेकानंदांनी महिलांच्या उन्नतीचा ध्यास घेतला होता. समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी वर्धिनी गेले ३४ वर्षे अविरतपणे काम करत आहे. याच भूमिकेतून २५ वर्षांपूर्वी 'स्व'–रूपवर्धिनीमध्ये महिलांसाठी काम सुरू झालं आणि या विभागाला नाव देण्यात आलं, 'शारदामणि महिला विभाग'.




श्रीशारदामाता या स्वामी विवेकानंदांचे गुरु पूजनीय रामकृष्ण परमहंस यांच्या धर्मपत्नी. बंगालमध्ये त्या सारदामाता म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या नावातच त्यांच्या जीवनाचा अर्थ आपल्याला सापडतो. 'दा' म्हणजे देणे. जीवनाचं सार देणारी ती सारदामाता. रामकृष्णांनी देह ठेवल्यानंतर त्यांच्या सर्व शिष्यांच्या त्या माता झाल्या आणि त्या सर्व शिष्यांवर मायेचं पांघरुण त्यांनी घातलं. रामकृष्णांनी आपले शिष्य तावून सुलाखून घेतले. श्रीशारदामातांनीही समाजातील प्रत्येक घटकाला आईच्या मायेनं जवळ घेतलं.

शारदामणि महिला विभागाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त या विशेषांकाचे मुखपृष्ठ श्रीशारदामातांचे अत्यंत प्रसन्न, प्रेरक छायाचित्र देऊन सजविले आहे. महिलांना स्वत्वाची नुसती ओळख करून न देता सामाजिकता, सबलीकरण, सुरक्षा, सुसंस्कार आणि संघटन हे गुणही अंगी बाणावे आणि ते देशकारणी वेचावे या उद्देशानेच वर्धिनीमध्ये महिला विभागाची स्थापना करण्यात आली.

स्त्री आपल्या आत्मतेजाने संपूर्ण जगही उजळून टाकते याचा प्रत्यय आपल्याला मुखपृष्ठ पाहिल्यानंतर येतो. तिचं आत्मतेज प्रकट होण्यासाठी गरज असते ती तिला दिशा देण्याची व मार्गदर्शन करण्याची. वर्धिनी गेली २५ वर्षे हे कार्य अविरत करीत आहे. त्याचबरोबर स्वत:च स्वत:चा विकास घडवला पाहिजे ही प्रेरणा संपर्कातील सर्व स्त्रियांच्या मनामनात जागवणे व खऱ्या अर्थाने तिनं आपल्या पायावर उभं राहणं हेही वर्धिनीचं एक महत्त्वाचं उद्दिष्ट आहे. मुखपृष्ठावरील कमलासनावर विराजित शारदामातांचे ध्यानस्थ रूप आपल्या सर्वांना शुभ संकल्प करण्याचे व त्याची पूर्तता करण्याचे सामर्थ्य निश्चितपणे देईल.

**सामर्थ्यानुसार इतरांची सेवा केली पाहिजे आणि महत्त्वाचे म्हणजे इतरांना आपण दु:ख देता कामा नये.**

# विशेष लेख

यावर्षीच्या वार्षिक कार्यवृत्तासाठी पुढील लेखकांनी काही विशेष लेख दिले आहेत. त्या सर्वांविषयी कृतज्ञतेची भावना आम्ही व्यक्त करतो.

- 'स्व'-रूपवर्धिनीच्या श्री शारदामणि महिला विभागाला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व श्री सारदामठाच्या सदस्या **डॉ. मालतीताई आगटे** यांनी **'वंदनीय सारदामाता'** या विषयाचा श्री सारदामातांवर लेख लिहिला. मालतीताईंनी 'चित्रकला' या विषयात सादर केलेल्या प्रबंधाला पीएच.डी. मिळाली आहे.

- स्वामी विवेकानंद केंद्राच्या आजीवन सदस्या **सौ. श्रद्धाताई व्यास** यांनी **'सारदामाता व विवेकानंद'** या विषयावर लेख लिहिला आहे. सार्धशतीनिमित्त श्रद्धाताईंची १५० व्याख्याने संपूर्ण महाराष्ट्रभरात झाली.

- स्वामी विवेकानंद विचारांशी व सेवाकार्याशी एकरूप झालेल्या आजच्या वर्तमानातील नामांकित वक्त्या, लेखिका माननीय **डॉ. सुरुचिताई पांडे** यांचा **'एकनाथजी रानडे – एक दीपस्तंभ'** हा लेख स्व. एकनाथजींच्या जन्मशताब्दीनिमित्त पुनर्मुद्रित केला आहे.

- 'स्व'-रूपवर्धिनीचे हितचिंतक, विविध वृत्तपत्रांमध्ये 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदराअंतर्गत पत्र लिहिणारे ज्येष्ठ पत्रलेखक **श्री. गोपाळ संत** यांनी मातृभूमी जीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभाचे वृत्तांत लेखन केले. त्यांनी केलेले वृत्तांत लेखन विचारांचा एक प्रवाहच आहे.

- वर्धिनीच्या पहिल्या शाखेचे विद्यार्थी व पुणे विद्यापीठातील पत्रकारिता विभागातील **प्रा. संजय तांबट** यांनी युवक विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या युवक मार्गदर्शन या विषयावर लेख लिहिला.

**दयाळूपणा नसला तर त्याला माणूस कसं बरं म्हणता येईल ?**

# वंदनीय सारदामणि

युगाचार्य स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंतीमुळे आज त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची ओळख सर्वांना होत आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य भगवान श्रीरामकृष्ण परमहंस यांनी केले. या कार्यात श्रीरामकृष्णांच्या धर्मपत्नी श्रीसारदामणीदेवी यांचाही सिंहाचा वाटा आहे हे विसरून चालणार नाही.

श्रीरामकृष्ण हे एक 'अवतारी पुरुष' होते. एका 'अवतारी पुरुषाची' पत्नीही 'अवतारी स्त्री' असणार हे अबाधित सत्य आहे. या दोघांचे अवतारकार्य एकमेकांना पूरक होते. धर्मपत्नी या नात्याने श्रीसारदामणीदेवींचा सहभाग कसा होता हे पाहण्यासाठी आपल्याला त्यांचे जीवनचरित्र थोडक्यात पाहावे लागेल.

श्रीसारदामणीदेवींचे भक्त जगभर पसरलेले आहेत. ते त्यांना परमपूज्य माताजी म्हणून संबोधतात. माताजींचा जन्म पश्चिम बंगालमधील बांकुरा जिल्ह्यातील जयरामवाटी या छोट्या आडवळणी खेड्यात झाला. निर्धन परंतु धर्मपरायण अशा श्यामासुंदरी आणि रामचंद्र मुखोपाध्याय या दांपत्याच्या घरी श्रीसारदामणीदेवींनी जन्म घेतला. तो दिवस होता २२ डिसेंबर १८५३, मार्गशीर्ष कृष्ण सप्तमी !

मूळ नाव सारदामणी असले तरी त्यांना बालपणी 'सारु' म्हणत असत. अभिमानाने ऊर भरून यावा असे सारूचे बालपण होते. बालपणापासूनच तिच्या अंगी साधेपणा, सोशिकता, सेवावृत्ती, वात्सल्यभाव हे गुण होते. जन्मत:च असलेल्या या गुणांवर मातापित्यांच्या संस्कारांचे लेणे चढत गेले. या बाललेण्याला खरी झळाळी आली ती तिचे पती भगवान श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या सहवासात ! सहा वर्षांच्या कोवळ्या वयात असतानाच सारूचा विवाह श्रीरामकृष्णांबरोबर झाला. त्यावेळी श्रीरामकृष्ण कलकत्यात राणी रासमणीने बांधलेल्या कालीमातेच्या मंदिरात पुजारी होते. स्वत:च्या उत्कट भक्तीच्या जोरावर त्यांनी कालीमातेला प्रसन्न करून घेतले होते. अशा श्रीरामकृष्णांनी स्वत:च्या पत्नीची निवड स्वत:च केली होती.

विवाहाच्या वेळी सारू वयाने खूपच लहान असल्याने बऱ्याच कालावधीनंतर म्हणजे १८६७ च्या सुमारास सारू श्रीरामकृष्णांच्या निकट सहवासात आली. आता 'सारू'ची 'सारदा' झाली. आता खऱ्या अर्थी त्या दोघांचे वैवाहिक जीवन सुरू झाले. परंतु हे वैवाहिक जीवन 'न भूतो न भविष्यति।' होते. कारण श्रीरामकृष्ण म्हणत, जन्मदात्री आई आणि पत्नी या दोघीत मला कालीमाताच दिसत असते. त्याच दृष्टीने ते सारदेकडे पाहात असत. हा विचार त्यांनी सारदेलाही बोलून दाखविला होता. सारदेने या विचाराचे प्रसन्न चित्ताने स्वागत केले होते. हा विचार एवढ्यावरच थांबला नाही तर श्रीरामकृष्णांनी सारदेची षोडशोपचारे पूजा केली आणि सारदेच्या अंतर्यामी आविर्भूत होण्यासाठी जगन्मातेला आवाहन केले.

आता सारदेची श्रीसारदामाता झाली !

सारदेचे मन जगन्मातेच्या भूमिकेसाठी सिद्ध

**ज्यांच्यावर तुम्ही प्रेम करता त्यांच्याकडून काहीही मागू नका.**

होण्यासाठी श्रीरामकृष्णांनी सारदेच्या मनावर अनेक अध्यात्मिक संस्कार केले होते. या जगात ईश्वरार्पण बुद्धीने कसे राहायचे हे शिकवून सारदेच्या मनात सर्वच प्राणीमात्रांविषयी 'मातृभाव' जागृत केला होता आणि तावून सुलाखून म्हणजेच अनेक प्रकारे परीक्षा घेऊन स्वीकारलेल्या व योजनापूर्वक जगत्कार्यासाठी सिद्ध केलेल्या स्वामी विवेकानंदांसारख्या इतरही अनेक शिष्यांना माताजींच्या ओटीत टाकून स्वत: श्रीरामकृष्ण समाधिस्त झाले होते. श्रीरामकृष्णांच्या महासमाधीनंतर माताजींचे व्रतस्थ आणि त्यागमय जीवन सुरू झाले.

एका लहानशा खेडेगावात जन्मलेली, शालेय शिक्षण न घेतलेली, एक साधीसुधी स्त्री स्वत:च्या पतीचे राहिलेले कार्य करण्यास सिद्ध झाली होती. एकाच वेळी अनेक भूमिका ती पार पाडीत होती. गृहिणी म्हणून घराची झाडलोट, धुणीभांडी, स्वयंपाकपाणी, गुरु म्हणून येणाऱ्या प्रत्येक इच्छुकाला दीक्षा देणे. त्यात ज्ञान-अज्ञान, जात-पात, स्त्री-पुरुष, स्वदेश-परदेश असा कोणताच भेदभाव नसे. श्रीरामकृष्णांनी तयार केलेल्या प्रत्येक शिष्याला त्याच्या कार्यात मार्गदर्शन करणे, परदेशातून आलेल्या स्वामी विवेकानंदांच्या शिष्यांना आपल्यात सामावून घेऊन त्यांनी आरंभलेल्या कार्यात अत्यंतिक कौतुकाने सहभागी होणे अशा अनेकविध जबाबदाऱ्या माताजी संतोषाने आणि यशस्वीपणे पार पाडीत होत्या.

त्यांचे जीवन म्हणजे ज्ञान, भक्ती आणि कर्म यांच्या परिपूर्ण आदर्शाचे साकार रूपच होते. अकृत्रिम साधेपणा, पावित्र्य, आत्मसमर्पणवृत्ति आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वच प्राणीमात्रांबाबत प्रकट होणारे मातृत्व या साऱ्या गुणांमुळे एक आदर्श मुलगी, पतिव्रता पत्नी, पूर्ण संन्यासिनी, आदर्श गुरू, करुणामयी माता अशा अनेक भूमिका त्यांच्या जीवनात आपल्याला एकाच ठिकाणी पाहायला मिळतात.

वरवर पाहता साधेसुधे वाटणाऱ्या त्यांच्या जीवनाचा आपण जसजसा अभ्यास करू तसतसे आपल्या मनाचे उन्नयन होत जाते. मनाचे जसजसे उन्नयन होत जाते तसतसे मानवी जीवनाचे सार कशात आहे याचा उलगडा होत जातो आणि आपले जीवन धन्य होते. 'असे का होते ?' या प्रश्नाचे उत्तर माताजींच्या नावातच साठवलेले आहे.
त्यांचे नाव आहे सारदा !
'दा' म्हणजे देणारी. जीवनाचे सार देणारी ती सारदा ! त्यांच्या जीवनाचे सार आपण काढले तर आपल्या असे लक्षात येते की त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे दिव्य मातृत्वाचा ! आजच्या युगाला मातृत्वाची नितांत गरज आहे. **प्रत्येक स्त्रीला मातेच्या रूपात पाहिले गेले तरच सध्या चालू असलेली नीतीमत्तेची घसरण थांबेल**. त्यासाठी आदर्शाची गरज आहे. तो आदर्श आपल्याला माताजींच्या ठिकाणी सापडतो. त्या आदर्शाप्रत जाण्यासाठी मात्र आपल्याला माताजींच्याच चरणी परमश्रद्धेने बसणे गरजेचे आहे.

- डॉ. मालती आगटे
६८, शैलेश सोसायटी, कर्वेनगर, पुणे-५२
फोन : २५४४००५३, मो. : ९५५२५०४४०३

❖ ❖ ❖

**प्रेमाने काहीही मिळवता येतं. बळजबरी करून वा आडवळणाने तुम्ही कोणाला तुमची आज्ञा पाळण्यास कधीच भाग पाडू शकत नाही.**

# श्रीसारदामाता व स्वामी विवेकानंद

श्रीसारदादेवींविषयी लिहिणं किती कठीण हे लिहायला बसल्यावरच कळलं. जी विश्वजननी आहे, साक्षात जगदंबा आहे तरीही ती अगदी साधी माझ्या आईसारखी दिसणारी आहे आणि म्हणूनच तर अनाकलनीय आहे.

स्वामी ब्रह्मानंद म्हणायचे, ''जर कुणी खऱ्या अर्थाने माताजींना ओळखलं असेल तर ते फक्त नरेंद्रने.'' किती गूढ तरीही अर्थपूर्ण वाक्य आहे हे. ठाकूरांचे सगळेच शिष्य अधिकारी पुरुष होते तरीही ठाकूरांनी सर्वांना बांधून ठेवण्याची जबाबदारी नरेंद्रवर टाकली होती. त्याचप्रमाणे श्रीमाँचं खरं स्वरूप जाणण्याची शक्ती ही स्वामीजींमध्येच होती.

स्वामीजी नेहमी म्हणायचे, ''आधी आई आणि आईच्या मुलींसाठी मठ आणि नंतर बाबा आणि त्यांची मुलं.'' त्यांच्या हयातीत श्रीसारदा मठ उभा राहिला नाही पण स्वामीजींचं स्वप्न पूर्ण व्हायचं होतं पुढे १९५४ साली.

स्वामीजी आणि माताजींचं जीवन वाचताना जाणवतं की ह्या दोघांच्या एकत्र भेटी फार कमी आहेत पण त्या थोड्या भेटींमधून देखील श्रीमाताजींचा अधिकार आपल्याला कळतो. स्वामीजी परिव्राजक म्हणून बाहेर पडण्यापूर्वी सारदामाँना भेटायला घुसूडी येथे त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी गेले. स्वामीजींना त्यांना गाणं ऐकवलं, आशीर्वाद घेतला आणि मग भारतभ्रमणास निघाले. स्वामीजींचे गुरुबंधू, स्वामी अखंडानंद देखील त्यांच्याबरोबर होते. माताजी त्यांना म्हणाल्या, ''गंगाधर माझं सर्वस्व तुझ्या हाती देते आहे. तुला हिमालयातील दऱ्याखोऱ्यांची माहिती आहे. पाहा, की नरेनला खाण्यापिण्याचा काही त्रास होणार नाही.'' ह्या त्यांच्या वाक्यातच सगळं काही आलं आणि खरोखरच स्वामी अखंडानंद कसे सतत स्वामीजींच्याबरोबर राहण्याचा प्रयत्न करायचे ती तर खूपच गंमतीशीर गोष्ट आहे. १८९० च्या ह्या भेटीनंतर स्वामीजी थेट १८९७ मध्येच माताजींना भेटले.

साधारण एप्रिल १८९७ मध्ये स्वामीजी श्रीसारदामाँना भेटायला गेले. गंगेतून नावेने जात असताना स्वामीजी सतत गंगाजल घेऊन आपल्या डोक्यावर शिंपडत होते. एका ब्रह्मचारी महाराजांनी ह्याचं कारण विचारलं. स्वामीजी म्हणाले, ''अनेक वर्षे परदेशात राहिलो. अनेक लोकांना भेटलो. आता साक्षात पवित्रता स्वरूपिणीच्या दर्शनाला निघालोय म्हणून स्वत:ला शुद्ध करून घेतोय.'' माताजींना भेटायला जाताना प्रत्येक वेळी ते डोक्यावर गंगाजल शिंपडून स्वत:ला शुद्ध करून घेत.

हे सर्व वाचताना माझ्या मनात येतं, माताजींचं चरित्र वाचताना आपल्यालासुद्धा प्रत्येक वेळी शुद्ध करून घेणं किती आवश्यक आहे.

ह्या दोघा मातापुत्रांची अमेरिका दिग्विजयानंतरची पहिली भेट फारच आनंददायी झाली. माताजींचं हृदय आपल्या अध्यात्मिक पुत्राच्या यशाने अभिमानाने व अत्यानंदाने भरून आलं होतं. त्यांनी पूर्णपणे स्वत:ला झाकून घेतलं होतं आणि गोलापमाँच्या द्वारे स्वामीजींशी संभाषण केलं. स्वामीजींना त्यांना साष्टांग दंडवत घातला. स्वामीजी म्हणाले की ठाकूरांच्या कृपेनेच सारं साध्य झालं. अमेरिकेत असताना ठाकूर जिला 'आई' म्हणायचे त्या जगदंबेच्या माझ्याकडून सर्व करवून घेत होती. माताजी उद्गारल्या, ''ठाकूर आणि जिला ते 'आई' म्हणायचे ते दोघे वेगळे नसून एकच आहेत. श्रीरामकृष्णांनी आपलं कार्य करण्यासाठी तुला

**बेटा, जगातील दु:खं नाहीसं करण्यासाठी काम करत राहा.**

निवडलंय आणि केवळ त्यासाठीच तुझा जन्म झालाय. त्यांनी म्हटल्याप्रमाणे हजारो लोक तुला जगत्गुरु मानतील व तू अध्यात्मिक ज्ञानदाता होशील. तुझ्या मनात असलेलं कार्यदेखील लवकरच पूर्ण होईल, काळजी करू नकोस.''

बोलण्याच्या ओघात स्वामीजी म्हणाले, ''आई, ह्या खेपेस मी समुद्र एका झेपेत पार केला नाही बरं का. पाश्चात्यांनी बांधलेल्या बोटीतून सागर ओलांडला.'' माताजींनी ज्या कार्याचा उल्लेख केला ते म्हणजे स्वामीजींचं 'रामकृष्ण मिशन'च्या उभारणीचं स्वप्न होतं. १ मे १८९७ ला स्वामीजींनी रामकृष्ण मिशनचं उद्घाटन माताजींच्या हस्ते केलं. यथावकाश ३ फेब्रुवारी १८९८ ला बेलुर येथे जमीन खरेदी करून माताजींना आदरपूर्वक तिथे नेलं. स्वामीजींच्या विदेशी शिष्या, भगिनी निवेदिता (मार्गारेट नोबल), श्रीमती सारा ओली बुल व जोसेफाईन मॅक्लाऊड ह्या श्रीमाताजींबरोबर होत्या. ह्याच सुमारास श्रीमती सारा ओली बुल यांनी अतिशय हट्ट करून माताजींचे फोटो काढले. त्यातलाच एक आपण जो नेहमी बघतो तो फोटो आहे. फोटो काढत असतानाच श्रीमाताजी ध्यानस्थ होऊन गेल्या होत्या.

स्वामीजी श्रीमाताजींना साक्षात जगदंबा स्वरूपात पहात. एकदा बेलुर येथे असताना ते म्हणाले, ''श्रीमाँ ह्या सरस्वतीच्या रूपातील खरं तर बगलादेवीचा अवतार आहेत. बाहेरून अतिशय शांत पण आतून त्या दुष्ट शक्तीचा नाश करणाऱ्या आहेत.'' बंगालमध्ये बगलादेवी ही असूरमर्दिनी देवीचं नाव आहे. ते म्हणायचे, ''आईचं मोल अजून कुणी जाणलं नाहीए. पण हळूहळू साऱ्या विश्वाला त्यांची ओळख पटेल. आईच्या कृपेशिवाय ह्या जन्मी मुक्ती मिळणं कठीण.''

स्वामीजी आणि त्यांच्या गुरुबंधूंचा श्रीमाताजींच्या प्रतिचा भक्तिभाव विस्मयकारक आहे. श्रीसारदामाँच्या समोर जाताना एकदा स्वामीजींचं शरीर थरथर कापू लागलं आणि त्यांना भावोन्मादाने चालताही येईना. शेवटी माँनी त्यांना हाताला धरून आत नेलं. नेहमीच त्यांची अशी भावावस्था होत असे. ते म्हणत, ''श्रीमाँना साष्टांग प्रणाम करा पण त्यांच्या पावलांना स्पर्श करू नका. आपल्या असीम कृपेने त्या भक्ताची सर्व विपत्ती स्वत:वर घेतील आणि सोसतील. नुसतं तिच्यासमोर शब्दांशिवाय आपलं हृदय उघड करा आणि आशीर्वाद मागा. आईला सगळं कळतं.'' स्वामीजींचे हे शब्द म्हणजे खरंतर आपल्यासाठी अमूल्य वचनं आहेत. ह्या वचनांवर विश्वास ठेवूनच आपण पवित्रतास्वरूपिणी श्रीसारदामांसमोर नतमस्तक झालं पाहिजे. एकदा स्वामी विज्ञानानंदांना स्वामीजी म्हणाले, ''जा जाऊन श्रीमाँना प्रणाम करून ये.'' स्वामी विज्ञानानंद माँ श्रीसारदादेवींसमोर गेले आणि त्यांनी गुडघ्यावर बसून डोकं टेकून नमस्कार केला. तेवढ्यात त्यांच्या कानावर स्वामीजींचे शब्द आले. ''अरे, आईला नमस्कार करतात का ? बाजूला हो, मी दाखवतो. कसा करायचा असतो ते !'' असं म्हणून स्वामीजींनी साष्टांग प्रणिपात केला.

हे वाचत असताना माझ्या लक्षात आलं की स्वामीजी हे सगळं आपणा प्रत्येकाला सांगताहेत. श्रीसारदादेवी जी साक्षात महामाया आहेत. तिच्यासमोर आपण नमस्कार करताना स्वत:ला सोपवून दिलं पाहिजे, शरण गेलं पाहिजे. स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंती वर्षात श्रीमाताजींचं स्मरण करत आपण सारेच त्यांना शरण जाऊया हीच प्रार्थना.

**– श्रद्धा पाटील व्यास,** M-9892372962
shraddhavyas8@yahoo.com

**जीवनाचं उद्दिष्ट तेव्हाच पूर्ण होतं जेव्हा तुम्ही इतरांना आनंद देण्यास समर्थ होता.**

# एकनाथजी रानडे - एक दीपस्तंभ

कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद शिलास्मारकाला असंख्य लोकांनी भेट दिलेली असते. या संस्मरणीय कामाचे शिल्पकार आणि 'विवेकानंद केंद्रा'चे संस्थापक म्हणजे श्री. एकनाथजी रानडे. एकनाथजींचा जन्म १९ नोव्हेंबर १९१४ रोजी अमरावती जिल्ह्यातील टिमटाला या गावी झाला. त्यांच्या वडिलांचं नाव होतं श्री. रामकृष्णराव रानडे आणि आईचं नाव होतं सौ. रमाबाई. एकनाथजींच्या एका बहिणीच्या यजमानांमुळे - श्री. अण्णाजी म्हणजेच श्री. अनंत गणेश सोहोनी यांच्यामुळे, एकनाथजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या संपर्कात आले. लहान असताना एकनाथजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'कुश' पथकांत होते. शाखेतील सर्व खेळांमध्ये, शारीरिक बलसंपदा साधण्यात ते नेहमी आघाडीवर असत. अदम्य उत्साह आणि दुर्दम्य इच्छाशक्ती ही एकनाथजींच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये होती. कुशाग्र बुद्धीचे एकनाथजी तरुण वयात उपनिषदांच्या, लोकमान्य टिळकांनी लिहिलेल्या 'गीतारहस्य' ग्रंथाच्या तसेच स्वामी विवेकानंदांच्या विचारांच्या अध्ययनाकडे वळले. स्वामीजींच्या विचारांनी त्यांना पूर्णपणे मोहून टाकले. एकीकडे ते संघाचे प्रचारक म्हणून काम करीत होते. यथावकाश ते संघाचे 'सरकार्यवाह' झाले. पूर्व नियोजन आणि पूर्ण नियोजन हा एकनाथजींचा आग्रह असे. त्यामुळेच मोठ्या कामांचे नेतृत्व ते यशस्वीपणे पार पाडीत असत. संघाचे अधिकारी म्हणून त्यांची देशातील जवळजवळ सर्व विचारवंतांशी आणि नेत्यांशी गाठभेट झालेली होती. स्वामी विवेकानंदांची जन्मशताब्दी त्यावेळी जवळ येत चालली होती. त्या निमित्ताने राष्ट्र जागरणाचे अनेक कार्यक्रम आखले जाऊ लागले. मार्च १९६२ मध्ये एकनाथजी कोलकत्यातील बेलूर मठात गेले होते. त्यावेळीही स्वामीजींच्या विचारांवर त्यांचे सखोल चिंतन झाले. देशात त्यावेळी चीनच्या आक्रमणामुळे अस्वस्थता पसरलेली होती. एकनाथजी कन्याकुमारीच्या शिला स्मारकाच्या कार्याकडे कसे वळले ? कारण कन्याकुमारी ही स्वामी विवेकानंदांच्या चिंतनाची महत्त्वाची भूमी ठरली होती. 'लाईफ ऑफ स्वामी विवेकानंद बाय हिज ईस्टर्न अँड वेस्टर्न डिसायपल्स' मध्ये म्हटले गेले आहे.

''स्वामी विवेकानंद प्रवास करीत भारताच्या दक्षिण टोकाला कन्याकुमारीला आले. ...मातेच्या दर्शन घेण्यासाठी ते एखाद्या लहान मुलासारखे उत्सुक झाले होते. मंदिराच्या गाभाऱ्यात जाताच त्यांनी मातेपुढे लोटांगण घातले. पूजा समाप्त झाली, ते समुद्रातील खडकावर पोहत गेले. समुद्र खवळलेला होता. पण त्यांच्या मनात त्याहीपेक्षा मोठे काहूर माजलेले होते. भारताच्या त्या अखेरच्या टोकावर बसून ते ध्यानमग्न झाले. आपल्या देशाचा वर्तमान व भविष्य त्यांच्या दृष्टीपुढे होते. भारताची अशी अधोगती का झाली ? यावर चिंतन करताना त्यांना साक्षात्कार झाला. गौरवशाली शिखरावरून भारत अधोगतीच्या गर्तेत का सापडला आहे त्याचे त्यांना दर्शन झाले. अंत:करणाच्या शांत अवस्थेत त्यांना ज्ञान झाले, 'भारताची ती अत्युच्च आध्यात्मिक जाणीव ज्यामुळे भारत नेहमीकरताच सर्व राष्ट्रांचा आणि सर्व उपासनांचा उद्गाता झाला आहे ती जाणीव जर पुनरुज्जीवित केली, पुन्हा जागृत केली

**ईश्वराचं अस्तित्व सर्वत्र व सर्व काळी आहे.**

तर भारताचे उत्थान होईल.' त्यांना भारतमातेच्या महानतेचे आणि तिच्यातील दोषांचे दर्शन झाले. या देशाने आपले व्यक्तिमत्त्वच गमावले होते.''

स्वामीजींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने या शिलेवर स्वामीजींचा पुतळा तरी उभारला गेला पाहिजे, अशी कल्पना तामिळनाडू राज्यात संघाचे प्रांत प्रचारक म्हणून काम करणाऱ्या श्री. दत्ताजी डिडोळकर यांनी मांडली. त्या दृष्टीने एक समितीही स्थापन करण्यात आली. त्यात काही समाज कंटकांनी अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण तो प्रयत्न फारसा सफल झाला नाही. 'कथा शिलास्मारकाची' नावाचे एक पुस्तक एकनाथजींच्या व्याख्यानावरून प्रसिद्ध करण्यात आले. त्यातील एक परिच्छेद वाचनीय आहे. ''मी नागपूरहून सरळ कलकत्त्याला गेलो आणि २२ जुलै १९६३ ला श्रद्धेय स्वामी माधवानंदांना भेटलो. त्यावेळी ते मिशनचे अध्यक्ष होते. १९५० ते १९६३ या काळात कलकत्त्यात असताना मी नियमितपणे बेलूरला जात असे व दर १५ दिवसांनी स्वामी माधवानंद महाराजांना भेटत असे. त्यांना माझ्याबद्दल प्रेम, आस्था होती. विवेकानंद शिलास्मारकाच्या संदर्भात मी काहीतरी करावे, या समितीच्या प्रस्तावाबद्दल मी त्यांना सांगितले. मला नेमकी परिस्थिती माहिती नाही, मी पत्रव्यवहारही पाहिलेला नाही व त्यासाठी मी तिथे जात आहे, हे मी स्वामीजींना सांगितले. पण त्याआधी त्यांना या कामात रस, उत्सुकता आहे की नाही हे त्यांनी मला सांगावे, अशी मी त्यांना विनंती केली. जर रामकृष्ण मिशनही याबाबत उत्सुक असेल, तर मला हे काम स्वीकारण्यास उत्साह वाटेल अन्यथा मलाही उत्साह वाटणार नाही. हे मी स्पष्ट केले. त्यावेळी स्वामी माधवानंदांनी जे सांगितले, ते फार महत्त्वाचे होते. ते म्हणाले, ''वास्तविक रामकृष्ण मिशननेच हे कार्य हाती घ्यायला हवे होते. पण आम्हाला केंद्र सरकारच्या धोरणाची माहिती आहे. तामिळनाडू सरकारचे मत माहीत आहे. अशा संदर्भात त्यांची काय प्रतिक्रिया असते, त्याचीही कल्पना आहे. काही ख्रिश्चनांनी विरोध केल्यावर तामिळनाडू सरकार कधीच संमती देणार नाही. केंद्र सरकारकडून परवानगी मिळणेही कठीणच आहे. मग याचा काय उपयोग ? आम्ही संन्यासी जेव्हा एखादा शब्द टाकतो तेव्हा काय होणार, हे आम्हाला माहीत असते. आम्हाला ते परवानगी देणार नाहीत. संन्यासी असल्यामुळे आम्ही निदर्शने करू शकत नाही. जनमत तयार करू शकत नाही. या कामात आम्हाला येणे शक्य नाही. पण तुझ्यासारखी व्यक्ती हे काम स्वीकारायला तयार असेल, संपूर्ण समिती तुझ्या पाठीशी असेल, तुझी मदत त्यांना हवी असेल, तर तू हे काम नक्कीच स्वीकारावेस. रामकृष्ण मिशनचा या कामाशी प्रत्यक्ष, कार्यालयीन काही संबंध नसला, तरी संपूर्ण मिशन तुझ्या पाठीशी राहील, याची खात्री बाळग. तू पुढे हो, ठाकूर तुला आशीर्वाद देतील – स्वामी विवेकानंद तुला आशीर्वाद देतील आणि माझेही आशीर्वाद तुझ्यासोबत आहेत.''

यथावकाश राजकारणाच्या तसेच समाजाच्या सर्व थरांतून एकनाथजींच्या अथक कष्टांना पाठिंबा मिळू लागला. स्वामीजींवर प्रेम करणारे अनेक नेते पक्षांचा भेद विसरून एकत्र आले. या स्मारकाच्या निधिसंकलनात विविध राज्यांनी हातभार लावला. या स्मारकाचे माहितीपत्रक इतके देखणे होते की ते आपल्या संग्रही राहावे यासाठी असंख्य जनसामान्यांनी एक रुपयाची देणगी दिली. स्मारकरूपी जगन्नाथाचा रथ ओढण्यात साऱ्यांचे हात

**धीर सोडू नको. सतत प्रार्थना करत जा. सर्व काही वेळेवर घडून येईल.**

लागले ते असे. स्वामीजी मोठ्या समर्थ भावाने जणू या देशाला साद घालत आहेत, असे जे तैलचित्र आता सर्वदूर प्रसिद्ध झाले आहे, ते रेखाटले होते श्री. एस्. एम्. पंडित यांनी ! शिलास्मारकाची जडण-घडण होत असताना तिथे स्फोट घडवून आणवून घातपाताचाही प्रयत्न काही समाज विघातकांनी केला होता. सर्व अडचणींवर मात करीत शिलास्मारक साकार झाले. त्याचा शिलान्यास बेलूर येथील रामकृष्ण मठ आणि मिशनचे अध्यक्ष असलेल्या स्वामी वीरेश्वरानंद यांच्या हस्ते झाला आणि उद्घाटन २ सप्टेंबर १९७० रोजी भारताचे राष्ट्रपती असलेल्या श्री. व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते झाले. एकनाथजींच्या मनात अनेक वर्षांपासून स्वामीजींच्या राष्ट्र विचारांना धरून कार्य करण्याचे घोळत होते. त्यावर त्यांचे सतत चिंतन सुरू होते. ७ जानेवारी १९७२ रोजी 'विवेकानंद केंद्रा'ची औपचारिक स्थापना केली गेली. त्या दिवशी स्वामीजींची १०८ वी जयंती होती. अध्यात्म आणि समाजाची सेवा यावर एकनाथजींनी मूलभूत चिंतन केले होते. 'विवेकानंद केंद्रा'च्या स्थापनेमागची भूमिका त्यांनी अतिशय अर्थपूर्ण शब्दांत मांडलेली आहे. ते म्हणतात, 'विवेकानंद केंद्र' हे प्रामुख्याने एक वैचारिक स्वरूपाचे आंदोलन असून त्याचा उगम स्वामी विवेकानंदांचे जीवन आणि उपदेश यांच्या प्रेरणेतून झाला आहे. ...

धार्मिक जागृती म्हणजे स्वत:मध्ये, भोवतालच्या विश्वामध्ये परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव होणे. त्यामुळे व्यक्तीला स्वत:मधील दैवी अंशाची जाणीव होऊन तिचा आध्यात्मिक विकास होऊ लागतो. त्याचबरोबर व्यक्तीमध्ये परमेश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीशीही एकत्वाची भावना निर्माण होते व परिणामत: मानवासंबंधी उत्कट भ्रातृभाव जागृत होतो आणि मानवजातीच्या कल्याणासाठी, प्रगतीसाठी कार्य करण्यास ती व्यक्ती हिरिरीने प्रवृत्त होते. ...

आपल्या समाजबांधवांकडे पाठ फिरवून, त्यांच्या दु:खांकडे दुर्लक्ष करून जे धर्माच्या निव्वळ बाह्य उपासनाविधीतच मग्न असतात, त्यांच्यासंबंधी स्वामीजी म्हणतात, ''आपल्या भोवती असलेल्या समाजरूपी विराटपुरुषाची-जनताजनार्दनाची-पूजा न करता आपण निरर्थक कोणत्या परमेश्वरामागे धावणार आहोत ? वस्तुत: ज्याला जनताजनार्दनाची पूजा करता येते त्यालाच इतर देवांची पूजा करता येईल.'' ...

राष्ट्राचे पुनरुत्थान आणि व्यक्तीची घडण असे वर उल्लेखिलेले दुहेरी उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून विवेकानंद केंद्राने साऱ्या देशभर आपली केंद्रे उभारण्याची योजना आखली आहे. या केंद्रामार्फत राष्ट्रीय उत्थानाची विविध कार्ये हाती घेण्यात येणार आहेत. अर्थात विवेकानंद केंद्र ही संघटना अध्यात्मप्रेरित व विशुद्ध सेवाकार्याला वाहिलेली असल्याने स्वाभाविकपणे या संघटनेत राजकारणाला यत्किंचितही स्थान नाही.''

जीवनभर स्वामी विवेकानंदांना बुद्धीत आणि हृदयात साठवून घेऊन झंझावाती कार्य करणारे, एकनाथजी, २२ ऑगस्ट १९८२ रोजी या जगाचा निरोप घेऊन गेले. ज्ञानसाधनेत रमलेल्या या कर्मयोग्याने आपल्या मागे हजारो युवकांना कार्यप्रवृत्त केले.

– डॉ. सुरुचि पांडे

– 'स्वामी विवेकानंद व पाच दीपस्तंभ' या पुस्तकातून पूर्वपरवानगीने पुनर्मुद्रांकित.

❖ ❖ ❖

**ब्रह्म सर्वच वस्तूंमध्ये आहे.**

# एका इतिहासाचार्याचा सन्मान !

'स्व'-रूपवर्धिनी आणि तात्यासाहेब नातू फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वामी विवेकानंद मातृभूमी गौरव पुरस्कार'.

स्वामी विवेकानंद यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त 'स्व'-रूपवर्धिनी व तात्यासाहेब नातू फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ''स्वामी विवेकानंद मातृभूमी गौरव पुरस्कार'' सुरू करण्यात आला. ज्या व्यक्तीने नि:स्वार्थपणे देशाची व समाजाची समरसता व समृद्धी वाढविणारे कार्य केले आहे तसेच ज्यांनी समाजाला गौरव निर्माण करणारे अभिमानास्पद आणि अनुकरणीय कार्य केले अशा भारताच्या सुपुत्राला/सुपुत्रीला देण्यात येणार आहे. यावर्षी गौरव पुरस्काराचे पहिले मानकरी 'ज्येष्ठ इतिहास संशोधक' माननीय श्री. निनाद बेडेकर यांना रवि. दि. ८ डिसेंबरला गरवारे महाविद्यालयाचे सभागृहात बहाल करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते डॉ. प्र. ल. गावडे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ तसेच या कार्यक्रमाला श्री. शंकर अभ्यंकर, विद्यावाचस्पती यांनी विशेष उपस्थिती लावली व श्रोत्यांना त्यांच्या ओघवत्या शब्दलालित्यामधून गंगास्नानाचा अनुभव दिला. काही अविस्मरणीय कार्यक्रम चुकवू नयेत त्यापैकी हा एक कार्यक्रम होता व वक्ते व श्रोते त्यात न्हाऊन निघाले. स्वत: श्री. निनाद बेडेकर यांनी इतिहासावर, महाराजांच्या किल्ल्यांवर अप्रतिम भाष्य केले. येथे नमूद करण्यासारखी गोष्ट आहे की काही इतिहासकार ''शिवाजी महाराजांनी सुरतेची लूट केली'' असे म्हणतात. ते साफ चुकीचे आहे कारण महाराज लुटारू नव्हते तर ''महाराजांनी स्वराज्यासाठी खंडणी वसूल केली'' असे म्हणायला पाहिजे. असे श्री. बेडेकरांनी दुरुस्तीवजा निवेदन केले. त्यांनी पुढे सांगितले की ''भारताचा राष्ट्रवाद हा विश्वकल्याणासाठी आहे', आम्ही कूपमंडूक नव्हे. निनादजींनी महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांना भेटी दिल्या, त्यांचा इतिहास लिहिला तसेच भारतातील किल्लेसुद्धा ते हिंडले. एवढेच काय पण भारताबाहेरील ७५ किल्ल्यांना त्यांनी भेट दिली; व इतिहास लिहिला. निनादजींनी वयाच्या ६१ व्या वर्षी ६१ किल्ल्यांना भेटी दिल्या हे विशेष नमूद करण्याजोगे आहे. कारण ६१ व्या वर्षी आम्ही ६१ पायऱ्याही चढू शकत नाही, आम्हाला लिफ्ट लागते. श्री. बेडेकरांनी सांगितले की शिवाजी महाराजांनी जे कणखर तरुण नेतृत्व आणि मावळे निर्माण केले त्यामागे भवानी मातेचा आशिर्वाद होता. छत्रसाल राजा जेव्हा शिवाजी महाराजांच्या पदरी सेवक म्हणून याचना करायला आला तेव्हा महाराजांनी त्याला सांगितले, 'याचना काय करता, तुम्ही राजे आहात, क्षत्रिय आहात' व छत्रसालांना महाराजांनी तलवार भेट दिली व सांगितले, 'आपण श्रीकृष्णाचे वंशज. श्रीकृष्णाचे नाव घ्या व या तलवारीने तुर्कांविरुद्ध तलवार गाजवा.' निनादजी पुढे म्हणाले की सध्याचे राजकारणी 'स्टॅच्यु ऑफ लिबर्टी'पेक्षा महाराज शिवछत्रपतींचा पुतळा कसा मोठ्ठा होईल या विवंचनेत आहेत पण पुतळा कितीही लहान वा मोठ्ठा असो त्यामागची महाराजांची प्रेरणा, तत्वप्रणाली, देशप्रेम, स्वराज्यासाठी त्याग, अपार कष्ट याकडे लक्ष द्यायला पाहिजे. तसेच त्यांनी 'स्व'-रूपवर्धिनीला विचार दिला की 'स्व'-रूपवर्धिनीने तरुणांच्या मनात 'स्व' जागृत करावा, देशासाठी, धर्मासाठी व या मातृभूमीसाठी.

– गोपाळ द. संत,
फोन : २४२२३०९१

**सर्व गुरू समान असतात. ईश्वराची तीच शक्ती सर्वांमध्ये संचारित होऊन कार्य करीत असते.**

# युवाशक्तीचे नेटवर्किंग

समाजात सर्वदूर पसरलेली बुद्धिमत्ता शोधून तिच्या विकासाला पोषक वातावरण व संधी उपलब्ध करायची आणि स्वत:च स्वत:चा विकास घडवला पाहिजे, ही प्रेरणा मनामनांत जागवायची हे ध्येय उराशी बाळगून कै. किशाभाऊंनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने वर्धिनीची स्थापना केली. स्थापना काळात मर्यादित ताकदीमुळे निवडकच विद्यार्थी-विद्यार्थिनींवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. स्वतःचा स्वार्थ समाजाच्या स्वार्थात विलीन करणारी कर्तबगार तरुणांची पिढी किशाभाऊंना घडवायची होती.

आज ३४ वर्षात कामाचा विस्तार वाढला आहे आणि तरुणांची समर्थपणे काम करणारी एक फळी उभी राहिली आहे. आज पुण्यात वर्धिनीच्या एकूण १८ शाखा कार्यरत आहेत. बालवाडी विस्तारली. रौप्यमहोत्सव साजरा करणाऱ्या शारदामणि महिला विभागामार्फत परिसरातील महिलांच्या सबलीकरणाचे काम अनेक उपक्रमांतून सुरू आहे. स्पर्धा परीक्षा केंद्र आणि अभ्यासिकेच्या माध्यमातून महाराष्ट्रभरातील अनेक उमदे तरूण संस्थेच्या संपर्कात आहेत. वर्धिनीतच तयार झालेली तरुण-तरुणींची नवी पिढी हे सर्व समर्थपणे सांभाळत आहे. पण कामाचा विस्तार होतो, तशा त्याच्या गरजाही वाढतात आणि विकासाच्या म्हणून काही समस्याही निर्माण होतात. आडव्या दिशेने वाढ की, गुणवत्तेचा उभा विस्तार असे द्वंद्वही त्यातून उभे राहते. प्रत्यक्ष काम करणारे आपापल्यापरीने त्यावर उत्तरही शोधतात. काम चालू ठेवणे, हीच त्यांची प्राथमिकता बनते. कदाचित अपरिहार्यताही. त्यातून कामामध्ये साचलेपण येते. हे टाळून वर्धिनीच्या कामातले स्वत्व व गुणवत्ता टिकवण्यासाठी नव्या रचनांची आवश्यकता आहे. 'वर्धिनीचा परिसस्पर्श लाभलेल्या महाविद्यालयीन व व्यावसायिक युवाशक्तीचे नेटवर्किंग'अशी एक रचना करून त्या दिशेने काही प्रयत्न सुरू आहेत. ते सर्वांपर्यंत पोचावेत, यासाठी हा लेख.

वर्धिनीचे विद्यमान अध्यक्ष मा. जयसिंगभाई मरिवाला यांच्यासमवेत कार्यकर्त्यांच्या झालेल्या एका बैठकीत हा विषय पुढे आला. आपल्याच कामातून उभ्या राहिलेल्या युवाशक्तीचा सुयोग्य व नेटका वापर करण्याची सूचना मी त्यात मांडली. वर्धिनीचा युवकविभाग आधीपासूनच अस्तित्वात आहे. त्याची नव्या ध्येयउद्दिष्टांनुसार व कालसुसंगत भविष्यानुकूल फेररचना करण्याची गरज आहे. संस्थेच्या स्थापनाकाळातील परिस्थिती आणि समाज व आज साडेतीन दशकांनंतरची परिस्थिती आणि समाज वेगळा आहे. त्याचे प्रतिबिंब आपल्या संघटनेत उमटले पाहिजे. वर्धिनीत सध्या प्रत्यक्ष शाखांवर काम करणारा युवकगट आणि नोकरी-व्यवसाय-स्वयंरोजगाराच्या विविध क्षेत्रांत कार्यरत युवकगट यांचा मेळ घालण्याचा हा प्रयत्न आहे. सर्व युवकांची माहिती जमा करणं आणि त्या माहितीच्या आधारावर (डाटाबेसवर) प्रक्रिया करणं, यासाठी युवक विभागाचे स्वतंत्र कार्यालय वर्धिनीच्या वास्तूत सध्या सुरू आहे.तसेच, उपलब्ध माहितीचा सुयोग्य उपयोग करण्याचे आव्हानही त्यात आहे. हा उपयोग अनेक प्रकारचा व लवचिक असू शकतो. केवळ निधिसंकलनाचा मर्यादित हेतू त्यामागे नाही. एखाद्या युवकाला आठवड्यातून किंवा महिन्यातून दोन तास वर्धिनीच्या किंवा समाजाच्या कामासाठी देण्याची इच्छा आहे, तर त्याचा नेटका वापर कसा करता येईल, अशी रचना उभारता येईल का? एखाद्याला प्रत्यक्ष येणे शक्य नसले, तरी आधुनिक संपर्कसाधनांच्या मदतीने तो वर्धिनीशी जोडलेला राहू शकतो. त्याचे विचारांचे योगदानही महत्त्वाचे ठरू शकते. वर्धिनीच्या कामाला तात्त्विक, वैचारिक आधार देण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे काम असा युवक करू शकतो. विविध क्षेत्रांतील आपल्या कामाचा अनुभव वर्धिनीतील विद्यार्थ्यांपुढे मांडणे, त्यांची दृष्टी व्यापक करणे, अशा कामात त्यांचे योगदान राहू शकते. विविध क्षेत्रांतील

**योग्य वेळी जो न भिता बोलतो तोच खरा मित्र होय.**
**अयोग्य वेळी दाखवलेली सहानुभूती काही उपयोगाची नसते.**

वर्धिनीचे युवक एकत्र येऊन देश-समाजाला उपयोगी पडेल अशा एखाद्या नव्या कामाची आखणी करू शकतात.अशा कार्यरत युवकांच्या गटांचे दिशादर्शन (मेंटॉरिंग) करणे, त्यांना करियरच्या नव्या दिशा दाखवणे, असे काम ते नक्की करू शकतात. या कल्पना केवळ उदाहरणापुरत्या आहेत. पण मनं एकत्र आली की, सध्याच्या नेटवर्किंगच्या जमान्यात समाजातील शुभशक्तीचे उपयोजन अनेक पद्धतीने करणे शक्य आहे आणि तसे काम 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवकांनी करावे, अशी अपेक्षा आहे. या संदर्भात बाहेरची उदाहरणे द्यायची झाली, तर प्रदीप लोखंडे यांनी रूरल रिलेशन्सच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकाससंधींचे केलेले नेटवर्किंग किंवा संदीप वासलेकरांनी महाराष्ट्रीय समाजात रुजवलेले थिंकटँकचे महत्त्व नमूद करता येईल.

त्यासाठी विविध दिशांनी आणि खुल्या मनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. वर्धिनीतील विद्यार्थी आणि युवक-युवतींना त्यासाठीचे दालन उपलब्ध करायला हवे. त्या दृष्टीने ग्रंथालयाचे रुपांतर बहुमाध्यम अभिव्यक्ती दालनात (मल्टिमीडिया एक्स्प्रेशन्स) करण्याची योजना आहे. सध्याचे विद्यार्थी वाचत नाहीत, असे सरधोपटपणे म्हटले जाते. तसे मला वाटत नाही. विद्यार्थी वाचतात, पण त्यांचे वाचण्याचे विषय बदलले आहेत आणि माध्यमेही बदलली आहेत. ते लक्षात घेतले पाहिजे. त्यादृष्टीने विविध वयोगटांसाठी चांगली पुस्तके, ई-बुक्स, चांगल्या ध्वनिफिती, चांगले चित्रपट-माहितीपट यांची यादी करणे, त्यांचा प्रत्यक्ष संग्रह करणे, हे काम सुरू केले आहे. वाचनवेगासारखी स्वयंअध्ययनाची तंत्रे शिकवण्याबरोबरच युवकांना चित्रपटांचा रसास्वाद कसा घ्यायचा, माहितीपट कसे करायचे याचे प्रशिक्षणही वर्धिनीत उपलब्ध असले पाहिजे. सध्याच्या डिजिटल युगात वर्धिनीत येणाऱ्या गटाला इंटरनेट कनेक्शन, टॅबलेट, हँडीकॅम सहज उपलब्ध असले पाहिजेत. ते त्यांना वापरता आले पाहिजेत. या सर्वांतून वर्धिनीतले घडणे हे आनंदी आणि बहुदिश झाले पाहिजे, असा प्रयत्न आहे. वर्धिनीच्या वास्तूत आणि खडकवासल्याजवळ कातवडी येथील नव्या जागेत उभ्या करायच्या बहुउपयोगी शिबिरस्थानात तशा सुविधाही निर्माण करायच्या आहेत. हे सगळे एका रात्रीत होणार नाही. पण त्या दिशेने वर्धिनीचे पाऊल निश्चित पडले आहे.

आधुनिक साधनसुविधांच्या उपलब्धीबरोबरच तरुण मने ही समाजातील प्रश्नांबाबत कायम सजग असली पाहिजे. आपल्याला भावणाऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रत्यक्ष कृती केली पाहिजे, याचे भानही युवकविभागाच्या नव्या रचनेत आहे. त्यासाठी युवकांचे विविध प्रकारचे अभ्यासगटही असले पाहिजेत. अभ्यासोनि प्रकटावे, हा वर्धिनीतील सर्वच युवकांचा मंत्र असला पाहिजे. इतिहासाचा धांडोळा घेताना सध्याच्या जगाचे भानही त्यात असले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी अशा महापुरुषांचा आजच्या संदर्भात चिकित्सक विचार करताना नव्या विचारधारांचाही अभ्यास वर्धिनीच्या युवकांनी केला पाहिजे. तो विवेकाने वर्धिनीतल्या विद्यार्थ्यांपर्यंत आणि समाजातही पोचवला पाहिजे, अशी अपेक्षा नक्कीच आहे. अभ्यासगटांबरोबर युवकांचे निरनिराळे छंदगट, कौशल्यगट व क्रीडागटही असतील. सर्वच गोष्टी चौकोनी चेहऱ्याने करण्याची आवश्यकता नाही. सामाजिक कामातही आनंद असतो आणि तो सर्वदूर पसरवताही येतो. **स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे 'मनुष्यातील पूर्णत्वाचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण'**. स्वामीजींच्या सार्धशतीनिमित्ताने स्वतःतील पूर्णत्वाचे भान असलेली आणि समाजाचे स्वत्व जागवणारी कृतिप्रवण युवाशक्ती उभी करणे हा वर्धिनीचा संकल्प आहे.

**- संजय विष्णू तांबट**

**तोडफोड करणं सर्वांनाच जमतं, पण घडविणं किती जणांना जमतं ?**



## शारदामणि महिला विभाग
## रौप्यमहोत्सवी वृत्तांत

*"खरे शिक्षण म्हणजे नुसते शब्द घोकणे नव्हे, तर सर्व मानसिक शक्तींचा विकास करणे हेच खरे शिक्षण होय; किंवा असेही म्हणता येईल की शिक्षण म्हणजे व्यक्तींना अशा रीतीने वळण लावणे की जेणेकरून त्या आपली इच्छाशक्ती चांगल्या गोष्टींकडे वळवू शकतील आणि त्या गोष्टी प्रत्यक्ष कृतीत आणू शकतील. थोर, निर्भय स्त्रियांची जी भारतात वानवा आहे ती अशा शिक्षणानेच दूर होईल, आणि संघमित्रा, अहिल्याबाई, मीराबाई यांची परंपरा पुढे चालेल. भगवंताच्या चरणस्पर्शाने प्राप्त होणारे सामर्थ्य ज्यांच्या हृदयात विराजमान आहे, ज्या पवित्र आणि निःस्वार्थी आहेत आणि म्हणूनच वीरमाता होण्यास ज्या योग्य आहेत अशा स्त्रिया ह्या शिक्षणानेच निर्माण होतील."*

*- स्वामी विवेकानंद*

**कमीत कमी एक वेळा सकाळी व पुन्हा संध्याकाळी जप ध्यानास बसलंच पाहिजे.ते नौकेच्या सुकाणूचे काम करते.**

## शारदामणि महिला विभागाची २५ वर्षांची वाटचाल !

**आ**ज इतक्या वर्षानंतर मागे वळून पाहिलं की तोच दिवस आठवतो. सभागृहात सर्व महिला एकत्र आल्या होत्या. असं वाटलंही नव्हतं की 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत महिलांचे एवढे मोठे काम उभे राहील. सभागृहात महिला एकत्र जमल्या आणि त्यांनी त्यांना काय शिकण्याची इच्छा आहे अर्थात स्वत:च्या सोयीनुसार आणि इच्छेनुसार हे कागदावर लिहून दिले. कोणी शिवण वर्ग तर कोणी टायपिंगचे वर्ग तर कोणी प्रौढ साक्षरता वर्ग. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वर्ग सुरू केले खरे पण मला असे मनापासून कधी वाटलेच नव्हते की भविष्यात हे वर्ग सातत्याने चालतील म्हणून त्याच मुस्लिम महिलांनी ''हम तो उर्दू में पढे लिखे है, हमे मराठी बिलकूल समझ में नही आती'' असे मला भेटून सांगितले. त्यावेळेस या महिलांसाठी आपण मराठी भाषेचे वर्ग प्रौढ साक्षरता वर्गाबरोबर सुरू करावे असे मला वाटले. अर्थात हे कसं सुचलं कुणास ठाऊक! पण किशाभाऊ नेहमी म्हणायचे तेच खरे! 'खरंच हे ईश्वरी कार्य आहे.'

त्याप्रमाणे फुलाच्या पाकळ्या एकेक करून जशा उमलतात आणि वातावरणात आपला सुगंध पसरवतात तसंच हे सारं घडत गेलं. पण मात्र त्या सुगंध पसरवणाऱ्या फुलाला कळतच नाही की हे कसं घडलं ते! अगदी तसंच. 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूमध्ये छोट्या मुलांची बालवाडी सुरू केली. मुलांना सोडायला आलेल्या महिलांच्या संपर्कातून त्यांच्या गरजा कळत गेल्या.

'सरांच्या भाषेत व्याजाच्या मोबदल्यात समाजाच्या पदरात आपण काही सेवा घातली पाहिजे' असे म्हणून मग सेवावस्तीतील महिलांचे काही व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग हे त्या फुलांच्या पाकळ्यांप्रमाणे सुरू होत गेले. एकेक पाकळी उलगडायची म्हणजे खरं तर कसरतच होती. या वर्गाला महिला साथ देतील ना? त्या नियमित येतील ना? खरोखर त्या महिलांचा फायदा होईल ना? संस्थेची सेवा फाटक्या झोळीत टाकली जाणार नाही ना? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होत होते.

परंतु श्रीमती कुंतीताईंचा आणि किशाभाऊंचा प्रेरणास्रोत पाठीशी असल्यामुळे हे सर्व प्रकल्प सहजपणे उमलत गेले आणि मुख्य म्हणजे सुरळीत चालू राहिले. नुसतेच चालू राहिले असे नाही. त्यात अनेक गोष्टीची भर पडत गेली.

सुरुवातीला शिवणवर्ग, गृहपरिचारिका वर्ग, प्रौढ साक्षरता वर्ग आणि उर्दू महिलांसाठी मराठी भाषेचे वर्ग हे सुरू झाले. त्यात मग मोफत कौटुंबिक सल्ला केंद्र गरजू महिलांना सल्ला देता यावे म्हणून सुरू झाले. बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग सुरू केला. सामाजिक बांधिलकीची जाण असलेली आपल्याच विचारांची महिला शिक्षिका असावी. हा बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचा हेतू होता. गृहपरिचारिका वर्गाचा कालावधी वाढवावा व मुली/महिलांना त्या कलेचे उत्तम शिक्षण मिळावे म्हणून त्याच्या कालावधीत वाढ करून पूर्ण १२ महिन्याचा असा सहाय्यक परिचारिका वर्ग सुरू झाला. त्यानंतर नुसताच शिवणवर्ग सुरू करून उपयोग नाही. तर समाजाबरोबर चालायचे आणि गरीब महिलांनाही परवडेल असा 'फॅशन डिझाईनिंग वर्ग' सुरू केला. शिवाय एप्रिल-मेच्या सुट्टीत रांगोळी व मेहंदीचे वर्गही सुरू झाले. महिलांना उत्तम वीणकाम करता यावे, शिवणवर्गाबरोबर आपल्या घरात बसून संसार सांभाळता सांभाळता त्यांना लोकरीचे विणकामही यावे म्हणून विणकामाचा वर्गही सुरू केला. हे सर्व अभ्यासक्रम तर सुरू झाले. पण यात मिळणाऱ्या पैशांची बचत उत्तमरित्या व्हावी आणि त्या पैशांचा उपयोग संसारातील अडीअडचणींच्या वेळी व्हावा,

**सहनशीलता हा फार मोठा सद्गुण आहे. यासारखे दुसरे काही नाही.**

कोणापुढे हात पसरावे लागू नये किंवा सावकाराच्या व्याजाच्या कचाट्यात अडकू नये म्हणून या अशा महिलांसाठी बचत गटांची ही सुरुवात त्यातून झाली. त्याबरोबर शिक्षण आणि पैसा हा व्यवस्थित मार्गी लागावा, त्याचा आपल्या कुटुंबासाठी योग्य प्रकारे वापर करता यावा आणि यासाठी स्वत:चे व मुलांचे आरोग्य उत्तम राखता यावे म्हणून याच महिलांसाठी माता बालसंगोपन केंद्र के. ई. एम. हॉस्पिटलच्या मदतीने सुरू केले.

हे सर्व प्रकल्प खरोखर गुलाबाच्या पाकळीप्रमाणे एकातून दुसरे व दुसऱ्यातून तिसरे असे उमलत गेले. समाजातील अनेक स्तरातील उदा. शहरी आणि ग्रामीण अशा सर्व महिलांनी याचा अतिशय उत्तमरित्या फायदा करून घेतला. 'स्व'-रूपवर्धिनीच्या नावाप्रमाणे जी व्यक्ती 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये येईल त्या प्रत्येक व्यक्तीचे गुणांचे वर्धन कसे करता येईल, समाजामध्ये मी नेमकी कुठे उभी आहे आणि समाजापासून किती दूर आहे, की समाजाबरोबर आहे याबरोबर माझ्या स्वत्वाची जाणीव मला स्वत:ला आणि इतरांना आहे का ? माझी भूमिका मी पूर्णपणे बजावते आहे का ? माझ्या भूमिकेशी मी प्रामाणिक आहे का ? अशा अनेक गोष्टींची जाणीव होण्यासाठी वरील सर्व प्रकल्पांमध्ये भाग घेणाऱ्या महिला व मुलींसाठी साप्ताहिक प्रेरणादायी व्याख्याने तसेच सहली, निवासी शिबिर हे उपक्रम घेतले जाऊ लागले. यातून गोष्ट घडली ती ही की प्रत्येक महिलेला 'स्व'-रूपवर्धिनी हे आपले माहेरघर आहे असे वाटू लागले व तिच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक परिवर्तन घडू लागले.

कुटुंबात असे म्हणतात की एक स्त्री शिकली की ते कुटुंब शिकते आणि किशाभाऊ म्हणायचे ती स्त्री शिकली की ते कुटुंब संस्कारित होते. म्हणून प्रत्येक महिलेला आपल्या वास्तूमध्ये चाललेल्या व्यावसायिक प्रशिक्षणाचा लाभ व्हायला हवा व सामाजिक जाणीवेचे, बांधिलकीचे संस्कारही व्हायला हवे. आत्ता मागे वळून पाहताना लक्षात येते की पंचवीस वर्षाचा काळ किती लवकर संपला हे समजलेच नाही. पण **शहरी व ग्रामीण भागात मिळून आतापर्यंत या प्रकल्पाचा फायदा घेणाऱ्या महिला व मुलींची संख्या अडीच-तीन हजारांपर्यंत नक्कीच गेलेली आहे.** सुरुवातीला वास्तूमध्ये जेव्हा वर्ग सुरू झाले तेव्हा ते किमान महिनाभर तरी नीट चालतील की नाही ? महिला आपल्याला साथ देतील का ? अशी भीती वारंवार वाटत असताना ग्रामीण भागात महिलांचे काम सुरू करताना कोणत्या अडचणी येऊ शकतात. त्यावर उपाय योजना कशी करायची याचे मात्र प्रशिक्षण आधीच्या अनुभवातून झाले असल्यामुळे ग्रामीण भागातील काम शहराइतकेच उत्तमरित्या आणि योग्य तऱ्हेने चालत आहे. अभ्यासक्रम संपल्यानंतर त्या महिलेच्या हातात मिळणाऱ्या पैशांमुळे तिच्या चेहऱ्यावरील आनंद आणि तिला तिच्या घरातून मिळणारी आदराची वागणूक हे तिच्या समाधानी चेहऱ्यावर दिसले की वाटते 'हो आपले काम योग्य रितीने व समाजाला तसेच वर्धिनीच्या नावाप्रमाणे योग्य असे चालू आहे.' त्यामुळे आता आपणही थांबू नये तर समाजातील ज्या घटकापर्यंत ही सेवा पोहोचणे गरजेचे आहे तिथपर्यंत जाऊन पोहोचावे असा निश्चय मनोमन होतो. कारण समाजातील महिलांचा ५०% भाग विसरून चालणार नाही तो सक्षम झाला तर आपल्या समाजाचा व पर्यायाने देशाचा उत्कर्ष नक्कीच साध्य होणार आहे. **किशाभाऊ म्हणायचे, आपल्या कामाचे माध्यम कोणतेही असो ध्येय मात्र एकच असावे व त्यात देशाचा, समाजाचा विचार झालेला असला पाहिजे. त्याच ध्येयाने शारदामणि महिला विभागाची गेले २५ वर्षाची अशा प्रकारे वाटचाल चालू आहे आणि अविरत परमेश्वराच्या आशीर्वादाने चालू राहील.**

**- पुष्पा नडे**

**संतोषासमान धन नाही, धैर्यासमान गुण नाही.**

# महिला विभागांतर्गत चालविले जाणारे उपक्रम

**सहाय्यक परिचारिका वर्ग -**

विविध रुग्णालयांमध्ये परिचारिका म्हणून मुलींची आवश्यकता भासते. वर्धिनीमध्ये दहावी पास/नापास मुलींसाठी या वर्गाची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला पुण्यामध्ये असणारा हा वर्ग पुणे शहराजवळील गावांमध्येही चालू झाला. पुणे, चाले, माले, पौड, आंबवणे, नसरापूर, वेल्हे इत्यादी ठिकाणी वर्ग चालू होते. सध्याला पुणे, येरवडा, नसरापूर, आंबवणे येथे सहाय्यक परिचारिका वर्ग सुरू आहेत.

वर्षभराचा हा अभ्यासक्रम असून सहा महिने तासिका व सहा महिने प्रात्यक्षिक असे या वर्गाचे स्वरूप आहे. के. ई. एम. रुग्णालयामध्ये या वर्गातील मुलींचे प्रात्यक्षिक घेतले जाते.

आजतागायत ३००० मुलींनी या वर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यातील काही जणी जहांगीर रुग्णालय, के. ई. एम. रुग्णालय, ससून रुग्णालय, कमला नेहरू रुग्णालय तसेच अन्य रुग्णालयांमध्ये आपली सेवा पुरवितात.

**प्रौढ साक्षरता वर्ग -**

महिला विभागाचे काम चालू करताना झालेल्या बैठकीमध्ये काही महिलांनी ''आम्हाला मराठी येत नाही, आमचे शिक्षण उर्दू भाषेतून झाले आहे मग आम्ही विविध विषयांचा अभ्यासक्रम कसा पूर्ण करणार'' असा प्रश्न उपस्थित केला. म्हणून अशा महिलांसाठी मराठी भाषेचे वर्ग सुरू करण्यात आले. उर्दू भाषिकांना मराठीचे प्रशिक्षण यात दिले जाऊ लागले. पण पुढे हा वर्ग प्रौढ लोकांसाठीही सुरू झाला. त्यामुळे या वर्गाला प्रौढ साक्षरता वर्ग हे नाव देण्यात आले. या वर्गाची पूर्ण जबाबदारी श्रीमती कबीर या पाहतात. २५ वर्षामध्ये जवळजवळ २०० जणांनी या वर्गाचा लाभ घेतला.

**बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग -**

बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाची सुरुवात १९९५ साली झाली. या वर्गाची सुरुवात करण्यासाठी घराघरात संपर्क झाले. संपर्काच्या वेळी अशी गोष्ट आढळली की १० वी नापास झालेल्या मुलींची संख्या खूप आहे. जवळजवळ ६० ते ६५% नापास झालेल्या, नाऊमेद झालेल्या, शिक्षण अर्धवट राहिलेल्या आढळल्या. त्यांच्याकरिता काहीतरी करावे, त्यांना ऊमेदीनं उभे करावे असे वाटू लागले. त्यातून बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाची कल्पना पुढे आली. लौकिक अर्थाने चालू शिक्षणपद्धतीने परीक्षा पद्धतीत नाकारलेल्या या मुली या प्रशिक्षणवर्गात रमून गेल्या. त्यांना खालील तज्ज्ञ शिक्षक-शिक्षिकांचे मार्गदर्शन लाभले- श्रीमती शुभदाताई बदामीकर, श्रीमती नलिनीताई अक्कलकोटकर, श्रीमती सुरेखाताई पेंडसे, श्री. जगताप, श्रीमती मंगलाताई मोडक, श्रीमती निर्मलाताई सोहनी, श्री. जयंतराव कवठेकर, श्रीमती पुष्पाताई नडे. या वर्गातील सर्व प्रशिक्षणार्थींना वर्धिनीच्या 'पाकोळी' बालवाडीत रोज प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण दिले जाते.

आजतागायत जवळजवळ ३०० मुलींनी या वर्गाचा लाभ घेतला.

**बाधा येतात, पण त्या काही चिरकाल टिकत नाहीत.**

**कौटुंबिक सल्ला केंद्र –**

मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये तणावाचे प्रसंग वारंवार येत असतात. अशा अवस्थेमध्ये या कुटुंबांना मार्गदर्शन व सल्ल्यांची आवश्यकता असते. वर्धिनीमध्ये दर मंगळवारी हा उपक्रम चालविला जातो. वस्ती विभागातील बहुतांश महिला या केंद्राचा लाभ घेतात. आजपर्यंत असंख्य कुटुंबांनी याचा लाभ घेतला व त्यांच्या कुटुंबामध्ये शांतीचे वातावरण पसरले.

**बचत गट –**

बचत हा गुंतवणुकीचा पहिला टप्पा. महिलांमध्ये बचत करण्याची सवय लागावी आणि संकटाच्या वेळी त्यांना पैशासाठी कोणासमोर मागणी करायला लागू नये म्हणून बचत गट ही संकल्पना उदयाला आली. पूर्वी वर्धिनीचे २५ बचत गट कार्यरत होते. या प्रत्येक बचत गटामध्ये २० महिला होत्या. मासिक बैठकीमध्ये विशिष्ट रक्कम या महिला बाजूला टाकत. वर्षअखेर ही बचत केलेली रक्कम व त्यावर ठराविक व्याज महिलांना मिळत असे. याच गटातील एखाद्या महिलेला कर्ज लागल्यास तेही उपलब्ध करून देण्यात येते. सध्या वर्धिनीचे १५ बचत गट कार्यरत आहेत.

**शिवणवर्ग –**

'स्व'-रूपवर्धिनीचा शिवणवर्ग हा स्त्रियांना स्वावलंबी बनवण्याकरिता सुरू झालेला आहे. वर्गात सतत मुलींना, स्त्रियांना सांगितले जाते की, समाजात जर तुम्हाला मान हवा असेल, तर काही ना काही कला तुमच्या हातात असली पाहिजे. मनापासून जर शिकलात, तर तुमच्या हाताला वळण लागेल व शिवणकलेतील बारकावे तुम्हाला समजतील. २५ वर्षामध्ये जवळजवळ १५०० मुली व महिलांनी या वर्गाचा लाभ घेतला. सध्या वर्धिनीच्या वास्तूमध्ये व पुण्यापासून जवळ असणाऱ्या विंग गावी वर्धिनीचा शिवणवर्ग चालविला जातो. याच वर्गामध्ये फॅशन डिझायनिंगचा वर्गही घेतला जातो.

**फॅशन डिझाइन अभ्यासक्रम**

मी एका खेड्यातून सर्वसाधारण कुटुंबातून आलेली एक युवती. शिवणकामाची फारशी माहिती नसलेली. योगायोगाने माझा 'स्व'-रूपवर्धिनीशी संबंध आला. मी वर्धिनीत सहा महिन्यांचा शिवणाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. मग फॅशन डिझायनिंगचा कोर्स केला. नंतर मला असे वाटू लागले की आपल्या या ज्ञानाचा, आपल्याला जिथे मार्गदर्शन लाभले, त्याच संस्थेत का उपयोग करू नये ? मी लगेचच वर्धिनीत फॅशन डिझाईन कोर्स शिकविण्यास सुरूवात केली. बाहेर मला हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी खूप पैसे मिळत होते. परंतु मला यासंबंधी 'स्व'-रूपवर्धिनीच्या कार्यकर्त्यांशी बोलले. ह्यांच्या परवानगीने त्या पैशांपेक्षा वर्धिनीचे महत्त्व मला जास्त वाटते. आतापर्यंत दोनशे ते अडीचशे मुलींनी 'स्व'-रूपवर्धिनी मधून शिवणकला शिकून घेतली आहे. ज्या मुली शिवणकाम शिकून गेल्या आहेत, त्या आज दरमहा दोन हजार ते अडीच हजार कमवत आहेत. कित्येक मुली बाहेरचे कपडे शिवून संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. ज्या ठिकाणी आपला पाया मजबूत झाला, त्या संस्थेला विसरणे कसे शक्य आहे ? माझ्या आयुष्यात वर्धिनी म्हणजे जणूकाही माझा आणि माझ्यासारख्या अनेकींचा आधारस्तंभच आहे.

**– सौ. दर्शना त्रिगुणाईत**

**ज्याने स्वत:ला ईश्वराची प्रार्थना करण्याची सवय लावून घेतली आहे तो सर्व अडचणींवर सहज मात करेल**

## संस्काराची शिदोरी

वर्धिनीच्या महिला विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या बालवाडी प्रशिक्षण वर्गामध्ये मी बालवाडी शिक्षिकेचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि काही वर्षे वर्धिनीच्या पाकोळी बालवाडीमध्ये शिक्षिका म्हणून काम केले. पुण्याबाहेर असतानाही वर्धिनीतून मी कोणती शिदोरी घेऊन गेले हा प्रश्न मला विचारला तर मी चटकन उत्तर देते, **''आयुष्यभर पुरेल इतकी भरगच्च शिदोरी वर्धिनीने मला दिली. प्रत्येक स्त्रीस मातृहृदय लाभले आहे. ही शिकवण देणारा जिवंत प्रसंग मी वर्धिनीत पाहिला.''**

समाजसेवक, आई, मैत्रिण अशी अनेक रूपे मी पुष्पाताईंमध्ये पाहिली. बालवाडीच्या एका विद्यार्थिनीला शौचास जायचे होते. म्हणून मी तिला शौचास बसवून शिपाई मावशींना शोधू लागले. तेवढ्यात अनपेक्षितपणे पुष्पाताई आल्या. त्यांनी मला वर्गामध्ये नसल्याबद्दल विचारले. मी त्या मुलीबद्दल सांगितल्यावर त्या काही न बोलता मुलीकडे गेल्या. ती घाबरून रडत होती. **त्यांनी स्वत: तिला स्वच्छ केले व जवळ घेतले. या प्रसंगातूनच मला सेवाकार्य कसे करावे हा धडा मिळाला.** सासरी गेल्यावर माझ्या मावससासूबाईंना कर्करोग झाला. मावस सासरेसुद्धा वृद्धापकाळामुळे अंथरुणाला खिळून होते. त्यावेळी त्यांची सर्व प्रकारची सेवा करण्याची शक्ती मला पुष्पाताईंच्या वरील प्रसंगातून मिळाली. लग्न हा प्रत्येक मुलीच्या आयुष्यातला परिवर्तनाचा खूप मोठा टप्पा. वर्धिनीत काम करत असतानाच घरच्यांनी माझे लग्न ठरवले. लग्नपत्रिका देण्यासाठी मी संस्थेच्या कार्यालयात गेले. सासरी गेल्यावर वर्धिनीत पुन्हा कधी यायला मिळणार या विरहाने मन अस्वस्थ झाले होते. माझी चलबिचल स्वर्गीय किशाभाऊ पटवर्धन सरांनी पाहिली आणि मला सावरण्यासाठी त्यांनी मला प्रश्न विचारला, ''लग्नात गहू-ज्वारी सोडून तांदळाच्या अक्षता का टाकतात?'' मी निरुत्तरीत होते. थोड्या वेळाने सरांनीच उत्तर दिले, **''तांदळाचे रोप एका शेतात तयार केले जाते व दुसऱ्या शेतामध्ये वाढवले जाते. मुलीचं आयुष्यही असंच. माहेरी जी संस्काराची शिदोरी मिळाली, ती लग्नानंतर माहेरचा उंबरठा ओलांडून सासरी घेऊन जायची. एवढंच नव्हे तर तिथे ती रुजवायची, फुलवायची आणि असंख्य माणसांची मने जोडायची. त्यामुळेच लग्न हा खूप मोठा संस्कार आहे.''**

वर्धिनीचं काम सोडून १८ वर्षे झाली. पण वर्धिनीत मिळालेलं हे उपदेशांचं संस्कारांचं गाठोडं म्हणजे माझा खूप मोठा अनमोल असा खजिना. यामुळेच की काय माझा संसार फुलला आहे.

**– सौ. वल्लरी गणपत खलाटे, फलटण**

Donate Generously
For Vanvasi Welfare
to
Shri Sunder Narayan
Ganesh Sanskar Kendra

Deobandh
Taluka - Khodala,
Dist. Thane

**Inserted by**
**S. R. Pusalkar & Co.**
Mumbai

**भक्तीतून अशक्यदेखील शक्य होते.**

# 'स्व'-रूपवर्धिनी एक परिसस्पर्श

'स्व'-रूपवर्धिनी अगदी नावाप्रमाणे स्वत:चे रूप वर्धित करण्यासाठी, ओळखण्यासाठी प्रवृत्त करणारी एक वास्तू. या इमारतीला पाहताना फक्त ४ मजले, तळमजल्याची सुविधा खेळ व्यायाम किंवा ओपन हॉल म्हणून आणि चौथा मजला म्हणजे एकांत अभ्यासिका, ग्रंथालय. अशा महत्त्वाच्या बारीकसारीक गरजांचा विचार संस्थापक श्री. किशाभाऊ पटवर्धन सरांनी केला. सरांची दूरदृष्टी, संपर्काच्या माध्यमातून वर्धकाशी बांधले गेलेले आपुलकीचे नाते, हक्काने मार्गदर्शन, त्या विद्यार्थ्याला येणाऱ्या अडचणींची जाणीव आणि त्याच्या कमतरता भरून काढण्याची तयारी याबरोबरच अनेक निरनिराळ्या क्षेत्रातील नावाजलेल्या व्यक्तीचा सहवास आणि त्यांच्याशी येताजाता पटकन सरांची हाक आली की जायचं आणि स्वत:चा परिचय करून द्यायचा. मग इतर वर्धकाने आणि सरांनी वर्धिनीतील आपल्या कामाची ओळख त्या व्यक्तीला आपल्यासमोर करून आपला उत्साह वाढविण्याने कौतुकाने अप्रत्यक्ष स्फूर्ती, ज्ञान त्यांच्याविषयी कुतुहल निर्माण करून विचार करायला लावणारी, या आणि अशा 'जिथे तुम्ही कमी तिथे आम्ही' या उक्तीप्रमाणे माझ्या आयुष्यात मला 'स्व'-रूपवर्धिनीतील माझ्या संपर्कात आलेले युवक, युवती, कार्यकर्ते आणि प्रत्येक वर्धक त्याचबरोबर शाखेत दिवसभर चालणारे विविध उपक्रमाने बजबजलेली इमारत, संपर्काच्या माध्यमातून मिळालेला आनंदी राहण्याचा दृष्टिकोन, विविध छोट्या मोठ्या सहली, निरनिराळ्या विषयांची शिबिरे या प्रत्येकाचा मला झालेल्या परीस स्पर्शामुळे मी स्वत:ला प्रतिकूल विचारांच्या वातावरणामध्ये परिस्थितीला तोंड देत प्रसंगी घरच्यांच्या मताविरुद्ध इतर माझ्या शाखेतील सहकारींच्या मनाविरुद्ध निर्णय घेत घडत गेले आणि वेळेची गरज पाहून निर्णय घेण्याची प्रवृत्ती, कोणतेही काम हलके किंवा भारी नसते त्याला आपण हलके किंवा भारी, स्वच्छ किंवा घाण, व्हाईट किंवा ब्लॅक वर्क बनवतो, काम कामच असते हा शिबिरांच्या नियोजन बैठकांतून मिळालेला अप्रत्यक्ष दृष्टिकोन मला 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये मिळाला.

आयुष्य घडवताना आईवडिलांचे रोजच्या जगण्यातील सत्याचे प्रयोग, जग कसेही असो तुम्ही चांगले आणि खरे वागा जेणेकरून समोरच्यालाही नाईलाजाने तुमच्याशी चांगले वागणे भाग पडेल. चांगले ते घ्या वाईट ते सोडा असे वरचेवर सांगणारे आईवडील मेहनत करून स्वाभिमानाने जगा याची शिकवणी घरातून मिळताना वर्धिनीमध्येही बागेश्रीदीदीच्या परीसस्पर्शाने मला वास्तूमधील अनमोल सोन्याचा खजिना मिळाला आणि आजही आयुष्याच्या कठीण वळणांवर या खजिन्यातील विविध प्रासंगिक आठवणींनी अस्वस्थ मन सुखावते, आत्मविश्वास वाढवते. आजही आम्ही चार बहीण भाऊ, आई एकत्र आलो की वर्धिनीच्या गप्पा तासनतास चालतात, त्यातून आमची मुलेही वर्धक झाली आहेत. त्यांना वर्धिनीची स्फूर्ती गाणी आवडतात, सुट्टीतील सहलींसाठी, गडभ्रमंतीसाठी जितूमामाच बरोबर पाहिजे ही मुलांची अट मनाला ताजेतवाने करते. यातही आनंद शोधून अप्रत्यक्ष वर्धिनीचा परीसस्पर्श जितूमुळे होतच असतो.

प्रेमळ आईचे माहेर प्रथम असले तरी 'स्व'-रूपवर्धिनी माझे हक्काचे माहेर आहे. केवळ संसारिक आणि व्यावसायिक जबाबदारीमुळे मला वर्धिनीचा सहवास दुरावतो आहे याचे वाईट वाटते.

'वर्धिनीत यायचे समर्थ व्हावया, समर्थ मायभूमीला जगी करावया...'

**– ॲड. भाग्यश्री बोरा**

**जोपर्यंत माणसाच्या वासना कायम आहेत तोपर्यंत पुनर्जन्म अटळ आहे.**

# मला भावलेली वर्धिनी


वर्धिनीच्या दहा पायऱ्या चढून वर आल्यावर मनात विचार आला, 'या दहा पायऱ्यांसारखीच गेली दहा वर्षेही कशी भुर्कन् उडून गेली इथे येऊन !' संसार करताना स्त्रीच्या मनात कधी येतं का किती वर्षे झाली ते ? तिचं सारं अस्तित्त्वच त्या संसारात सामावून गेलेलं असतं. वर्धिनीच्या सहवासातही माझं तसंच झालंय ! इथं अगदी घरातल्या सारखंच प्रेम, आपुलकी, आदर, आस्था आणि आनंदही ! वर्धिनीत प्रवेश झाला तो मनाच्या एकाकी अवस्थेत! पण वर्धिनीनं हळुवार फुंकर घालून, हे एकाकीपण नाहीसं केलं. बालवाडीच्या लहान गटाचं काम पाहू लागले आणि आजतागायत त्यातच रमले. या वयाच्या मुलांना सांभाळणं म्हटलं तर सोपं, म्हटलं तर फारच कठीण. सर्वच गोष्टी नवीन. शाळा म्हणजे काय ? बाई म्हणजे काय ? सर्वच न उमगणारं. आणि या न कळत्या अज्ञानी वयातल्या छोट्यांना ज्ञानाची हळूच, नकळत ओळख करून देणं, म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हे ! पण प्रत्येक वेळेस आव्हान स्वीकारून नवनिर्मितीचा जो आनंद वर्षअखेर मिळतो, तो शब्दात सांगणं कठीण. इथं आल्यानंतर या मुलांना घडवताना आपल्या कलागुणांना विकसित करण्याची संधी मिळते. बालवाडीत माझ्या कल्पनांना अधिक वाव मिळाला असा माझा अनुभव आहे. बालवाडीच्या प्रमुख स्वत: नवनवीन उपक्रम राबवीत असतात आणि इतरांनाही संधी देतात. एकूण इथं साचेबद्धता नाही. मुलांचं हे वय आहे चौफेर बागडायचं, ताणरहित जीवन जगण्याचं. याचा पूर्ण विचार करून इथले वर्षभराचे कार्यक्रम आखले जातात. इथं साजरे होणारे बालचमूंचे सण, उत्सव तर मोठ्या माणसांनाही थक्क करून सोडणारे असेच असतात. अहो, आमचा 'विठोबा' आणि आमची 'दिंडी' पहाल, तर म्हणाल वारीच घडली. विठोबाचं दर्शन झालं, डोळ्यांचं पारणं फिटलं ! अनुभवाच्या, वाढत्या वयाच्या देणगीमुळे तयार झालेल्या पक्व बुद्धीलाही कधीकधी या मुलांच्या अचाट प्रश्नांना असे काही सामोरं जावं लागतं की, बस्स् ! एकदा एका चिमुरड्यानं विचारलं, 'आजी कुककुक गाडीला किती चाकं असतात ?' मुलांना गाडीला चावी देता येत नाही म्हणून चावी देऊन गाडी सोडली, तर एकजण म्हणाला, 'बाई खेळ आमचा आहे की, तुमचा ?' 'कावळ्यानं हुशारीनं' एकेक खडा टाकून रांजणातील पाणी वर आणलं नि प्यायलं, ही गोष्टी अगदी रंगवून रंगवून सांगितल्यावर एकजण म्हणतो कसा, 'वेडाचं आहे, 'स्ट्रॉ नाही का घ्यायचा ?' बोला, काय उत्तर देणार ! मन भारावून जाते अशा वेळेस आणि त्या क्षणी मिळणारा आनंद अवर्णनीयच ! वर्धिनीत तसे बरेच उपक्रम चालतात. बालशाखा, शिवणवर्ग, अभ्यासिका, एक ना अनेक. प्रत्येक क्षेत्राशी रोजचा संबंध येत नसला, तरी रेल्वेच्या डब्यांसारखे येथील सर्व विभाग एकसंघ, एकत्रित आहेत. **प्रत्येक व्यक्तीत काही सुप्त गुण असतात. परमेश्वराने प्रत्येकाला काही ना काही 'प्लस पॉइंट' दिलेला असतो. त्याला असं वाटत असतं की, दैनंदिन कर्तव्यापेक्षा काहीतरी अधिक, पण वेगळं करावं. प्रत्येकाला ते जमतंच असं नाही, विशेषत: स्त्रीला. पण वर्धिनीमुळे उशीरा का होईना, संसाराव्यतिरिक्त काही वेगळं करण्याचा आनंद मला इथे मिळाला. याचं ऋण शब्दात फेडता येण्यासारखं नाहीत.** अहो ! मला वाटते ही एकच अशी संस्था असेल की, जिथे रिटायरमेंटला वयाची मर्यादा नाही. भगवंताकडे आता एकच प्रार्थना आहे की, त्यानं माझी गात्र शेवटच्या क्षणापर्यंत चालू ठेवावीत आणि वर्धिनीच्या पायऱ्या शेवटच्या क्षणापर्यंत चढता याव्यात !

**- श्रीमती कमलताई टाककर**

**एका खोलीतून आत्मा काढून तो दुसऱ्या खोलीत शिरवावा, तसे पुनर्जन्माचे आहे.**

## बांधिलकी 'स्व'-रूपवर्धिनीशी

'स्व'-रूपवर्धिनी हे नावच अर्थपूर्ण आणि बोलकं आहे. 'स्व'-रूपवर्धिनीची उद्दिष्टे म्हणा किंवा नकळत घडणारे संस्कार म्हणा; पण ते या संस्थेत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कळत नकळत स्वत:त केव्हा मुरले जातात हे समजतच नाही. कारण हा परिवार सर्वांनाच जिव्हाळा आणि आपुलकी देतो. परिस्थितीचा शाप असो अथवा सभोवतालचा ताप असो, सदैव परिस्थितीवर मात करायला शिकविणारी ही कार्यशाळा आहे. एवढेच नाही, तर ती प्रगतीपथावरही आणून सोडते.



ही एक संघटना आहे. तेथील व्यक्तींच्या सहवासातून बरेच काही शिकायला मिळते आणि संस्कार आपल्यात एकजीव होतात. याचं श्रेय जर कुणाला द्यायचं असेल तर या संस्थेतील तळमळीचे कार्यकर्ते आणि व्रती शिक्षक यांनाच ते द्यावं लागेल. त्यांच्या संपर्कात आल्यावर येणारी व्यक्ती कळत नकळत 'स्व'-रूपवर्धिनीकडे आपोआप आकृष्ट झाली नाही तरच नवल म्हणायचे ? स्वत:ला सर्व काळ संस्थेला वाहून घेणारी ही व्यक्तिमत्त्वं आहेत. कंटाळा किंवा थकणे या शब्दप्रयोगांना यांच्या लेखी स्थानच नाही.

माझा आणि वर्धिनीचा संपर्क येण्यापूर्वी मी बरंच काही अनुभवलं होतं. सोसलंही होतं. वयाच्या तिसऱ्या वर्षी वडिलांचं छत्र हरवलं आणि जवळ जवळ सर्व आयुष्य स्वत:च्याच हातांनी घडवावं लागलं. आधी मामाच्या घरी मॅट्रिकपर्यंत. तिथून मुंबईच्या के. ई. एम. मध्ये. तेही मामाच्या घरी परतण्याचे सर्व दोर कापून. १०-११ तास काम. शिवाय नर्सिंगचा अभ्यास. खूप अडचणी. आणि यात भर म्हणजे अँग्लो इंडियन सिस्टरची तिरस्कारयुक्त बोलणी. अशी तीन वर्षे काढावी लागली. पण परिक्षेत मात्र उत्तम यश. मग मिडवायफरी कोर्स. त्यातही सुयश. मग दिल्लीच्या कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये 'पोस्ट ग्रॅज्युएट' ट्रेनिंग. पुढे सौराष्ट्र-गुजरात. खूप चांगल्या लोकांचा सहवास आणि अनुभवांचा साठा. तेथून के. ई. एम., पुणे, एक वर्ष कॉलेज ऑफ नर्सिंग, बोस्टन. हा सगळा प्रवास होऊन २८ वर्षे के. ई. एम. नर्सिंग कॉलेजची जबाबदारी पार पाडली. आता निवृत्तीनंतर वर्धिनीत आले आहे.

आपल्या देशातली बालकं ही आपल्या देशाची मानवी संपत्ती आहे. सामाजिक बांधिलकीचा अभाव असल्यानं ज्यांनी जाणतेपणानं या संपत्तीचा उपयोग देशोद्धाराकरिता करायचा तेच ती उधळून लावताहेत. मला हे जाणवलं आणि मी वर्धिनीत रमले. गृहरुग्ण परिचर्या वर्गाचं (Home Nursing Course) काम मी इथे करते. तेव्हा या मुलींच्यातून, महिलांच्यातून 'स्वत:च्या पायावर उभ्या असलेल्या महिला' वर्धिनीला उभ्या करायच्या आहेत याचं भान मी विसरू शकत नाही. आणि हव्याहव्याशा वाटणाऱ्या या बांधिलकीच्या जाळ्यात स्वत:ला गुंतवून घेते.

**– श्रीमती जयवंती कलबाग**

**सर्व वासना ईश्वरचरणी अर्पण कराव्यात व त्याला शरण जावं हे सर्वात चांगलं.**

## प्रयत्न सावरण्याचा

गेली पाच वर्षे 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूमध्ये कौटुंबिक समस्या, कलह सोडविण्याच्या संदर्भात मार्गदर्शन करणारं एक केंद्र चालवलं जातं. 'स्व'-रूपवर्धिनीच्या विचारप्रणालीला अनुसरून कुटुंबात सामंजस्य निर्माण करण्याच्या प्रयत्नाला प्राधान्य दिलं जातं. यातूनही मार्ग न निघाल्यास कायदेशीर प्रक्रियेच्य बाबतीतही मार्गदर्शन व साहाय्य केलं जातं. हे केंद्र दर मंगळवारी तीन ते पाच या वेळात 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूतच चालविले जाते. यंदाच्या वर्षी अंदाजे चाळीस प्रकरणे या केंद्रानं हाताळली. यापैकी बारा ते तेरा प्रकरणांमध्ये सामंजस्यानं मार्ग काढण्यात यश आले. सुमारे आठ ते दहा प्रकरणी कायदेशीर प्रक्रियेत साहाय्य केले. उर्वरित प्रकरणात अद्यापि तडजोडीचा प्रयत्न चालू आहे.



सामंजस्यानं मार्ग काढण्याकरता खूपच प्रयास पडतात. एक नांदतं कुटुंब. पती-पत्नीत बेबनाव होतो. पत्नीला असह्य छळ भोगावा लागतो. छळ इतका की शेवटी मन घट्ट करून आपल्या मुलींना टाकून तिला घरातून निघून जावं लागतं. पती पोलिसात तक्रार नोंदवतो. इथपर्यंत पोचलेल्या प्रकरणातही केंद्रानं अत्यंत कुशलतेनं मार्ग काढला. उभयतांची समजूत काढली. शेवट अत्यंत गोड झाला. मुलींना आई मिळाली, आईचं प्रेम मिळालं.

कायदेशीर प्रकरणात जवळजवळ सात-आठ प्रकरणी पत्नीला पोटगी मिळवून देण्यात आली. एका ख्रिश्चन मुलीच्या बाबतीत केंद्राला एक वेगळ्या प्रकारचे कायदेशीर प्रकरण हाताळण्याचा अनुभव आला. ख्रिश्चन विवाह कायद्यात स्वातंत्र्योत्तर काळातही कोणताही बदल न झाल्यानं ख्रिश्चन महिलांना कितीही आवश्यकता असली तरी त्वरित न्याय मिळू शकत नाही. अशा स्थितीत मेरी आमच्या केंद्राकडे आली. विवाहाच्या पहिल्या दिवसापासूनच मेरीच्या पतीला तिच्याबद्दल काडीचीही आपुलकी, प्रेम वाटले नाही. दोघांच्यात प्रारंभापासूनच जवळिकीऐवजी दुरावाच रहात आला. एकाच घरात असूनही दोघंही विभक्त राहू लागले. नावापुरतेच पती-पत्नींचे नातं राहिलं. हे एक वेगळंच प्रकरण होतं. शेवटी ख्रिश्चन कायद्याच्या चौकटीतच पण एक धाडसी पाऊल केंद्रानं उचललं. घटस्फोटाऐवजी हा 'विवाह' विवाहच नाही असा निर्णय कायदेशीर लढाई देऊन मिळवण्यात केंद्राला यश आले.

एकूण सर्व प्रकरण हाताळताना काही बाबी लक्षात येतात. पती-पत्नींचा पराकोटीचा अहंकार, पराकोटीचे गैरसमज दुराव्याच्या मुळाशी असतात. पुरूषी अहंकार किंवा अहंगंड असतो. उभयतांच्या नातेवाईकांचे अनावश्यक हस्तक्षेप असतात. याचा परिणाम म्हणून कुटुंब उध्वस्त होतंच पण कोणताही अपराध नसलेल्या मुला-बाळांचं, एक प्रकारे आपल्या राष्ट्राच्या भावी धनसंपत्तीचं भवितव्य अंधारून टाकलं जाते याचा विचार समाजानं विशेषत: अशा प्रश्नांशी संबंधित असलेल्या सर्वांनीच करावा असे केंद्राला तळमळीनं वाटतं.

**– ॲड. सौ. निलिमा गोखले**

**सर्व वासना ईश्वरचरणी अर्पण कराव्यात व त्याला शरण जावं हे सर्वात चांगलं.**

## संगोपन परिसरातल्या परिवारांचं

बालवाडी, बालशाखा, निरनिराळ्या शाखा यांच्या माध्यमातून पालकांशी संपर्क वाढला आणि पाल्य-पालक-परिसर अशी एक साखळी तयार झाली. हळूहळू या परिसरासाठी आरोग्य सेवा केंद्र सुरू करण्याची कल्पना पुढे आली. हे सेवा केंद्र फक्त आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देणारे नसावे तर आरोग्य शिक्षण देणारे असावे असेही ठरले आणि के. ई. एम. हॉस्पिटलच्या सहकार्यातून 'स्व'-रूपवर्धिनीने माता बालसंगोपन केंद्राची सप्टेंबर १९९२ पासून सुरुवात केली. समाजाचे स्वास्थ्य हा महत्त्वाचा घटक आहे आणि कुटुंबकल्याण व बालविकास या आघाड्यांवर हे स्वास्थ्य सुदृढ असेल तर तो समाज नक्कीच बाळसं धरेल.



के. ई. एम. हॉस्पिटलद्वारे 'स्व'-रूपवर्धिनीत माता बालसंगोपन केंद्र सुरू झाल्याला सप्टेंबर १९९७ रोजी ५ वर्षे पूर्ण झाली. उपेक्षित वस्त्यांमधील स्त्रियांचे आरोग्य, कुटुंबनियोजन, लसीकरण अशा अनेक गोष्टींकरिता मुख्यत: हा उपक्रम राबविला जातो. कुटुंबनियोजन, पोषक आहार, वैयक्तिक स्वच्छता, लहान वयांमधील लग्ने व त्यांचे दुष्परिणाम अशा अनेक विषयांचे शिक्षण देण्याचेही काम येथे चालते. स्त्रिया व मुलांकरिता चालविण्यात येणाऱ्या या केंद्राचा आठवड्यातून दोनदा ५० ते ६० व्यक्ती फायदा घेतात. १९९२ साली आठवड्यातून एकदा चालणाऱ्या या केंद्राचा १५-२० जण फायदा घेत. त्याच्या तुलनेत आता लक्षणीय वाढ झाली. केंद्रात किरकोळ आजारांवरही तत्काळ उपाय केले जातात व निष्णात डॉक्टरांकडून तपासणी करून पुढील काही चाचण्या आवश्यक असल्यास अशा रुग्णांस के. ई. एम. हॉस्पिटल तर्फे तपासले जाते व अल्प दरात उपचार केले जातात. नुसती वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा हेतू नाही. प्रत्यक्ष काम करताना संबंधित कुटुंबांना महिन्यातून एकदा नियमितपणे भेट दिली जाते व विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा होऊन सल्ला दिला जातो.

१) गर्भधारणेपूर्वी घेण्याची काळजी. मुलाच्या जन्मानंतर घ्यायची काळजी.

२) मुलांचे लसीकरण.

३) जोडप्यांशी सविस्तर चर्चा व त्यांनी कुटुंब नियोजनाच्या विविध उपायांचा विचार करून साधनांचा वापर करावा यासाठी त्यांनी केंद्र प्रमुखांची भेट घ्यावी असे प्रयत्न केले जातात. ज्यांना या साधनांचा उपयोग करायचा आहे त्यांना ती उपलब्ध करून देणे, वंध्यत्वीकरणाच्या शस्त्रक्रिया करणे व त्याचे अनुधावन करणे ह्या गोष्टी नियमितपणे केल्या जातात.

❖ ❖ ❖

**माणूस काम करणार नाही तर त्याचं मन निरोगी कसं राहील ?**

## माझं सुख माझं सुख, हंड्याझुंबरा टांगलं
## माझं दु:ख माझं दु:ख, तळघरात कोंडलं!

तिने स्त्रियांची सुखदु:खे मुलायम हिरवळीवर बसून न्याहाळली नाहीत किंवा टिपली नाहीत तर त्यांच्या सुखदु:खात समरस होऊन क्षणभर त्या अनुभूतीने जीवन ती जगत आली आहे. त्यामुळे त्यांच्या सुखाने ती जशी सुखावली तसेच त्यांच्या दु:खाचे ओरखाडेही तिच्या मन:पटलावर कोरले गेले. स्त्रियांच्या अडचणी, दु:खे, त्यांच्या वेदना तिच्या हृदयास स्पर्शून त्यांनी तिला चिंतनशील बनवलंय. त्यामुळे स्त्रियांच्या कामातील अनुभव काय लिहावे हा प्रश्नच तिला पडत नाही. एक नाही, दोन नाही असे अनेक अनुभव तिला या कामात आले आहेत. कोणते लिहावे हाच फक्त प्रश्न. तारेवरची कसरत करत करत हसतमुखाने संसारात रमणाऱ्या महिलांचे अनुभव सांगावेत की टांगती तलवा डोक्यावर असतानाही चेहऱ्यावर हास्य ठेवून सतत आपल्या मुलांच्या सुखदु:खांचा विचार करणाऱ्या महिलांची दु:खे सांगावीत. नियतीने स्त्रीची किती अवहेलना करावी? कधी तिला म्हटले जाते 'स्त्री ही क्षणाची पत्नी अन् अनंत काळची माता असते' म्हणून तिला अगदी उच्च पदावर नेऊन ठेवलंय. तर, कुठे 'तुझी जागा इथेच' 'पायातली वहान पायातच ठेवावी', म्हणून तिची इतकी दीन अवस्था करून ठेवली आहे की मग असं वाटतं आपल्या समाजात अशा बुरसटलेल्या रुढी कधीच संपणार नाहीत का! यांचा अंत कधी होणार नाही का?



का होणार नाहीत ? प्रयत्नांमुळे सर्व काही जमू शकतं असा विचार तिच्या मनात आला. कारण तिचे काम तेच होते. स्त्रियांचे काम करताना 'स्व'-रूपवर्धिनीचे उद्दिष्ट तिच्या डोळ्यांसमोर होतेच. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करायचा... ''अगं, तू काही समाजाला ओझे नाहीस. जशी तुला या समाजाची गरज आहे. तशी तुझीही गरज समाजाला आहे. चार भिंतीत राहिल्याने तुझे गुण तुला दिसले नाहीत.'' असे ती वेदनेने व्याकुळ झालेल्या, अडचणीत सापडलेल्या स्त्रियांना सांगते. अन् मग तिला एखाद्या होमनर्सिंग कोर्स करून गेलेल्या मुलींचे पत्र येई ''खरंच मी आता माझ्या पायावर उभी आहे. तुमच्यामुळे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे. मला सध्या १२०० रु. पगार मिळतो. त्यामुळे माझे घरातील स्थानही आता उंचावले आहे. तुम्ही म्हणत होता ते खरं आहे. आपलीसुद्धा गरज समाजाला असते.'' किंवा एखाद्या मुलीची सारखी पत्रं येतात, ''ताई, तुम्ही माझे काम एकदा पाहून जा! तुम्ही आलात तर मला खूप आनंद होईल.'' ही खरंतर परीक्षेत नापास झालेली पण केवळ येथील वर्ग चालू असताना मधून मधून व्याख्यानं दिली जात किंवा महिलांशी गप्पा मारताना ती ते मन लावून ऐकत असे. तिच्या मनात सतत न्यूनगंड असे की आपल्याला काही येत नाही. तेव्हा तिला सतत सांगावे लागे. ''अगं, अशी कोणतीच व्यक्ती नाही की जिला काही येत नाही. तू अभ्यासात कच्ची असशील, पण तुझा सेवाभाव जागृत ठेव. त्यातून तू पुढे जाशील.'' ही मुलगी आता एक खोली घेऊन आपल्या आईला सांभाळते आहे.

कित्येक स्त्रियांची तर तिला गंमत वाटते. नवऱ्याने टाकेल म्हणून आपण आपल्या पायावर उभे रहावे. यासाठी जिवाचा आटापिटा करून या महिला होमनर्सिंगसारखा कोर्स करतात. अन् कुठूनतरी हा कोर्स उत्तमरीतीने केल्यावर त्यांच्या सुदैवाने त्यांना एखादे चांगले काम मिळते. अशा वेळी त्यांच्या

**कुणालाही दिवसाचे २४ तास जप-ध्यानात घालविणे शक्य नाही.**
**म्हणून प्रत्येकाने स्वत:ला कुठल्यातरी कामात गुंतून घेतले पाहिजे. त्यामुळे मन उत्साही राहते.**

कुटुंबाला मग ती आपल्याजवळ हवी असते.
अगदी आपल्या कामाला अनुरूप अशा आमच्या एक शिक्षिका, स्वत:ची चूल व्यवस्थित पेटते आहे. पण माझ्या आजूबाजूच्या महिलासुद्धा आपल्या संसारात सुखी असाव्यात असे वाटणाऱ्या या बाई! एक दिवस तिच्याकडे आल्या व म्हणाल्या, ''ताई, मला वाटते आपण या शिवणवर्गातून बाहेर पडलेल्या महिलांसाठी काहीतरी व्यवसाय सुरू करू या. तुम्ही आम्हाला साथ द्या, आम्ही बाकी सर्व पाहतो.''
हे ऐकून तिला आनंदही झाला.
पण, ''अहो, तुम्हाला हे जमणार का? तुमची घरातली कामे, मुलांना शाळेत पोहोचविणे, शिवाय तुमच्या घरातील वातावरण, या गोष्टींचा विचार केलात का?''
''तुम्ही काळजी करू नका. आम्हा स्त्रियांना इथे आलो की खूप उत्साह वाटतो. खूप काहीतरी करावेसे वाटते. फक्त तुमची साथ हवी.'' दुसऱ्या दिवशी अकरा जणी जमा झाल्या. त्या प्रत्येकीने २०० रु. भांडवल घालून पेटीकोट शिवण्याचा व्यवसाय सुरू केला.
एक दिवस तिला बैठकीला येता आले नाही. उदास चेहरा! त्या उदास चेहऱ्यावरील ते केविलवाणे हास्य पाहून तिने विचारले, ''का हो काय झाले? बरे वाटत नाही का?'' ''नाही हो! मी आज बैठकीला येऊ शकले नाही. तेच सांगायला आले. काय सांगू ताई, आता खरंच, सहन होत नाही. काल नवऱ्याने खूप मारले. वर आपणच कांगावा करून मला व मुलांना चौकीत ठेवले. आता मी चौकीवरून येत आहे. मुलं घरी गेलीत. माझी वाट तुम्ही पाहू नका. हेच सांगायला आले होते. बैठक झाली का?'' त्या बोलत होत्या, व ती सुन्न मनाने त्यांच्याकडे पहात होती. आपल्याच मनाशी विचारत होती. कुठून येते एवढी ताकद? एवढी सहनशीलता? ही... आईमध्येच असू शकते. मुलीच्या ओढीने ती ते सर्व करत असते. तिला आपली मुलं खूप मोठी करायची असतात ना!
वर्धिनीत मार्गदर्शनाकरिता येणाऱ्या एक ज्येष्ठ भगिनी एक दिवस म्हणाल्या, ''आपण निटींगचा (स्वेटर विणण्याचा) वर्ग सुरू करू या. मला ती कला अवगत आहे. मी येऊन शिकवत जाईन. आपण निटींगची मशीन घेऊ या!'' यावर ती म्हणाली, ''अहो वहिनी, तुम्हाला कसे जमेल? तुम्ही राहायला विठ्ठलवाडीला. शिवाय दोन लहान मुलं. त्यांची शाळा अन् तुमच्या घरचा व्यवसाय आहेच की. त्यातून रविवार हा एकच सुट्टीचा दिवस!'' त्यावर त्या म्हणाल्या, ''तुम्ही काही काळजी करू नका! मी दर रविवारी चार तास शिकवत जाईन.'' त्यांच्या आग्रहाखातर वर्ग सुरू केला व म्हणता म्हणता त्यातील दोन महिलांनी स्वत:च मशिन घेऊन आपल्या घरात व्यवसाय सुरू केला.
असाच एक हृदयद्रावक प्रसंग. दु:ख-दु:ख म्हणून किती? त्याला सीमाच नाही. तिनेच साठविलेल्या पैशावर वडिलांनी तिचे लग्न लावून दिले. सुंदर स्वप्न उराशी बाळगून ही पुण्याला आपल्या सासरी आली. नवरा व्यसनी व सासरच्या लोकांची साथ नाही. सासरी छळ व माहेरी दारिद्र्य अशी अनेक स्त्रियांची अवस्था. अशा मनाच्या भरकटलेल्या अवस्थेत असतानाच चालत्या ट्रेनमधून पडली व दोन पाय गमावून बसली. तिने ससूनमध्ये जाऊन सतत संपर्क केला. ''जे झालं त्याचा विचार सोडून दे. परमेश्वराने तुला यातूनही जिवंत ठेवलं ना! मग नक्कीच तुझ्या हातून खूप चांगले काम होणार आहे. सुमन, तुझ्यासारख्या इतरांसाठी आता तुला जगता आलं पाहिजे.''
सुमनच्या मनाची ताकद वाढविण्याचा हा प्रयत्न फळास आला. परवाच तिला तिचे पत्र आले. 'ताई मला आता छोटे बूट मिळाले आहेत. मी आता हळूहळू चालते व एके ठिकाणी अपंगांच्या बरोबर नोकरी करते' हे वाचून मनोमन परमेश्वराला हात जोडले अन् ती म्हणाली, 'खरंच तू थोर आहेस.'
अशी अनंत अनुभवांची शिदोरी गोळा करत महिलांशी ती कधी समरस झाली हे तिलाच कळले नाही.

**- श्रीमती पुष्पाताई नडे**

**मनाला ढिलं न सोडता कामाला लावणं केव्हाही अधिक चांगलं !**

## केंद्रीय वृत्तांत

### ❖ मकर संक्रमण उत्सव

शाखा विभागाचा संक्रांत उत्सव हा जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडियमवर संपन्न झाला. सूर्यनमस्कार, बोथाट्या, सायकलिंग, मानवी मनोरे, Man of Art, योगासने, नानचाकू या प्रात्यक्षिकांच्या सादरीकरणाद्वारे वर्धक वर्धिकांनी प्रेक्षकांची व पाहुण्यांची मने जिंकली. 'बल हेच जीवन' या उक्तीप्रमाणे संघटन, बल याची प्रचिती आली. कार्यक्रमामध्ये भगिनी निवेदिता शाखेतील युवती कु. सरोज शिंदे व धर्मवीर शंभूराजे शाखेतील वर्धक कु. अशिष गावडे यांनी संवाद रूपात गतवर्षाचा वृत्तांत मांडला. कार्यक्रमाला अर्जुन पुरस्काराचे व शिवछत्रपती पुरस्काराचे मानकरी श्री. शांताराम जाधव हे प्रमुख अतिथी म्हणून होते. विशेष अतिथी म्हणून कॉटन किंग प्रायव्हेट लिमिटेड चे संचालक मा. श्री. प्रदीप मराठे व विधिसेवा प्राधिकरण, पुणे चे सचिव न्यायमूर्ती राजेंद्र मलाबादे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कनिष्ठ दिवाणी न्यायाधीश न्यायमूर्ती उमेशचंद्र मोरे यांनी भूषविले. मा. श्री. शांताराम जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात खेळाचे, कष्टाचे महत्त्व विषद केले. 'खेळामुळे एकूण जीवनक्रमाला उत्तम आकार मिळतो, खेळाला प्राधान्य दिले पाहिजे तसेच पालकांनी मुलांना खेळण्यास प्रवृत्त केले पाहिजे' असे विचार मांडले. यावर्षी मकरसंक्रांत कार्यक्रमाची संपूर्ण व्यवस्था स्वामी अखंडानंद शाखेचे युवक श्री. दत्तात्रय सकट यांनी पाहिली.

### ❖ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ❖

#### त्रिस्थळी रक्तदान शिबिर

वेळ, अंतर व इतर गोष्टींचा विचार करता यावर्षी वर्धिनीच्या वास्तूसह शहराच्या अन्य भागातही रक्तदान शिबिर घेणे गरजेचे बनले होते. म्हणून योजनापूर्वक तीन ठिकाणी रक्तदान शिबिर संपन्न झाले.

१) 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू - १०१ रक्तदाते.
२) बिबवेवाडी भाग - ५६ रक्तदाते.
३) कर्वेनगर भाग - ३४ रक्तदाते.

**एकूण रक्तदाते - १९१**

युवा रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यासाठीची संपर्क यंत्रणा श्री. ललित माळी व कु. सारंग पोफळे यांनी नियोजनपूर्वक परिश्रमाने उभी केली होती.

#### आनंद पाणपोई

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त पुणे स्टेशन परिसरातील त्यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी बहुसंख्येने नागरिक येत असतात. उन्हाचा त्रास सुसह्य व्हावा यासाठी दरवर्षी वर्धिनीची **आनंद पाणपोई** सेवेस सिद्ध असते. यावर्षी पाणपोईचा शुभारंभ ज्येष्ठ कामगार नेत्या श्रीमती मुक्ताताई मनोहर यांच्या शुभहस्ते झाला. वर्धकांना मार्गदर्शन करताना त्यांनी पूजनीय बाबासाहेबांना अपेक्षित असलेला जातपात विरहित, संघटित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. सुमारे ५००० नागरिकांनी या सोयीचा लाभ घेतला. पाणपोईची व्यवस्था स्वामी श्रद्धानंद शाखेने कुशलतेने सांभाळली.

**कामाच्या खूप गडबडीत असला तरी ईश्वराचे स्मरण व त्याला प्रणाम करण्यास विसरू नका.**

### ❖ १० वी, १२ वी सहल

१० वी, १२ वीच्या परीक्षांसाठी प्रचंड कष्टलेली मंडळी परीक्षा संपताच त्वरेने श्रमपरिहारार्थ पुण्याबाहेर निघाली. थकवा, आळस घालवायचा असेल तर निसर्गासारखा दुसरा मित्र नाही. १० वीच्या गटाने 'हरिश्चंद्रगड' तर १२ वीने 'ढाकचा भैरी' गाठला आणि वर्षभराचा 'ट्रेकिंगचा उपवास' सोडला. जवळजवळ वर्षभराने गाण्याच्या भेंड्या, वेगवेगळे खेळ, मनमुराद हास्यविनोद यांना अगदी बहर आला. गडावर गावकऱ्यांची एक दिंडी आली होती. सगळेजण या वारकऱ्यांसोबत हरिपाठ गात धमाल नाचले. टाळ, मृदुंगांच्या नादाने देहभान हरपले. दिंडीवाल्यांनी प्रेमाने या नवीन पिढीला काल्याचा प्रसाद खाऊ घातला. इथला अवाढव्य कोकणकडा तर केवळ अविस्मरणीयच. निसर्गाचा आस्वाद घेत आगामी तीन महिन्यांच्या सुट्टीतील कार्यक्रमांचे पक्के नियोजन करून मंडळी पुण्यात परतली.

### ❖ संस्था वर्धापन दिन-१३ मे २०१३ ❖

१३ मे रोजी संस्थेने ३४ व्या वर्षात पदार्पण केले. दरवर्षी या दिवशी कार्यकर्ता मेळावा, मान्यवरांचे मार्गदर्शन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दुष्काळाच्या झळांनी देशातील अनेक प्रदेश होरपळत आहेत. पुण्यात राहून हा दुष्काळ अनुभवणे शक्य नाही. म्हणूनच युवा विभागाने शिरूर तालुक्यातील केंदूर गावातील चार ठाकरवस्त्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीच्या सर्वेक्षणासाठी अभ्यासदौरे काढण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळातही या ठाकर वस्त्या 'जैत रे जैत' या चित्रपटासारख्याच भासल्या. पाण्यासाठी वणवण, शिक्षणाची आबाळ, रोजगाराची कमतरता, समानतेसाठीचा संघर्ष हे सर्व त्यांच्या पाचवीलाच पुजलेले आहे. युवकांनी घराघरात संवाद साधून ही दुःखे जाणून घेतली. आगामी काळात या समस्यांच्या परिहारार्थ निश्चित कृती योजनेचा संकल्प करून सर्वजण वर्धिनीत परतले.

### उत्कृष्ट संस्था पुरस्कार

२३ मार्च या शहीद दिनानिमित्त धनकवडी येथील अखिल मोहननगर मित्रमंडळाने गणेशोत्सवातील प्रभावी कामगिरीबद्दल 'स्व'-रूपवर्धिनीला पुरस्कार प्रदान केला. या प्रसंगी वर्धिनीचे गणेशोत्सव प्रमुख श्री. दीपक भोरेकर यांनी उपस्थितांना वर्धिनीचे कार्य सविस्तरपणे सांगितले.

### ❖ वर्षारंभ उपासना -

नववर्ष चैतन्याचे, आनंदाचे, समृद्धीचे. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू नववर्षदिन !

वर्षारंभ उपासना ओंकारेश्वर मंदिरात झाली. यावेळी युवक-युवती, वर्धिनीचे हितचिंतक, देणगीदार असे २०० जण उपस्थित होते. विवेकानंद केंद्राचे श्री. विश्वास लपालकर यांनी सार्धशतीनिमित्त स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले. स्वामीजी अवघे ३९ वर्षांचे आयुष्य जगले. पण पुढील ५००० वर्षांना पुरेल इतके वैचारिक धन त्यांनी आपल्यासाठी मागे ठेवले आहे.

**वावटळ जशी ढगांना उडवून नेते तसेच प्रभूंच्या नामाने विषयमेघ नाहीसे होतात.**

## ❖ गणेशोत्सव २०१३ ❖


गणेशोत्सवानिमित्त आधी महिनाभर वर्धिनीच्या आठ शाखांमध्ये पथकांचा व आठ शाखांमध्ये पथनाट्याचा सराव चालू होता. आपली संस्कृती, परंपरा, इतिहास, गौरवाचे क्षण तसेच अनेकविध सामाजिक समस्यांवर जागरुकता निर्माण व्हावी या उद्देशाने पथके व पथनाट्यांमध्ये विषयांची मांडणी केली जाते. यावर्षी खालील वेळापत्रकाप्रमाणे मिरवणुका संपन्न झाल्या.

| | |
|---|---|
| १. श्री गणेश चतुर्थी | साने गुरुजी मित्र मंडळ, अंबिलओढा<br>नेताजी मित्र मंडळ, शिवाजीनगर<br>एकता मित्र मंडळ, विठ्ठलवाडी, सिंहगड रोड |
| २. सातवा दिवस | श्री गणेश संस्थान मंदिर, डोंबिवली<br>TVS शेलार शोरूम गणेशोत्सव, अरण्येश्वर |
| ३. अनंत चतुर्दशी | श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, पुणे<br>श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणेशोत्सव मंडळ, पुणे<br>पॉप्युलर स्पोर्टस् क्लब मंडळ, कोल्हापूर |

पुण्यात अनंत चतुर्दशीच्या दिवशी मुसळधार पावसाने मिरवणुकांची रंगत अधिकच वाढली. तुफानी पाऊस अंगावर झेलताना ढोल-ताशांच्या वाढत्या लयीबरोबर झांज, लेझीम, घुंगुरकाठी, भगवा ध्वज आणि टिपऱ्या हाती धरलेली पावलेही अधिक नजाकतीने पडत होती. पुणे, डोंबिवली, कोल्हापूर या तीनही ठिकाणी वर्धिनीच्या पथकांनी प्रचंड लोकप्रियता मिळविली. पथनाट्यांनीही चौकाचौकात गर्दी खेचून अत्यंत प्रभावीपणे विषय पोहोचवण्याचे कार्य केले. या वर्षीच्या गणेशोत्सवाचे यशस्वी नेतृत्व स्वामी अखंडानंद शाखेचे कार्यकर्ते श्री. महेश लोंढे यांनी केले.

**❖ या वर्षीच्या पथनाट्यांचे विषय व सादर करणाऱ्या शाखा :-**

| | | |
|---|---|---|
| १. | पर्यावरणाचे करुया रक्षण | स्वामी ब्रह्मानंद शाखा, नरवीर तानाजी मालुसरे शाखा |
| २. | स्वामी विवेकानंद - चिरंतन स्फूर्तिस्रोत | स्वामी अभेदानंद शाखा |
| ३. | युद्ध - सांस्कृतिक प्रदूषणाशी | नरवीर तानाजी मालुसरे शाखा |
| ४. | सोशल नेटवर्किंग - फायदे तोटे | स्वामी ब्रह्मानंद शाखा |
| ५. | दूर करूया व्यसनाधीनता | स्वामी दयानंद सरस्वती शाखा, समर्थ रामकृष्ण शाखा |
| ६. | वास्तव शिक्षणक्षेत्राचे | भगिनी निवेदिता शाखा |
| ७. | युवा भारत | स्वामी योगानंद शाखा |



***उत्सवाने आम्हाला काय दिले ?***

मनाला चैतन्य, श्रद्धेला सामर्थ्य, वंचितांना दिलासा आणि सामाजिक ऐक्याची पाऊलवाट !

**- श्री. आनंद सराफ** (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते)

**तुम्हाला जप आणि इतर अध्यात्मिक साधनांचं महत्त्व माहीत आहे काय ? त्यांच्यामुळे इंद्रियांवर ताबा राहतो.**

## ❖ गुणगौरव समारंभ ❖

शालेय परीक्षांत व विविध उपक्रमांमध्ये यश संपादित केलेल्या वर्धक-वर्धिकांचे कौतुक करण्यासाठी गुणगौरव समारंभ आयोजित केला जातो. यावर्षी हा समारंभ भागश: झाला.

| भाग | पारितोषिक विजेत्यांची संख्या | प्रमुख वक्ते/पाहुणे |
|---|---|---|
| भाग १ - शहर भाग | २५ | श्री. रविंद्र कानडे |
| भाग २ - बिबवेवाडी | ६५ | ए. पी. आय. काकडे |
| भाग ३ - कर्वेनगर | ४० | कॅ. स्मिताताई गायकवाड |
| भाग ४ - गोखलेनगर | ३० | प्रा. नंदकिशोर एकबोटे |
| | | श्री. कल्याणजी वर्दे |
| भाग ५ - वर्धिका | १९ | श्री. सुहास नेने |

प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी काका हलवाई स्वीट सेंटर, टिळक रोडचे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी सर्व शाखांच्या वर्धकांना पेढे रूपाने देणगी देऊन त्यांचे कौतुक केले.

## ❖ विंझर भातलावणी ❖

ऑगस्ट महिना म्हटलं की मुसळधार पाऊस. हा पाऊस आपल्या शेतकरी बांधवांसाठी खूप महत्त्वाचा. शेतांमध्ये विविध प्रकारची पिके याच ऋतूमध्ये तो घेतो. वेल्ह्याजवळील विंझर गावी तांदूळ मोठ्या प्रमाणावर पिकवला जातो. तांदळाची लावणी कशी करायची हे जाणून घेण्यासाठी वर्धिनीच्या परिवारातील अ‍ॅड. सदानंद फडके यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धिनीच्या शाखांतील वर्धक-वर्धिका, युवक-युवती असे एकूण २०० जण भातलावणीसाठी विंझर गावी गेले होते. गुडघाभर चिखलामध्ये भाताची पिकं कशी लावावीत हे तेथील शेतकऱ्यांनी सर्वांना शिकविले. प्रत्यक्ष शेतात कामाचा अनुभव पुणेकर विद्यार्थ्यांनी घेतला. **पाठ्यपुस्तकी ज्ञानापेक्षा हे प्रत्यक्ष ज्ञान अनुभवास मिळाले.**

## ❖ १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन ❖

भाग १ व ४ मधील पाच शाखांचा कार्यक्रम बीएमसीसी कॉलेजमध्ये संपन्न झाला. यामध्ये क्रीडा व पद्यस्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध व्याख्याते श्री. राहुल कोकीळ यांनी भारताच्या इतिहासातील गौरवास्पद प्रसंगांची मांडणी करून कार्यक्रमात चैतन्य भरले.

भाग २ व ३ मधील आठ शाखांचा कार्यक्रम न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे झाला. काश्मीरमध्ये शैक्षणिक कार्य करणारे 'बॉर्डरलेस वर्ल्ड फौंडेशन'चे संस्थापक श्री. अधिक कदम यांनी कार्यक्रमात काश्मीरातील विद्यार्थ्यांसमोरील प्रश्न मांडले. हे प्रश्न सोडविण्यासाठी सुट्ट्यांच्या कालावधीत वर्धिनीच्या युवक-युवतींनी काश्मीरमध्ये सेवाकार्यासाठी येण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

**प्रत्येकाला आपल्या कर्माची फळं भोगावी लागतात. परंतु भगवंताच्या नामाचा जप करीत गेल्यास ती क्षीण होतात.**

# शिबिर वृत्तांत

वर्षभरात शाखा विभागाची खालील प्रमाणे एकूण ११ शिबिरे झाली.

## उन्हाळी शिबिरे

**मोठा गट**

सर्व शाखांमधील ८ वी ते १० वीच्या वर्धकांचे शिबिर.

**विषय :** स्वामी विवेकानंद **कालावधी :** दि. २१ एप्रिल ते २५ एप्रिल

**संख्या :** १२५ **स्थळ :** रामेश्वर विद्यालय, विंग.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| स्वामीजींचे राष्ट्रप्रेम आणि हिंदुधर्म | श्री. विश्वास लपालकर | स्वामीजी आणि हिंदुत्वनिष्ठा | श्री. मिलिंद एकबोटे |
| स्वामी विवेकानंद आणि समर्थ रामकृष्ण | श्री. बाळासाहेब दीक्षित | मी घडलो वर्धिनीमुळे | श्री. सोमनाथ गायकवाड |
| सर्वधर्मपरिषदेत स्वामीजी | श्री. ज्ञानेश पुरंदरे | मी कसा घडलो ? | श्री. उमेश जोशी |
| स्वामीजींचा साधनाकाळ | श्री. शिरीष पटवर्धन | | |

शिबिरकाळात गावातील जत्रेचा आनंद शिबिरार्थींनी घेतला. देवाचा छबिना, कावड, विविध गावांचे ढोल-ताशांचे खेळ यात सहभागी होत वर्धकांनीही लाठी-काठी, ढाल-तलवार, घुंगुरकाठीची प्रात्यक्षिके सादर करून गावकऱ्यांची शाबासकी मिळविली.

---

**लहान गट**

सर्व शाखांमधील ५ वी ते ७ वीच्या वर्धकांचे शिबिर.

**विषय :** वन्यजीवन आणि आपण का शिकावे ? **कालावधी :** दि. २५ एप्रिल ते २९ एप्रिल

**संख्या :** ३६० **स्थळ :** रामेश्वर विद्यालय, विंग.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| मधमाशांची दुनिया | सौ. शुभा मुजुमदार | अजब गुहांची सृष्टी | श्री. पुष्कर वाडेकर |
| वाघ वाचवा | माहितीपट | इतिहासात डोकावताना | श्री. विजयचंद्र थत्ते |
| मराठी असे मायबोली | सौ. अद्वैता उमराणीकर | विज्ञानाची गोडी | श्री. सुनील कुलकर्णी |
| इंग्रजीची ओळख | प्रा. उमेश प्रधान | गणिताशी गट्टी | डॉ. प्रदीप आगाशे |
| कथा शुरांच्या | श्री. मयूर कर्जतकर | स्वामी विवेकानंद | श्री. शिरीष पटवर्धन |
| छत्रपती संभाजी महाराज | कु. सौरभ कर्डे | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. मोहन शेटे |

लहान गटातील वर्धकांच्या शिबिराची संपूर्ण व्यवस्था नुकतीच दहावीची परीक्षा दिलेल्या सर्व वर्धकांनी उत्तमरित्या सांभाळली. युवक गटाच्या उंबरठ्यावर असलेल्या दहावीच्या वर्धकांनी युवक गटात आल्यावर आपण कशा पद्धतीने काम करावे याचा अनुभव सर्व वर्धकांनी शिबिर सांभाळताना घेतला.

**पहाट व संध्याकाळ देवाचे नाव जपण्यास सर्वोत्तम वेळ आहे. त्यामुळे मन पवित्र होते.**

**१० वी पूर्वपीठिका शिबिर :**

२०१३–१४ या शैक्षणिक वर्षात पदार्पण केलेल्या १० वीच्या वर्धकांचे पूर्वपीठिका शिबिर संपन्न झाले.

**विषय :** १० वीची पूर्वतयारी **कालावधी :** दि. २ ते ५ मे

**संख्या :** ४८ **स्थळ :** 'स्व'–रूपवर्धिनी वास्तू

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| अभ्यासाची ओळख | श्री. अ. ल. देशमुख | इतिहास | श्री. वाटवे |
| भूमिती | डॉ. प्रदीप आगाशे | इंग्रजी | श्री. प्रधान |
| बीजगणित | श्री. अविनाश कुलकर्णी | विज्ञान | श्री. शिंदे |
| भूगोल | श्री. मालुसरे | मराठी | सौ. अद्वैता उमराणीकर |

**वर्धिका शिबिर**

भाग ५ मधील तीन शाखांतील वर्धिकांचे शिबिर पार पडले.

**विषय :** मूल्यशिक्षण **कालावधी :** दि. १ ते ५ मे

**संख्या :** ८५ **स्थळ :** नवीन मराठी शाळा, पुणे

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय एकात्मता | श्रीमती उज्ज्वला गायकवाड | पर्यावरण संवर्धन | श्रीमती जानकी कुंटे |
| प्रामाणिकपणा व भूतदया | सौ. अद्वैता उमराणीकर | वर्धिनीची प्रार्थना | श्री. शिरीष पटवर्धन |
| वर्धिनीचा इतिहास | श्री. ज्ञानेश पुरंदरे | शारदामणि महिला विभाग | श्रीमती पुष्पाताई नडे |
| मूल्यशिक्षण | श्रीमती स्वाती जोगळेकर | ओरीगामी (कृतीसत्र) | श्रीमती मेधा काशीकर |
| मातीकाम (कृतीसत्र) | डॉ. मुकुंद राईलकर | | |

**युवक शिबिर :** जून महिन्यामध्ये युवकांचे शिबिर झाले.

**विषय :** युवक प्रशिक्षण व शाखा वार्षिक नियोजन **कालावधी :** दि. ७ ते १० जून

**संख्या :** १२५ **स्थळ :** अपंग कल्याणकारी संस्था, वानवडी

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| सामाजिक संवेदना | श्री. अनिल अवचट | भविष्याच्या वाटा | श्री. विवेक वेलणकर |
| संपर्क कौशल्य | श्री. ज्ञानेश पुरंदरे | मुस्लिम समाजाच्या समस्या | प्रा. शमसुद्दीन तांबोळी |
| भयापासून मुक्तता | श्री. आशिष गोडबोले | My Army My Life | ले. जन.(नि.) दत्तात्रय शेकटकर |
| लैंगिक शिक्षण | श्री. सुरज पवार | कार्यक्रम संयोजन | श्री. सुमीत डोळे |
| गप्पाष्टक | श्री. संजय तांबट | समारोप सत्र | श्री. ज्ञानेश पुरंदरे |

या शिबिरामध्ये शाखाश: सर्व युवकांनी आगामी वर्षाची शाखेची उद्दिष्टे निश्चित केली. दि. ९ जून रोजी सर्व शाखाप्रमुखांनी गतवर्षाचा शाखेचा वृत्तांत संगणकीय सादरीकरणाद्वारे सर्व युवक व पदाधिकाऱ्यांसमोर मांडला. व्यवस्था विभागश: सर्व युवकांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमधून व्यवस्था कशी सांभाळावी या विषयावर ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी युवकांशी संपर्क साधला. समारोप प्रसंगी नवीन वर्षातील शाखाप्रमुखांच्या, भागप्रमुखांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

**जप करताना ईश्वराचे नाव अगदी प्रेमानं, व्याकुळतेनं व आत्मसमर्पण भावनेनं घ्या.**

## हिवाळी शिबिर

**भाग १ :**

समर्थ रामकृष्ण शाखा, स्वामी योगानंद शाखा, स्वामी श्रद्धानंद शाखा

**विषय :** भारताची उज्ज्वल विज्ञान परंपरा **कालावधी :** दि. ८ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर

**संख्या :** १०० **स्थळ :** भावे माध्यमिक शाळा, पुणे

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्घाटन सत्र | श्री. एकनाथ बुरसे | रामानुजन | श्री. जयंत खेडकर |
| अंधश्रद्धा | सौ. शालिनी ओक | वैज्ञानिक प्रयोग कसे करावेत ? | श्री. चैतन्य साठे |
| मैत्री शास्त्राशी | डॉ. प्रदीप आगाशे | विज्ञान कथा | सौ. अपर्णा बोकील |
| प्रकल्प कसे करावेत ? | कु. श्रुती हिंगे | प्राचीन वैज्ञानिक ऋषी | श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| जादू आणि विज्ञान | श्री. विवेक साने | समारोप सत्र | श्री. सतीश कुलकर्णी |
| वैज्ञानिक प्रयोग | कु. कल्याणी कटारिया | | |

**शिबिरात झालेल्या स्पर्धा :** नाट्यस्पर्धा अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर झाल्या. खजिना शोध.

**रात्रकार्यक्रम :** वैज्ञानिक माहितीपट - श्री. चैतन्य साठे यांनी दाखवला.

लघुपट - श्री. पुष्कर वाडेकर यांनी दाखवला. प्रश्नमंजूषा.

---

**भाग २ :**

स्वामी अखंडानंद शाखा, स्वामी दयानंद शाखा, स्वामी शिवानंद शाखा, शंभुराजे शाखा.

**विषय :** जावे त्यांच्या देशा... **कालावधी :** दि. ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर

**संख्या :** १५० **स्थळ :** सरस्वती मंगल कार्यालय, उत्रौली, भोर

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| शुभारंभ सत्र (ग्रामीण जनशक्ती आणि ग्रामविकसन) | सौ. जयश्री यादव | ओळख अमेरिकेची | श्री. श्रीकांत कुलकर्णी |
| | | अमेरिकेची बलस्थाने | श्रीमती विजयालक्ष्मी पाठक |
| | | प्रगतीशील अमेरिका | श्री. निळकंठ शिंदे |
| अमेरिकेतील लोकजीवन | श्रीमती पुष्पाताई नडे | ओळख चीनची | श्री. संदेश शेंडकर |
| उदयोन्मुख महासत्ता-चीन | श्री. जितेंद्र पवार | आगळावेगळा इस्त्राएल | श्री. मयुर कर्जतकर |
| इस्त्राएल-विजिगीषु मनोवृत्तीचा देश | श्री. ज्ञानेश पुरंदरे | समारोप सत्र : जग व भारत - तौलनिक अभ्यास | श्री. सुमीत डोळे |

शिबिराच्या निमित्ताने वर्धकांना बाहेरील देशांचे लोकजीवन, संस्कृती याची तोंडओळख झाली.

**वारा असला म्हणजे दिव्याची ज्योत स्थिर रहात नाही. तद्वतच मनात कामना-वासना असताना मन स्थिर होत नाही**

**भाग ३ :**

स्वामी सुबोधानंद शाखा, स्वामी ब्रह्मानंद शाखा, राजर्षी शाहू शाखा, नरवीर तानाजी शाखा.

**विषय :** अंधश्रद्धा, कचरा व्यवस्थापन, जलशुद्धीकरण **कालावधी :** दि. ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर

**संख्या :** १३० **स्थळ :** वाघिरे विद्यालय, सासवड

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| अंधश्रद्धा | श्रीमती शालिनी ओक | प्रकल्प भेट (खळद येथील पाणीपंचायत) | श्री. कुंभारकर |
| वर्धिनीची वाटचाल | श्री. विश्वास कुलकर्णी | | |
| शस्त्र परिचय | श्री. नकुल थावरे | दुचाकी दुरुस्ती कार्यशाळा | श्री. शेखर इनामदार |
| शतपैलू सावरकर | श्री. चंद्रकांत शहासने | समारोप सत्र | श्री. राजाराम खळदकर व मुख्याध्यापिका सौ. चंद्रसेना मुरकुटे |

विवेकानंद सार्धशती निमित्ताने सर्व शिबिरार्थींनी सासवड येथील ५५० घरांमध्ये गृहसंपर्क अभियान केले.

---

**भाग ४ :**

स्वामी विवेकानंद शाखा, स्वामी अभेदानंद शाखा.

**विषय :** क्रीडा **कालावधी :** दि. ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर

**संख्या :** ७० **स्थळ :** ज्ञानप्रबोधिनी क्रीडा संकुल, निगडी

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| शुभारंभ सत्र | श्री. अमोल बराटे | क्रीडा क्षेत्रात करियर | सौ. मंजू जुगदल |
| शारीरिक शिक्षण - राष्ट्रीय शिक्षण | श्री. ज्ञानेश पुरंदरे | सूर्यनमस्कार | श्री. जयंत कवठेकर |
| | | चिकाटी | कुस्तीपटू श्री. संजय दाभाडे |
| भारतातील क्रीडाक्षेत्रातील योगदान | श्री. दिनेशकुमार पांडे | | |
| | | कृतीसत्र (निरोगी शरीर निरोगी मन) | श्री. संदीप मोरे |
| क्रीडा वैद्यक आणि पोषक आहार | डॉ. संजय अव्हाले | | |
| युद्धकथा | श्री. शिंदे | समारोप सत्र | श्री. मनोज देवळेकर |

'क्रीडा' या विषयावर पद्यमंजूषा व प्रश्नमंजूषा घेण्यात आली. प्रबोधिनीच्या क्रीडाकुलातील प्रशिक्षक असलेले वर्धिनीचे कार्यकर्ते कु. संतोष घाडगे व त्याच्या मित्रांनी धावणे, खो-खो, मल्लखांब, कुस्ती यांचे प्रशिक्षण दिले. वर्धकांना 'इक्बाल' हा प्रेरणादायी चित्रपट दाखवण्यात आला.

**चंचलता हा मनाचा स्थायीभाव आहे.म्हणून मन स्थिर करण्यासाठी प्रथम श्वासोच्छ्वास नियमित करून ध्यानसाधना करावी.**

**भाग ५ :** भगिनी निवेदिता शाखा, भवानी पेठ शाखा, घोरपडे पेठ शाखा

**विषय :** खगोलशास्त्र आणि भौतिक शास्त्र **कालावधी :** दि. ६ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर

**संख्या :** ६२ मुली, ११ युवती. **स्थळ :** धायरेश्वर नर्सिंग इन्स्टिट्यूट, धायरी, पुणे

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्‌घाटन सत्र (तारांगण भेट) | श्री. रामदासी सर | वैज्ञानिक खेळणी (भौतिक शास्त्रावर आधारित) | श्री. अशोक प्रभू |
| हस्तकला | सौ. आरती परांजपे | शिवकथा | श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| The wonder of the night sky | श्री. अमित पुरंदरे | खगोलशास्त्र कशासाठी ? व आकाश दर्शन | श्री. मयुरेश प्रभुणे |
| सात आश्चर्ये | श्री. ज्ञानेश पुरंदरे | कल्पना चावला - चरित्रकथन | श्रीमती अपर्णा निरगुडे |
| वैज्ञानिक प्रयोग (भौतिकशास्त्रावर आधारित) | श्री. नचिकेत नित्सुरे | | |
| अवकाश माहिती व धूमकेतू | श्री. हेमंत पाठक | समारोप सत्र | श्री. विश्वास कुलकर्णी |

**शिबिरामध्ये झालेल्या स्पर्धा :** आदर्श ग्रह, जाहिरात स्पर्धा, मूकनाट्य, खजिना शोध, प्रश्नमंजूषा.

## सोलापूर शिबिर वृत्तांत

वर्धिनीच्या विस्तार अंतर्गत प्रयत्नातील भाग म्हणून सोलापूर येथे शाखा सुरू करता येईल यासाठी प्रयत्न चालू होते. सोलापूर येथे अनेक वर्षे वस्ती विभागातील मुलांचा संस्कारवर्ग/अभ्यासवर्ग चालविणारे श्री. संतोष गायकवाड यांनी वर्धिनीच्या या कल्पनेत रुची दाखवली. कार्यपद्धती समजून घेतली आणि अशा कामासाठी व्यवसायाच्या धावपळीतही वेळ देण्याचे मान्य केले. वस्ती विभागातील ८० मुलांची निवडचाचणी झाली आणि निकालाच्या दिवशी या सर्वांपर्यंत एक दिवसाच्या शिबिराची माहिती पोहोचविण्यासाठी त्या त्या शाळांमध्ये जाऊन पालकांना पत्रके दिली. पुण्यातून सर्वश्री वेदांग बेहेरे, अक्षय भेगडे, किरण दरवडे, जितेंद्र काळे आणि आकाश काकडे हे युवक शिबिर घेण्यासाठी पोहोचले.

**विषय :** सर्वांगीण विकास **कालावधी :** दि. १८ व १९ मे

**संख्या :** १०० **स्थळ :** ज्ञानप्रबोधिनी प्रशाला, सोलापूर

शिबिरात पुढील व्याख्याने झाली.

| विषय | वक्ते | विषय | वक्ते |
|---|---|---|---|
| उद्‌घाटन सत्र | श्री. पशुपतीनाथ माशाळ | क्रांतीसिंह नाना पाटील | श्री. शिरीष पटवर्धन |
| ओरिगामी (कृतीसत्र) | श्री. विवेक साने | पंचतंत्रातील प्रेरक कथा | डॉ. पवार |
| मनोरंजनातून अभ्यास | डॉ. प्रदीप आगाशे | समारोप सत्र | श्री. रामभाऊ डिंबळे |

**मनाला ताब्यात ठेवून ईश्वराचे नामस्मरण एकदाच करणं, हे मन ईश्वराकडे नसताना दशलक्ष वेळा नाम घेण्याबरोबरचे आहे**

## ❖ क्रीडादिन ❖

यावर्षीच्या क्रीडादिनातील स्पर्धा भावे हायस्कूल व बीएमसीसी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये घेण्यात आल्या. क्रीडादिनाचे उद्‌घाटक कॅ. सनतकुमार भाटे यांनी खेळाचे जीवनातील स्थान या विषयावर वर्धकांना मार्गदर्शन केले.

**वैयक्तिक स्पर्धा :**

| प्रथम क्रमांक | १०० मी. धावणे | १५०० मी. धावणे | गोळाफेक |
|---|---|---|---|
| ५ वी-६ वी | कु. सिद्धेश्वर दळवी<br>स्वामी अखंडानंद शाखा | कु. प्रणव पोळ<br>स्वामी दयानंद सरस्वती शाखा | - |
| ७ वी-८ वी | कु. दिलीप अर्के<br>स्वामी ब्रह्मानंद शाखा | कु. अतुल भोसले<br>राजर्षी शाहू शाखा | - |
| ९ वी-१० वी | कु. अतीश थोरात<br>स्वामी सुबोधानंद शाखा | कु. अमित आदवडे<br>स्वामी अभेदानंद शाखा | - |
| ११ वी-१२ वी | कु. संदीप जगधणे<br>स्वामी श्रद्धानंद शाखा | कु. योगेश नराल<br>स्वामी श्रद्धानंद शाखा | कु. ऋषिकेश नरसाळे |
| युवक गट | कु. नेताजी सावरमाळे<br>स्वामी योगानंद शाखा | कु. अतुल बिबवे<br>स्वामी अखंडानंद शाखा | कु. कृष्णा पिंगळे<br>स्वामी दयानंद सरस्वती शाखा |

**सामूहिक स्पर्धा :**

| गट | स्पर्धा | विजेता संघ |
|---|---|---|
| युवक गट | सायकलिंग | स्पर्धा परीक्षा केंद्र व स्वामी श्रद्धानंद शाखा |
| ५ वी, ६ वी | गोल खोखो | स्वामी दयानंद सरस्वती शाखा |
| ७ वी, ८ वी | उभा खोखो | स्वामी ब्रह्मानंद शाखा |
| ९ वी, १० वी | हॅण्डबॉल | समर्थ रामकृष्ण शाखा |
| ११ वी, १२ वी | कबड्डी | समर्थ रामकृष्ण शाखा |
| युवक गट | व्हॉलीबॉल | स्वामी ब्रह्मानंद शाखा |

क्रीडादिनाचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ त्याच दिवशी सायंकाळी पार पडला. समारोपाला शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. सत्यजित शिंदे उपस्थित होते. ओंकार न्यासने विजेत्यांना रु. १००००/- किंमतीची बक्षीसे दिली.

## ❖ समर्पणदिन ❖

दरवर्षी दत्तजयंतीनिमित्त वर्धिनी संस्थापक कै. कृ. ल. पटवर्धन सर यांचे जयंती कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमास 'समर्पण दिन' असे म्हणतात. यामध्ये व्यावसायिक युवक-युवती निधी समर्पण करतात. यावर्षी ८५ युवक-युवती या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये श्री. कल्याण वर्दे यांचे मार्गदर्शन लाभले. वर्धिनीच्या संकल्पनेचे प्रभावी प्रवर्तक या भूमिकेतून सर्व कार्यकर्त्यांनी समाजात कार्यरत रहावे असे आवाहन श्री. वर्दे सरांनी या प्रसंगी केले.

**कठोर तपस्येने मन शुद्ध होतं. नियमित साधना केल्याशिवाय काहीदेखील प्राप्त होऊ शकत नाही.**

## शाखा वृत्तांत

❖ **समर्थ रामकृष्ण शाखा :**

● **शाखा वर्धापनदिन –**

१३ मे ला शाखेच्या ३४ व्या वर्धापनदिनानिमित्त रामकृष्ण मठास भेट देण्यात आली. तेथे श्री. विनायक कुलकर्णी यांनी वर्धकांना मार्गदर्शन केले.

● **मार्गदर्शनपर व्याख्याने –**

१४ मे ला श्री. सौरभ करडे यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र शाखेत मांडले.

कोजागिरीला श्री. सुनील कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले. 'पृथ्वीची उत्पत्ती' हा विषय त्यांनी मांडला. व्याख्यानानंतर मुलांना दुर्बिणीद्वारे चंद्र दाखवला.

● **शिक्षकसभा –**

दि. ३० जूनला शाखेतील शिक्षकांची सभा झाली. यावेळी 'स्व'-रूपवर्धिनीचा माहितीपट दाखवण्यात आला. त्यानंतर शाखेचे कार्यकर्ते श्री. ललित माळी यांनी शाळा, शाखा आणि क्लास यातील फरक समजावून सांगितला आणि शाखेमध्ये मुलांना नेमके काय शिकवले गेले पाहिजे ? हे समजावून सांगितले.

● **विशेष कार्यक्रम –**

२८ मे ला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त सारसबाग येथील स्वातंत्र्यवीरांच्या पुतळ्यास मानवंदना देऊन वर्धकांनी देशभक्तीपर गीतांचे गायन केले.

मोठ्या गटातील वर्धकांनी COEP कॉलेजला भेट दिली. तेथे यंत्रमानव, त्यांच्यातील स्पर्धा, चित्रप्रदर्शन पाहिले. तसेच शाखेतील श्री. सारंग पोफळे या दादाने बोट क्लब दाखवला व त्याची माहिती दिली.

❖ **स्वामी योगानंद शाखा :**

● **वर्धापनदिन –**

शाखेचे माजी शाखाप्रमुख श्री. निशिकांत वाईकर यांच्या घरी सर्व वर्धकांनी संपर्क केला. यावेळी सरांनी शाखाकामातील त्यांचे अनुभव सांगितले. मुलांच्या प्रश्नांची उत्तरे देताना आपला सर्वांगीण विकास कशा प्रकारे होत गेला हे सांगितले.

### अभिनंदन

*समर्थ रामकृष्ण शाखेतील युवक **कु. उमेश मठपती** याला विभागस्तरीय ज्यूदो स्पर्धेत विभागस्तरीय १०० किलो वजन गटात प्रथम पारितोषिक मिळाले. तसेच आंतरविद्यापीठ गटात राष्ट्रीय पातळीवर उमेशची निवड झाली. ही स्पर्धा खेळण्यासाठी उमेश पंजाबमध्ये अमृतसर येथे जाणार आहे.*

*स्वामी योगानंद शाखेतील युवक **कु. जितेंद्र काळे** याने जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेत सहभाग घेतला. त्याने द्वितीय क्रमांक पटकावला.*

*स्वामी योगानंद शाखेतील वर्धक **कु. उपमन्यू कटके** याची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत निवड झाली.*

**साधन-भजन म्हणा तीर्थयात्रा म्हणा वा धनोपार्जन म्हणा माणसाने तरुण वयातच केले पाहिजे...**

● **मार्गदर्शनपर व्याख्याने –**

मुलाखत कशी घ्यावी – कु. अजिंक्य नांदुर्डीकर

गुरुपौर्णिमा – श्री. सत्यजित शिंदे

● **विशेष कार्यक्रम –**

गणेशोत्सवात 'Young India' हे नाटक शाखेतील युवकांनी लिहिले होते. एकूण आठ ठिकाणी याचे सादरीकरण झाले. या पथनाट्याची दखल प्रसारमाध्यमानेसुद्धा घेतली. 'महाराष्ट्र टाईम्स' या वृत्तपत्राने पथनाट्याची बातमी छापली व TV9 या न्यूज चॅनेलने पथनाट्याचे प्रक्षेपण केले.

वर्धकांचा SWOT Analysis हा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये वर्धकांनी स्वत:चे व इतर वर्धकांचे चांगले, वाईट गुण व्यक्त केले. या उपक्रमाचा भाग म्हणून वर्धकांच्या युवकांच्याबद्दलच्या प्रतिक्रिया लेखी स्वरूपात घेण्यात आल्या.

युवकांसाठी घेण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये "My School Days" या विषयावर गटचर्चा झाली. ही चर्चा इंग्रजी भाषेमध्ये घेण्यात आली. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे काही पैलू युवकांना ज्ञात व्हावे यासाठी वर्तमानपत्रातील काही लेखांचे वाचन झाले.

❖ **स्वामी श्रद्धानंद शाखा :**

● **वर्धापनदिन –**

दि. ९ ऑगस्टला शाखेचा ९ वा वर्धापनदिन संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून शाहीर दादा पासलकर व प्रमुख अतिथी म्हणून श्री. मराठे सर लाभले होते. शाखेचे जीवनातील स्थान या उद्देशाला धरून पाहुण्यांनी व वक्त्यांनी आपले विचार मांडले.

● **मार्गदर्शनपर व्याख्याने –**

दि. २२ जुलैला गुरुपौर्णिमेनिमित्त श्री. मराठे यांचे व्याख्यान झाले.

शाखेत नवीन आलेल्या वर्धकांच्या पालकांची

## अभिनंदन

पुणे महानगरपालिका शालेय क्रीडास्पर्धांमध्ये स्वामी अखंडानंद शाखेतील वर्धक **कु. सिद्धेश्वर दळवी** याचा १०० मी. धावणे या स्पर्धेत **प्रथम क्रमांक** आला.

स्वामी अखंडानंद शाखेतील वर्धक **कु. सागर लाडवीकर** याला वक्तृत्व स्पर्धेमध्ये **उत्तेजनार्थ पारितोषिक** मिळाले.

स्वामी अखंडानंद शाखेतील युवक **कु. गौरव गायकवाड** याला पुणे चेस असोसिएशन आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत **प्रथम पारितोषिक** तसेच प्रज्ञा चेस ॲकॅडमी आयोजित ओपन रॅपीड चेस टुर्नामेंटमध्ये खुल्या गटात **द्वितीय पारितोषिक** मिळाले.

स्वामी अखंडानंद शाखेतील युवक **कु. अनिकेत महांगडे** याला प्रज्ञा चेस ॲकॅडमी आयोजित ओपन रॅपीड चेस टुर्नामेंटमध्ये खुल्या गटात **प्रथम पारितोषिक** मिळाले. तसेच पुणे चेस असोसिएशन आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत **उत्तेजनार्थ पारितोषिक** मिळाले.

**माणसानं आपलं कर्म सोडू नये. कारण ईश्वर त्याची इच्छा माणसाच्या कर्मातूनच व्यक्त करत असतो.**

पालकसभा घेण्यात आली. यावेळी श्री. एकनाथ बुरसे यांनी पालकांना मार्गदर्शन केले.

● **विशेष कार्यक्रम –**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त शाखेत स्लो सायकलिंग, १०० मीटर धावणे, कबड्डी व डॉजबॉल या मैदानी स्पर्धा झाल्या. या स्पर्धांचे बक्षीस वितरण शाखा परिसरातील मा. नगरसेवकांच्या हस्ते झाले. २७ जानेवारीला स्वामी योगानंद शाखेला भेट देण्यात आली. यावेळी दोन्ही शाखांच्या वर्धकांनी परस्पर परिचय करून घेतला.

शाखेत प्रश्नमंजूषा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत वर्धकांना सामान्यज्ञानाविषयी प्रश्न विचारण्यात आले. ८ वी व १० वीची परीक्षा घेण्यात आली.

शिक्षकदिनानिमित्त शाखेतील युवक कु. अजय रायकर आणि कु. महेश ढवळे यांनी गणित आणि दुचाकींची रचना (Automobile) या विषयावर वर्धकांना माहिती सांगितली.

❖ **<u>वीर अभिमन्यू बालशाखा :</u>**

● **शिबीर –**

वीर अभिमन्यू बालशाखेच्या २५ वर्धक वर्धिकांचे शिबिर वर्धिनीच्या वास्तूत पार पडले. या शिबिरामध्ये विविध कलांची ओळख वर्धकांना व्हावी म्हणून कृतीसत्रांचं तसेच थोर व्यक्तींची माहिती वर्धकांना मिळावी म्हणून त्या व्यक्तींची चरित्रे वर्धकांसमोर मांडण्यात आली. कृतीसत्रांमध्ये रांगोळी काढणे, दृढीकाम, चित्रकला, पणती रंगविणे, मूर्तीकाम या कलांचे वर्ग घेण्यात आले.

सत्रांमध्ये श्री. मंदार पोफळे यांचे उद्घाटन सत्र झाले. बालवयातच शिबिराचं महत्त्व वर्धकांना पटावे यासाठी श्रीमती पुष्पाताई नडे यांनी 'शिबिर आपल्या हिताचे' या विषयावर मार्गदर्शन केले. बालशाखेचे शाखाप्रमुख कु. रोहित धायरकर यांनी विन्स्टन चर्चिल यांचे चरित्र वर्धकांसमोर मांडले. श्री. बाळाराम माडकर यांनी शिवरायांच्या बालपणातील कथा वर्धकांना सांगितल्या. शिबिराचा समारोप राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री. श्रीधरपंत फडके यांच्या कथाकथनाने झाला.

उपक्रमांअंतर्गत दूरदर्शन पाहणे चांगले का वाईट ? या विषयावर वादविवाद स्पर्धा व गटश: कलावर्गांच्या प्रात्यक्षिक स्पर्धा व प्रसंग नाट्य स्पर्धा घेण्यात आल्या. वर्धकांना 'रिटर्न ऑफ हनुमान' हा चित्रपट दाखविण्यात आला.

❖ **<u>स्वामी अखंडानंद शाखा :</u>**

● **वर्धापनदिन –**

दि. १२ ऑक्टोबरला शाखेचा २७ वा वर्धापनदिन

## अभिनंदन

*लायन्स क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत स्वामी शिवानंद शाखेतील तीन वर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत **कु. विपुल लोखंडे** या वर्धकाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. शाखेतील वर्धक **कु. अभिषेक सुर्वे** याने 'श्री साई क्लासेस' यांनी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.*

**धीर सोडू नको. सतत प्रार्थना करत जा. सर्व काही वेळेवर घडून येईल.**

साजरा करण्यात आला. वर्धापनदिनानिमित्त शाखेत क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामने पाहण्यासाठी सर्व पालक व शाखेतील युवक उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री. शंभूराव देशपांडे (आंतरराष्ट्रीय खेळाडू) आणि प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मिलिंद भोई (संस्थापक-अध्यक्ष, भोई प्रतिष्ठान) उपस्थित होते. डॉ. भोई सरांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास एकूण १३० जण उपस्थित होते.

**● शाखेत झालेली व्याख्याने -**

गप्पाष्टक - श्री. सुमीत डोळे.
स्वामी विवेकानंद - श्री. शिरीष पटवर्धन
प्रार्थनेचा भावार्थ - श्री. शिरीष पटवर्धन
अभिरूप न्यायालय कार्यशाळा - श्री.मयूर कर्जतकर
अनुभव कथन - श्री. मंदार पोफळे
कथाकथन - प्रा. हर्षवर्धन खरे
स्वातंत्र्यवीर सावरकर - श्री. सौरभ करडे
प्रेरणादायी कथा - श्री. राहुल जगताप
गणितातील गमतीजमती - प्रा. अनिल गोरे
आपल्या जीवनात गुरुंचे स्थान - सौ. नलिनी जाधव

**संस्था भेट -**

उन्हाळी सुट्टीत पुणे मराठी ग्रंथालय, शेतकी महाविद्यालय व सिमला ऑफिस या संस्थांना भेट देऊन तेथील कामाची माहिती घेण्यात आली.

समाजातील निराधार, निराश्रीत, अनाथ मुलामुलींसाठी गेली १३ वर्षे 'आपलं घर' ही संस्था कार्य करीत आहे. समाजातील अशा मुलामुलींना अन्न, वस्त्र, निवारा व सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रेम व संस्कार मिळावे म्हणून संस्था अथक परिश्रम घेते. शाखेतील वर्धकांनी या संस्थेच्या वारजे शाखेला भेट दिली. तेथील मुलामुलींशी परिचय व कथाकथनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर दोन्ही संस्थांच्या कार्याच्या परिचयाचा कार्यक्रम झाला. शाखेच्या वतीने 'आपलं घर' संस्थेतील मुलामुलींना कंपास पेट्या भेट देण्यात आल्या.

दि. ४ नोव्हेंबरला 'ममता फाऊंडेशन' या संस्थेला भेट दिली. ही संस्था एचआयव्हीग्रस्त मुलांसाठी कार्यरत आहे. तेथील मुलांसोबत फराळाचा कार्यक्रम झाला. नंतर त्या संस्थेची माहिती घेतली.

**पालकसभा -**

वक्ते : श्री. एकनाथ बुरसे (मुख्याध्यापक, न्यू इंग्लीश स्कूल) विषय : वर्धकांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका, संख्या : २५

❖ **स्वामी दयानंद सरस्वती शाखा :**

**● वर्धापनदिन -**

दि. ११ ऑगस्ट २०१३ ला शाखेच्या वर्धापनदिनाला प्रमुख वक्ते डॉ. विश्वंभर चौधरी (सामाजिक कार्यकर्ते) आले होते. यावेळी एकूण संख्या १५० उपस्थित होती.

**अभिनंदन**

*'नवमहाराष्ट्र संघ' यांच्या वतीने 'आम्ही नूमवियं' करंडक यांच्या 'गोल खो-खो', 'लंगडी' या स्पर्धेत दयानंद सरस्वती शाखेतील संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत संघांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. याच स्पर्धेमध्ये शाखेतील वर्धक **कु. प्रथमेश राजगुडे** याला उत्कृष्ट बचावाचे पारितोषिक मिळाले.*

**साधनेत, बोलण्यात आणि कामात प्रामाणिक असा. तुमच्यावर कृपा झाली आहे हे तुम्हाला जाणवेल.**

**● शाखेत झालेली व्याख्याने –**

श्री. नीळकंठ शिंदे यांच्यासमवेत 'राजकारण' या विषयावर युवकांबरोबर चर्चा झाली. 'अभ्यास नियोजन' या विषयावर युवक कार्यकर्ता कु. प्रसाद देशमुख याचे व्याख्यान झाले.

**● विशेष कार्यक्रम –**

स्वामी विवेकानंद सार्धशती अंतर्गत गृह संपर्क अभियानाद्वारे परिसरातील ५०० घरांमध्ये संपर्क झाला.

मे महिन्यात ६० वर्धक व २० युवकांची तोरणा किल्ल्यावर सहल झाली. कडक उन्हातही सर्व मावळे उत्साहाने गड चढले. पण प्रचंड वृक्षतोडीमुळे रानचा मेवा काही चाखता आला नाही.

स्वा. सावरकर वक्तृत्व वाङ्मय स्पर्धेत शाखेतील ३२ वर्धकांनी व २ युवकांनी सहभाग घेतला होता. त्याचबरोबर बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात संपन्न झालेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये शाखेतील २० वर्धक व २ युवक सहभागी झाले होते.

ऑक्टोबर महिन्याच्या दर रविवारी अभ्यास शिबिर झाले. दि. १८ ऑक्टोबरला कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी एकूण ८० जण उपस्थित होते.

**❖ <u>स्वामी शिवानंद शाखा :</u>**

**● शाखेत झालेली व्याख्याने –**

शाखेत श्री. निलेश धायरकर याचे 'कारगिल' या विषयावर व्याख्यान झाले. या युद्धात हुतात्मा झालेल्या सर्व जवानांना श्रद्धांजली समर्पित करून व्याख्यानाचा समारोप झाला.

**● विशेष कार्यक्रम –**

रक्षाबंधनादिवशी वर्धकांनी सहकारनगर पोलिस स्टेशनमधील पोलिस कर्मचाऱ्यांना राख्या बांधल्या.

**● पालकसभा –**

'दैनंदिन शाखेचे महत्त्व काय ?' या विषयांवर शाखेत श्री. विनोद बिबवे यांनी पालकसभा घेतली. यावेळी २५ पालक उपस्थित होते.

**❖ <u>धर्मवीर शंभूराजे शाखा :</u>**

**● वर्धापनदिन –**

शाखेचा द्वितीय वर्धापन दिन दि. १४ डिसेंबरला प्रेरणा विद्यालयात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ बाल साहित्यिक व पुण्यात झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. राजीव तांबे यांनी भूषविले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी वर्धक, पालक व युवकांशी 'हसत-खेळत शिक्षण' या विषयावर संवाद साधला. 'मुलांवर पालकांनी व शिक्षकांनी छोट्या छोट्या जबाबदाऱ्या टाकल्या पाहिजेत, त्यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो' हे सांगितले. यावेळी शाखेचा वार्षिक अहवाल कु. अतुल दरेकर या युवकाने मांडला. कार्यक्रमाला १५० जण उपस्थित होते.

## अभिनंदन

*धर्मवीर शंभूराजे शाखेतील ९ वीतील वर्धक* ***कु. प्रतीक रामदास चांदगुडे*** *हा* National Means cum Merit Scholarship Scheme Exam 2012-13 *या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेत राज्यात गुणवत्ता यादीमध्ये ४३ वा आला.*

**जे जे तुम्ही आतुरतेने इच्छिता ते तुम्हाला मिळेलच.**

● **शाखेत झालेली व्याख्याने -**
क्रीडा - श्री. आत्माराम फुके
छत्रपती संभाजी महाराज - श्री. मंदार परळीकर
कथाकथन - श्री. मयूर कर्जतकर
गप्पाष्टक - श्री. संदीप जोगळे
आहार - कु. निखिल कुंभार
रामायणातील कथा - श्री. जयंत कवठेकर
अभ्यास - श्री. सुमीत डोळे

● **पालकसभा -**
१९ जानेवारीला शाखेत पालकसभा झाली. भाग २ चे भागप्रमुख श्री. राहुल जगताप यांनी ही पालकसभा घेतली. मासिक अभ्यासाचे नियोजन व वर्धिनीचा संक्रांत उत्सव हा विषय त्यांनी मांडला. पालकसभेस ३५ पालक उपस्थित होते.
१६ जूनला पालकसभेस संबोधित करताना श्री. संजय तांबट यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या वाटचालीसंबंधी मार्गदर्शन केले आणि वर्धिनीच्या ३४ वर्षांच्या कार्याचा धावता आढावाही घेतला. शाखाप्रमुख कु. विशाल शिंदे यांनी पुढील वर्षीच्या शाखा उद्दिष्टांचे सादरीकरण केले.

● **विशेष कार्यक्रम -**
दि. १ मार्चला शाखेत विज्ञानदिन साजरा करण्यात आला. इयत्ताश: वर्धकांनी 'पाणी' या विषयावर प्रकल्प सादर केले. दैनंदिन पाण्याचा वापर, पाण्याचे व्यवस्थापन, महाराष्ट्रातील पाण्याचे स्रोत या मुद्द्यांवर वर्धकांनी माहिती, प्रकल्प व प्रतिकृती सादर केली. याचे परीक्षण भागप्रमुख श्री. राहुल जगताप यांनी केले.
शाखेची वार्षिक चिंतन बैठक राजगडावर झाली. शाखेचा वर्षभराच्या कामाचा आढावा व पुढील वर्षीच्या उद्दिष्टांची निश्चिती झाली.
दि. २९ व ३० जूनला शाखेचा निवासी वर्ग पार पडला. वर्गामध्ये सौ. बागेश्रीदिदींचे 'एक होता कार्व्हर'चे वाचन झाले. वर्गामध्ये सर्व वर्धकांचे माहिती पत्रक भरून घेण्यात आले. त्याचप्रमाणे गणित प्रकल्प घेण्यात आला.

❖ **<u>स्वामी सुबोधानंद शाखा :</u>**

● **वर्धापनदिन -**
दि. २८ जुलै २०१३ ला शाखेचा वर्धापनदिन पार पडला. सुमारे १५० जण कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून श्री. संजय तांबट लाभले. कार्यक्रमामध्ये कु. गजानन केंडे याने अहवाल वाचन केले.

## अभिनंदन

*स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धक **कु. ज्ञानेश केंडे** याला 'पुणे हेच माहेरघर' हा पुरस्कार सौ. सुधा मूर्ती यांच्या हस्ते देण्यात आला.*

*स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धक **कु. विरेंद्र भालेकर** याची योगासन स्पर्धेसाठी राष्ट्रीय पातळीवर निवड झाली.*

*स्वामी ब्रह्मानंद शाखेतील युवक **कु. अमोल गोरे** याचा बीएमसीसी या कॉलेजमध्ये झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला.*

**लोक त्यांच्या अहंकारापायी अनंत दु:खे भोगतात.**

**• शाखेत झालेली व्याख्याने -**

आसाम दौरा अनुभव कथन - श्री. मयूर शेडगे
व्यायाम (माहितीपट) - कु. निलेश कुंभार
गुरुशिष्य गोष्टी - कु. तेजस जांभुळकर

**❖ स्वामी ब्रह्मानंद शाखा :**

**• वर्धापनदिन -**

दि. ४ ऑगस्ट २०१३ ला शाखेचा १० वा वर्धापनदिन साजरा झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ज्येष्ठ समाजसेवक व माजी नगरसेवक श्री. सुरेशनाना नाशिककर उपस्थित होते.

**• शाखेत झालेली व्याख्याने -**

शिवराज्याभिषेक दिन - कु. प्रतीक जाधव
चाफेकर बंधू - कु. प्रतीक जाधव
छत्रपती शाहू महाराज - कु. अमोल गोरे
संवाद कौशल्ये - श्री. मयूर कर्जतकर
आसाम - कु. प्रसाद गजमल
विवेकानंद व समर्थ रामकृष्ण - श्री. सुधाकर मुळे
डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन - कु. अभिषेक कदम

**• पालकसभा -**

दि. ३ ऑक्टोबरला पालकसभा घेण्यात आली. 'सहामाही परीक्षा आणि अभ्यास नियोजन' असा विषय होता. श्री. विलास कुलकर्णी यांनी पालकांशी या विषयावर संवाद साधला. या सभेला ४० पालक उपस्थित होते.

**• विशेष कार्यक्रम -**

सुट्टीतील कार्यक्रमांतर्गत बालगंधर्व मंदिरात भरलेल्या शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनास शाखेने भेट दिली. या शस्त्रांची निर्मिती, त्याचे प्रभावी उपयोग याची सविस्तर माहिती घेतली.

२३ जूनला 'उत्तराखंड महाप्रलय आणि प्रदूषण' या विषयांवर गटचर्चा घेण्यात आली.

शाखेत शिवराज्याभिषेक दिन, राजर्षी शाहू महाराज जयंती, महाकवी कालिदास दिन व अण्णाभाऊ साठे स्मृतीदिन हे दिन साजरे करण्यात आले.

दि. २१ जुलैला प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही गुणगौरव समारंभ पार पडला. हा कार्यक्रम भागश: झाला. या कार्यक्रमाला श्रीमती स्मिताताई गायकवाड व डॉ. विनेश नगरे हे उपस्थित होते.

शाखेतील युवक कु. संदीप इंगवले याने स्वत:च्या वाढदिवसाच्या दिवशी वर्षभरात एक नवीन ग्रामशाखा सुरू करणार असा वेगळा संकल्प केला.

**जिल्हास्तरीय १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरशालेय खो-खो स्पर्धेत विजयी संघातील पाच मुले स्वामी ब्रह्मानंद शाखेतील वर्धक होते. त्यांची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.**

**❖ राजर्षि शाहू शाखा :**

**• वर्धापनदिन :**

शाखेचा ५ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. कल्याण वर्दे उपस्थित होते. त्यांनी वर्धकांच्या जडणघडणीविषयी माहिती दिली.

**• शाखेत झालेली व्याख्याने :**

लष्कर प्रशिक्षण माहिती - श्री. नकुल थावरे
संवाद कौशल्य - श्री. मयूर कर्जतकर

**• पालकसभा -**

शाखेवर श्री. विनोद बिबवे व श्री. विश्वास कुलकर्णी यांनी पालकसभा गेतली. यावेळी शाखेचे महत्त्व पालकांना पटवून देण्यात आले.

**• विशेष कार्यक्रम -**

शाखेवर 'गिटार' या वाद्याचा परिचय वर्धकांना करून देण्यात आला. या संदर्भात श्री. अमित अनंतवार यांनी गिटार या वाद्याचा इतिहास वर्धकांना

**तुम्हाला अनुभव होईल की जो ईश्वर माझ्यात विराजमान आहे तोच तुमच्यातही आहे.**

सांगितला. त्यांनी राष्ट्रगीताचे वादन गिटारवर करून दाखविले.

शिक्षकदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमाला श्री. विश्वास कुलकर्णी व श्री. धनंजय डोबे उपस्थित होते. वर्धकांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि विश्वास सर यांची मुलाखत घेतली.

❖ **नरवीर तानाजी मालुसरे शाखा :**

● **वर्धापनदिन :**

शाखेचा दुसरा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते श्री. अजय चिनुरकर आणि श्री. विश्वास कुलकर्णी उपस्थित होते. 'स्व'-रूपवर्धिनी आणि सध्याची पर्यावरण समस्या या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

● **शाखेत झालेली व्याख्याने :**

छ. शाहू महाराज - श्री. कुणाल खेडकर
झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि गोपाळ गणेश आगरकर - श्री. अनिकेत जावळीकर
सामाजिक कार्यकर्ते - श्री. मंदार पोफळे
संवादकौशल्य - श्री. मयूर कर्जतकर

● **विशेष -**

शाळेतील मुलांना एकत्र घेऊन खो-खो आणि कबड्डी संघ तयार करण्याचे आव्हान शाखेतील युवकांसमोर होते. ते त्यांनी उत्तमरित्या पार पाडले. त्या संघांनी जिल्हा पातळीवर घेतल्या जाणाऱ्या स्पर्धांमध्ये भाग घेतला व उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली.

❖ **स्वामी विवेकानंद शाखा :**

● **वर्धापनदिन :**

शाखेचा ४ जुलैला वर्धापनदिनाचा कार्यक्रम झाला. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून श्री. शशीकांत मांडके लाभले. त्यांनी मुलांना 'आजच्या युगातील शाखेची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी एकूण १५० संख्या उपस्थित होती.

● **शाखेत झालेली व्याख्याने :**

गुरुपौर्णिमा - श्री. हर्षल सोनार
छत्रपती संभाजी महाराज - श्री. मयूर कर्जतकर
क्रीडाक्षेत्र - श्री. तेजस लिमये
आयुष्यातील गुरुंचे महत्त्व - श्री. विजय चव्हाण

● **विशेष कार्यक्रम -**

स्वामी विवेकानंद गृहसंपर्क अभियानाअंतर्गत परिसरातील प्रतिष्ठित व्यक्ती, सरकारी अधिकारी, पोलिस, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, गणेशोत्सव मंडळे, नगरसेवक इत्यादी सर्व स्तरांमध्ये व्यापक संपर्क करून वर्धिनीची माहिती देण्यात आली. या सर्वांची सविस्तर माहिती संकलित करण्यात आली व सर्वांच्या घरी स्वामी विवेकानंदांची प्रतिमा व वर्धिनीचे माहितीपत्रक देण्यात आले.

वर्धकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने शाखेवर 'ग्रेट भेट' हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन श्री. तेजस लिमये यांनी केले. श्री. तेजस लिमये हे आंतरराष्ट्रीय पातळीवरील जलतरणपटू आहेत. नुकत्याच ऑस्ट्रेलिया येथे झालेल्या कॉमनवेल्थ स्पर्धेमध्ये त्यांनी भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. तेजसदादाने सर्व मुलांसमोर आपले अनुभव मांडले.

❖ **स्वामी अभेदानंद शाखा :**

● **वर्धापनदिन -**

शाखेचा १६ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून वर्धिनीचे सहकार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी व प्रमुख अतिथी म्हणून माजी शिक्षणमंडळ अध्यक्ष श्री. प्रदीप धुमाळ हे लाभले होते. कार्यक्रमाला एकूण १३० जण उपस्थित होते.

**केवळ ईश्वराला शरण जा. मग तुम्हाला त्याची कृपा जाणवू लागेल.**

**● शाखेत झालेली व्याख्याने :**

छत्रपती संभाजी महाराज - श्री. मयूर कर्जतकर

छत्रपती शाहू महाराज - श्री. विक्रांत दिघे

वेताळ टेकडीवर खजिना शोध व वनभोजनाचा आनंद सर्वांनी लुटला. तसेच सर्व शाखेने मिळून कर्वेनगरमधील सुबोधानंद शाखेला भेट देऊन तेथील वर्धकांशी मैत्री साधली.

रक्षाबंधनानिमित्ताने वर्धक व युवकांनी लिज्जत पापड, चतुश्रृंगी पोलिस चौकी, रत्ना हॉस्पिटल या ठिकाणी भेट देऊन तेथील कर्मचारी, रुग्णांना राख्या बांधल्या. याचवेळी परिसरातील स्थानिक नगरसेवकांची भेट घेऊन त्यांना संस्थेची माहिती सांगण्यात आली.

दि. ४ नोव्हेंबरला गोपाळकृष्ण मंडळ, जनवाडी या ठिकाणी त्र्यंबकेश्वराच्या मंदिरात ३०० पणत्या लावून दीपोत्सव साजरा केला.

❖ <u>भगिनी निवेदिता शाखा :</u>

**● शाखेत झालेली व्याख्याने -**

दि. ३० नोव्हेंबरला श्री. शंतनु जोशी यांचे व्याख्यान झाले. 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

**● विशेष कार्यक्रम -**

२६ जानेवारीला 'स्त्री सुरक्षा' हे पथनाट्य शाखा परिसरात सादर केले. पथनाट्याद्वारे 'स्त्रियांवरील अत्याचार कशा प्रकारे दूर होऊ शकतात' याचे प्रभावी दर्शन वर्धिका व युवतींनी घडविले. या पथनाट्याचे सादरीकरण २७ जानेवारीला हिंगे प्रबोधिनीद्वारे आयोजित कार्यक्रमातही झाले.

शाखेतील युवती गट हा शिवप्रभूंचे अनुयायी येसाजी कंक यांच्या भुतोंडे गावी गेला होता. येसाजी कंकांची माहिती युवतींनी गावकऱ्यांना सांगितली. कु. सरोज शिंदे व कु. वैदेही बेहरे या युवतींनी नानचाकूचे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमानंतर येसाजी कंकांचे १३ वे वंशज राजेंद्र कंक यांनी सर्व युवती गटाचा पाहुणचार केला.

१९ मे रोजी Tellus संस्थेबरोबर टेकडी स्वच्छतेसाठी 'तळजाई' टेकडीवर गेलो होतो. या स्वच्छतेत वर्धिकांचा उत्तम सहभाग होता.

२९ मे रोजी शाखा लोहगडावर सहलीसाठी गेली होती. ही सहल खूप उत्साहवर्धक झाली. वर्धिकांनी करवंद आणि जांभूळ खाण्याचा आस्वाद घेतला.

५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त 'Tellus' आणि 'लोकमत' वर्तमानपत्राने आयोजित केलेल्या रॅलीत सहभाग घेतला होता. या रॅलीतून पर्यावरणाचा ऱ्हास कमी करण्याचा संदेश दिला. याच रॅलीत युवती गटाने रस्त्यावरील लोकांना कागदी पिशव्या वाटल्या आणि पर्यावरण वाचवण्याचा संदेश दिला.

१४ जून रोजी 'Tellus' यांनी आयोजित केलेल्या सिंहगड स्वच्छता मोहिमेमध्ये शाखेचा सहभाग होता.

**आई ही आपली पहिली गुरु असते. गुरुपौर्णिमेनिमित्त शाखेत वर्धिकांनी आपल्या आईला पत्र लिहिले. त्या पत्रात आईला कधीच न सांगितलेल्या गोष्टी पत्राद्वारे कळविल्या. या उपक्रमाचा खूप छान फायदा झाला.**

**● पालकसभा -**

शाखेत वार्षिक परीक्षा या विषयास अनुसरून पालकसभा घेण्यात आली. यावेळी वर्धिकांचे अभ्यास नियोजनामध्ये पालकांचा सहभाग कसा असावा हे सांगण्यात आले.

**विश्वास व खंबीरपणा याच मुळात खऱ्या खऱ्या गोष्टी आहेत. तुमच्याजवळ जर त्या असतील तर सर्व काही आहे.**

❖ **भवानी पेठ शाखा :**

● **शाखेत झालेली व्याख्याने –**

विज्ञानातील गमतीजमती-श्री. सुनील कुलकर्णी
ओळख वर्धिनीची – श्रीमती पुष्पाताई नडे
सूर्यनमस्कार (प्रशिक्षण) – श्री. जयंत कवठेकर
क्रीडाप्रशिक्षण – सीमाताई जोरकर

● **विशेष कार्यक्रम –**

दि. ५ सप्टेंबरला शाखेत मातृदिन साजरा करण्यात आला. यावेळी मुलींनी आपल्या आईला पत्र लिहिले. **दि. १ नोव्हेंबरला बांबूच्या चटईपासून आकर्षक अशा प्रकारे आकाशकंदील बनविले. मुलींनी आपल्या घरी नेऊन हे आकाशकंदील लावले. अवघ्या ३० रूपयांत एकेक कंदील तयार झाला. बाजारात हे आकाशकंदील ३०० रुपयांना मिळतात.**

दि. २५ नोव्हेंबरला धारेश्वर इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता कडू यांनी शाखेतील मोठ्या गटाला अभ्यासक्रमासंबंधी मार्गदर्शन केले.

● **पालकसभा –**

दि. २१ सप्टेंबरला शाखेत पालकसभा घेण्यात आली. पालकांना शाखेविषयी माहिती, आगामी कार्यक्रम, तासिका याबद्दल श्रीमती लता टिळेकर आणि श्रीमती मनिषा पाठक यांनी माहिती दिली. तसेच वर्धिनीतील त्यांच्या अनुभवाचे कथन केले.

❖ **घोरपडे पेठ मुलींची शाखा :**

● **शाखेत झालेली व्याख्याने –**

छत्रपती संभाजी महाराज – ॲड. श्री. संजय चितळे
स्वामी विवेकानंदांच्या कथा – श्री. ज्ञानेश पुरंदरे
राजमाता जिजाऊ – कु. सौरभ कर्डे
आई व मुलीचे नाते – श्रीमती पुष्पाताई नडे
युद्धातील अनुभव – लेफ्टनंट कर्नल अनिल साळुंके
संवाद कौशल्य – श्री. मयूर कर्जतकर
गप्पाष्टक – श्री. निलेश धायरकर


● **विशेष कार्यक्रम –**

१५ मे रोजी 'मूकनाट्य कसे करावे ?' यावर शाखेतील युवती कु. मुक्ता यादव हिने कार्यशाळा घेतली. त्यानंतर मुलींनी पर्यावरण आणि स्त्री अत्याचार या विषयांवर मूकनाट्य सादर केले.

२४ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनानिमित्त भागश: लहान गटाकरिता चित्रकला स्पर्धा व मोठ्या गटाकरिता निबंध स्पर्धा झाली. चित्रकला स्पर्धेचे विषय 'रक्षाबंधन, झेंडा वंदन, ऐतिहासिक प्रकल्प' असे होते व निबंध स्पर्धेचे विषय, 'राष्ट्रीय एकात्मकता, माझा भारत महान, आजची स्त्री' हे होते.

● **पालकसभा –**

शाखेतील १६ वर्धिकांच्या घरी संपर्क झाला व वर्धिनीची सविस्तर ओळख करून देण्यासाठी पालकसभा घेण्यात आली. पालकसभेस २६ पालक उपस्थित होते.



**संन्याशाजवळ संपत्ती असणं अत्यंत वाईट. अशी कुठलीच गोष्ट नाही की जी या चकत्या (रुपये) करु शकणार नाहीत. त्यामुळे प्राणसंकट देखील ओढवतं.**

# एक भावनिक भेट

प्रसन्न. धर्मवीर शंभुराजे शाखेतील ७ वी मधील एक हसरा, आनंदी वर्धक. सर्व वर्धकांमध्ये सर्वात वेगळा. त्याचं वेगळेपण दिसून यायचं ते त्याच्या वेशभूषेतून आणि स्वभावातून. लाल रंगाचा टीशर्ट, निळी जीन्स् पँट, पाठीवर आडवं दप्तर, कपाळावर नेहमी भस्माचे त्रिपूर ओढलेले आणि त्याच्या मधोमध कुंकू लावलेलं. शाखेत प्रसन्न आला की पहिला सायकल लावणार आणि सर्व वर्धक, युवकांना येऊन भेटणार आणि म्हणणार 'शुभसंध्या!' इ. ७ वीमध्ये सर्व वर्धकांप्रमाणे हाही तेवढाच हुशार आणि गुणी विद्यार्थी. युवकांना आणि इतर वर्धकांना त्याच्याबरोबर बोलताना वेगळीच प्रसन्नता वाटायची. शाखेतील प्रत्येकाला तो हवाहवासा वाटणारा. घरामध्ये आई-वडील आणि मोठी बहीण.

घरच्यांचा स्वभावही मनमिळाऊ. पण काही घरगुती कारणांमुळे प्रसन्नला आणि त्याच्या कुटुंबाला घर सोडावं लागलं. वडील हे दुसऱ्याच्या रिक्षावर रिक्षाचालक. आई एका छोट्या कंपनीत कामाला. आईवडील महिन्याला जे पैसे कमवत ते सर्व मोठ्या बहिणीच्या आजारपणात खर्च होत. पुण्यातही स्वत:चं असं घर नाही. परिस्थिती बिकट आणि त्याहून मोठं म्हणजे आर्थिक संकट. या सर्वांतून मार्ग काढण्यासाठी आई वडिलांनी विचार केला आणि पुणं सोडलं कायमचं. आपला संपूर्ण संसार त्यांनी पुण्यापासून १०० कि.मी.वर असणाऱ्या फलटण गावी हलवला. पुण्यामध्ये महागाईने राहण्यापेक्षा एका गावात राहणं हे या मध्यमवर्गीय कुटुंबाला परवडलं. ७ वीतील प्रसन्नला घरच्या परिस्थितीची पुरेपूर जाणीव आहे. म्हणून पुण्यापासून लांब गेल्यानंतरही तेथील वातावरणाशी तो एकरूप झाला. त्याने घरातील या परिस्थितीशी मिळतं जुळतं घेतलं. दरवेळी संपर्काला गेलो की त्याच्या आईशी संवाद होत असे आणि दरवेळी आईच्या तोंडात एकच वाक्य असे. इतर मुलांपेक्षा माझा मुलगा हा समजदार आहे. आणि हो तो आहे ही तसाच. मोठ्या बहिणीच्या आजारपणामुळे सतत घरात अस्वस्थता असायची. घरामध्ये तणावाचे वातावरण नेहमी असायचे. पण यावेळीही प्रसन्न आपली सर्व कामे आटपून त्यांच्यासमोर अभ्यासाला बसायचा. त्याचा प्रभाव असेल की काय पण आई वडिलांची अस्वस्थता या लहान मुलाकडे पाहिलं की कमी व्हायची. घरातील सर्व कामे करणं, आईला मदत करणं हे एक मुलगा असूनही तो करतो.

शाळेमध्येही सर्व शिक्षकांना हवाहवासा वाटणारा हा विद्यार्थी. अभ्यासामध्ये प्रसन्न हुशार आहेच पण त्याचबरोबर शालाबाह्य अन्य स्पर्धांमध्येही प्रसन्नने मोलाची कामगिरी केली. मागील वर्षी लक्ष्मीनारायण चॅरिटेबल ट्रस्टद्वारा आयोजित राज्यस्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धेत प्रसन्नने सुवर्णपदक व उत्कृष्ट संघनायकाचे पारितोषिक मिळवले. ४ थी मध्ये असताना स्कॉलरशिप परीक्षेतही प्रसन्नची कर्तबगारी वाखाणण्यासारखी. विविध निबंध, वक्तृत्व अशा स्पर्धांमध्येही तो उत्साहाने सहभाग घेत असे. पण आपल्या सर्व

**मी एक गोष्ट सांगते, तुला शांती हवी असेल तर इतरांचे दोष पाहू नकोस. उलट स्वत:चेच दोष शोध.**

मित्रांना, शाखेला, शाळेला सोडून घरच्या परिस्थितीमुळे तो फलटणला कायमचा स्थायिक झाला आहे. फलटणमधीलच एका शाळेमध्ये त्याने इयत्ता ७ वीमध्ये प्रवेश घेतला. मधे आम्ही काही युवक त्याला भेटायला फलटणला गेलो. आम्हा युवकांसाठी ही भेट आयुष्यभर लक्षात राहणारी आहे. आम्ही येणार म्हणून सकाळपासून तो सर्व आवरून बसला होता. आम्ही गेलो आणि घरात पाऊल टाकलं तेवढ्यात पळत येऊन प्रसन्नने आम्हाला मिठी मारली आणि विचारलं, 'सर तुम्ही कसे आहात ?' आणि त्याच्या डोळ्यातून अश्रूंचा प्रवास चालू झाला. आमच्या मिठीमध्ये तो किती वेळ होता याचं आम्हाला भान नव्हतं. पण त्याचे ते अश्रु पाहून आमचेही डोळे पाणावले. गप्पा झाल्या. आईशी बोलणं झालं आणि आम्ही आता निघतो असं म्हटल्यानंतर तो म्हणाला, 'सर थांबा ना थोडा वेळ. तुम्ही आल्यावर मला इथं करमतंय.' आणि पुन्हा त्याचे डोळे वाहू लागले. यावेळी त्याच्या आईच्याही डोळ्यातून आलेलं पाणी आमच्या नजरेतून सुटलं नाही. आम्हाला निरोप देण्यासाठी घराबाहेरील मंदिरापर्यंत तो आला आणि जाईपर्यंत त्या मंदिराबाहेरील नंदीशेजारी थांबला होता. आम्ही गेल्यावरही कित्येक वेळ तो तिथंच उभा असावा. त्यादिवशी शाखेत गेल्यावर या प्रसंगाच्या विचारात आम्ही युवक गढून गेलो.

प्रसन्नचं आणि आपलं नातं काय ? कोणतंच नाही. मग प्रसन्नच्या डोळ्यात भेटताक्षणी पाणी का यावं ? या भेटीमुळे तो आनंदी का झाला ? आम्ही तर फक्त साधी भेट दिली त्याला. त्यादिवशी त्याने आम्हा सर्वांचे दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, वाढदिवस लिहून घेतले. सर्व मित्रांची त्याने आपुलकीने विचारपूस केली. रक्ताच्या नात्यापेक्षाही सर्वश्रेष्ठ असं एक नातं असतं. त्याला कोणतंच नाव देऊ शकत नाही. हे नातं भावनांवर टिकतं. आपुलकीवरती जगतं. प्रसन्नची आणि आमची आता रोजची भेट होणार नाही. विविध संपर्क माध्यमातून आम्ही त्याच्याशी भेटू, बोलू पण प्रसन्नची ही भेट खरोखर या सर्वांपेक्षा निराळी होती. त्या दिवशी त्याचं आमच्याविषयी असलेलं प्रेम, आपुलकी, आदरभाव हा त्याच्या डोळ्यांमध्ये आम्हाला दिसला. शब्दात सगळंच काही सांगता येत नाही. पण डोळ्यातून आलेली आसवे सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन जातात.

**किशाभाऊंनी संस्था स्थापन करताना अशाच कामातून उमललेल्या अकृत्रिम नात्याची अपेक्षा केली नसेल काय ? माझ्या मते तरी किशाभाऊंना हेच अपेक्षित होते. त्यादिवशी आम्हा सर्वांना कळलं, वर्धिनी आपल्याला घडवते म्हणजे नेमके काय करते ? किशाभाऊंच्या शब्दात सांगायचं झालं तर 'विशाल मनाचे कार्यकर्ते, वर्धक' कसे आहेत याचा प्रत्यक्ष अनुभव हा त्यादिवशी आला. त्यादिवशी आम्हा युवकांना जाणवलं की कोणत्या तरी आयुष्यात आपल्याला खूप महत्त्व आहे. खरं सांगू. पण त्या दिवशी आम्हा युवकांना एका प्रश्नाचं उत्तर मिळालं ते म्हणजे 'आम्ही वर्धिनीत का येतो !'**

**- गणेश पवार**

**बेटा, येथे कोणीही परका नाही; हे सर्व जग तुझेच आहे.**

## प्रोत्साहनही आणि जबाबदारीही

अमेरिकास्थित वर्धिनीचे एक खंदे आधारस्तंभ डॉ. बाळ जोशी यांना वर्धिनीने 'क्रीडा व पोषक आहार' या विषयावरचा एक प्रस्ताव देणगीसाठी सादर केला होता. या प्रस्तावालाही नेहमीप्रमाणे त्यांनी अनुकूल प्रतिसाद देत रुपये १३,४३,०९३/- या रकमेची देणगी दिली आहे. या देणगीमुळे सादर केलेल्या 'क्रीडा व पोषक आहार' या प्रकल्पासाठी येणाऱ्या खर्चाची व्यवस्था तर झाली आहेच. शिवाय त्यांच्याच मदतीतून १९९६ पासून सुरू असलेल्या डॉ. बाळ जोशी व सौ. प्रभा जोशी विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेमध्ये सुमारे सात लाखांची भर पडणार आहे. डॉ. बाळ जोशी यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

अशा प्रतिसादामुळे काम करण्याचा हुरूप जसा वाढतो तशी एक मोठी जबाबदारीही संस्थेवर येते आणि या बाबतीत अधिक सजगतेने काम करण्याची आवश्यकता आहे याची जाणीव होते. सादर केलेल्या प्रकल्पामधील प्रगती वेळोवेळी त्यांच्यापर्यंत पोहोचत राहील याची काळजी आपण संबंधित कार्यकर्ते घेऊच.

## माडगांवकर पुरस्काराचे मानकरी

मुंबईच्या माडगांवकर ट्रस्टद्वारा प्रतिवर्षी 'माडगांवकर पुरस्कार' देण्यात येतो. वर्षभरामध्ये क्रीडा, शिक्षण, नेतृत्व, वक्तृत्व, सेवा यांमध्ये सर्वार्थाने कर्तृत्व गाजविणाऱ्या वर्धक - युवकांना निरीक्षण, मूल्यांकन, मुलाखती या चाळण्यांमधून तावून सुलाखून मगच माडगांवकर पुरस्काराचे मानकरी होता येते.

यावर्षीचे पुरस्कार विजेते खालीलप्रमाणे :

**१) शालेय गट : चि. हर्षल खैरनार** (स्वामी अभेदानंद शाखा)

**२) कनिष्ठ महाविद्यालय गट : कु. त्रिशला शासम** (भगिनी निवेदिता शाखा)

**३) पदवीधर गट : श्री. संदेश शेंडकर** (स्वामी शिवानंद शाखा)

❖ ❖ ❖

**सूर्योदय मित्रमंडळ आयोजित वक्तृत्व स्पर्धेत**

**भगिनी निवेदिता शाखेतील पुढील वर्धिकांना पारितोषिके मिळाली -**

१) सबीन शेख (६ वी) - प्रथम क्रमांक

२) पायल जिरेसाळ (६ वी) - तृतीय क्रमांक

३) शगुफ्ता शेख (७ वी) - उत्तेजनार्थ

४) मानसी लहाटे (७ वी) - उत्तेजनार्थ

**चुकणे हा माणसाचा धर्म आहे. त्याकडे कोणी लक्ष देऊ नये. ते त्याच्यासाठी अपायकारक आहे. दोष शोधण्याची सवय त्यामुळे लागते.**

# स्पर्धा परीक्षा केंद्र

वर्षभरात पुढील कार्यक्रम झाले

| **कार्यक्रम** | **वक्ते** | **विषय** |
|---|---|---|
| स्वामी विवेकानंद सार्धशती समारोह समिती, व्याख्यानमाला | श्री. विवेक घळसासी | स्वामी विवेकानंद |
| नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | श्री. ज्ञानेश पुरंदरे | नेताजी सुभाषचंद्र बोस |
| अर्थसंकल्प-विशेष सत्र | श्री. सतीश पाटील | अर्थसंकल्प - महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग अभ्यासक्रमातील अर्थशास्त्र |
| शहीद दिन | प्रा. विजय नवले | शहीदवीरांचे स्मरण |
| विशेष संवाद सत्र | श्री. शिवाजी जगताप | अनुभव कथन |
| सत्कार समारंभ | श्री. विलास कुलकर्णी | स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्णांचे अभिनंदन |
| कारगिल विजय दिन | ब्रि.(नि.) श्री. हेमंत महाजन | सीमा सुरक्षा प्रश्न |
| लोहगड सहल | - | - |
| अभ्यास यज्ञ | - | - |
| शिष्यवृत्ती योजना २०१३-१४ उद्घाटन समारंभ | डॉ. श्रीकर परदेशी (आयुक्त पिं. चिं. मनपा) | महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग - मार्गदर्शन |

## अभिनंदन

*सन २०१३ मध्ये स्पर्धा परीक्षा केंद्रातून*
*महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग व इतर स्पर्धा परीक्षांमधून*
*विक्रीकर निरीक्षक, पोलिस निरीक्षक, महिला बालविकास,*
*आयुर्विमा महामंडळ, अर्थ व सांख्यिकी विभाग*
*यात २५ विद्यार्थ्यांची*
*अधिकारी पदी अंतिम निवड झाली.*

**लोक केवळ दोषच काय तो पाहतात. तुम्ही गुण पाहायला हवेत.**

स्पर्धा परीक्षा केंद्रातील यशस्वी विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळ्यानिमित्त केंद्राचा विद्यार्थी-कार्यकर्ता मल्लीनाथ कांबळे याने या प्रसंगी व्यक्त केलेले मनोगत.

आदरणीय व्यासपीठ, स्व-रूपवर्धिनीचे पदाधिकारी नि उपस्थित वर्धक-वर्धिका,

अशा सभारंभाला पहिल्यांदाच बोलतोय. काही मुद्दे मागे-पुढे होतील. कृपया आपण समजून घ्याल - ही आशा. माझा 'वर्धिनीसंपर्क - काम - संघर्ष - केंद्राचं यश' असा हा अभ्यासप्रवास मी इथे मांडतोय.

'विकसीत व्हावे - अर्पित होउनि जावे' हे ब्रीदवाक्यच संस्थेबाबत सर्वकाही सांगून जातं. वंचित व दुर्बल समाजघटकांतील 'बुद्धिमान बाळ नि तरुणांचं सक्षमीकरण' हा उद्देश घेउन '24×7' काम करणारी वर्धिनी.

साधारण पावणेदोन वर्षापूर्वी (जुलै-ऑगस्ट 2011) PSI-Mains ची तयारी, श्री. अमोल सुतार या इंजिनिअर वर्गमित्राकडे राहून करत असताना; ABC मधे "ग्रामीण भागातील 'गरजू व हुशार मुलांकरिता' मोफत MPSC मार्गदर्शन वर्ग" असं पोस्टर नजरेस पडलं. 'मोफत' हा शब्द माझ्यासाठी महत्वाचा होता. कारण नोकरीच्या शोधात पुण्यात येउन 2-3 महिने झालेले नि फारकाळ मित्राच्या पैशांवर विसंबून राहणं शक्य असलं तरी 'योग्य' नव्हतं. कारण त्यावेळचं माझं ध्येयच मुळी PSI चं - Class II चं - नोकरी मिळवण्याचं होतं नि काम करत 'हा' अभ्यास मला शक्य होता. बाकीच्या Classes ना फक्त 'Fee' तेवढीच काय ती व्यवस्थित भरून घेतली जात असताना हा वर्ग म्हणजे 'मार्गदर्शन + ग्रंथालय + अभ्यासिका' अशी तिहेरी 'लॉटरी' होती. मी त्याच दिवशी बॅचची नि कामाबद्दलची चौकशी वर्धिनीचा शोध घेउन केली. 2011-12 च्या वर्धिनीच्या पहिल्याच 'शिष्यवृत्ती बॅचच्या' प्रवेश-परीक्षेसाठी Enrollment करणारा मी पहिलाच विद्यार्थी होतो. बॅचमधल्या Final Selection नंतर श्री.चंदन सर व वर्धिनीचे कार्यवाह श्री. शा.पु. यांनी मला स्पर्धा परीक्षेच्या केंद्रातच 'Co-Ordinator' म्हणून कामाची संधी दिली नि पुण्यातल्या 'खर्चाची' माझी मोठी काळजी मिटली.

त्यानंतर 'संस्कारांच्या व विकसनाच्या' या प्रक्रियेत मी नकळतपणे रूळत गेलो. वर्धिनीच्या समोरच - आता जिथं 11 मजली इमारत उभी राहतेय - तिथं बकाल झोपडपट्टी होती. बाहेरच्या मारामाऱ्या व रोजच्या भांडणाच्या पार्श्वभूमीवर सर्वस्वी भिन्न 'वातावरण' - वर्धिनीच्या गेटमधून आत येतानाच या पवित्र 'इमारतीत' - खरंतर ही इमारत नाही तर 'मंदिर' म्हणू - इतकं 'पावित्र्य नि सुसंस्कृतपणा' स्पष्टपणे जाणवायचा. प्रत्येक lecture च्या शेवटी होणारी 'नमो जन्मभूमी ---' ही प्रार्थना म्हणताना भारतमातेबद्दलची भक्तीभावना दिवसेंदिवस द्विगुणित व्हायची. वर्धिनीत 'काम' करतोय - असं मात्र कधीच वाटलं नाही. शिप - शापु. वा पुष्पाताई असोत वा मेधाताई, स्मिताताई, तांबटवहिनी - अब्बा - मुतालिक काका - सर्वांचचं वागणं नेहमीच स्नेह नि सौहार्द्राचच.

केंद्रात मनिषाताई वा चंदन सर यांनी कधीही Bossing केलं नाही. चंदन सरांसारखे 'तळमळीचे - सच्चे नि सक्षम' पालक व वर्धिनीचा एकंदरीत सर्व स्टाफ यांच्यामुळे केंद्राच्या 'यशाचा आलेख' उत्तरोत्तर उंचावत गेलाय. 'विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी' चालवलेलं अभ्यासकेंद्र म्हणावं - इतका 'जबाबदारयुक्त मोकळेपणा' वर्धिनीत आहे. चांगल्यात चांगले शिक्षक असोत वा नवीन पुस्तके वा अभ्यासिकेचं Infrastucture असेल - कोणत्याही बाबतीत जास्तीत जास्त चांगलं 'ते - ते' देण्याचा केंद्राचा नेहमीच प्रयत्न असतो.

केंद्रानं मागील 2 वर्षात जरी 'कौतुकास्पद, अभिमानास्पद व सुखावणारं' यश मिळविलं असलं तरी अजून सुधारणेला खूपच वाव आहे. यशदा चे मानि. संचालक श्री. सतीश पाटील सरांसारख्या 'अनुभवी व्यक्तींचं मार्गदर्शन' याकामी अतिशय गरजेचं आहे. यामुळे मध्यंतरीच्या बंद अवस्थेतून अल्पावधीतच Class-II वा Group B ची का असेना परंतु आता जशी 'List' दिसतीय तशीच - 'Class I व UPSC' तल्या Selected Candidates ची list याच 'ग्रामीण - जिगरी' तरुणाईतून वर्धिनीला व समाजाला - येत्या काळात - मिळेल, असा पूर्ण विश्वास 'एक Co-Ordinator अधिकारी' म्हणून मला वाटतोय.

पुण्याला जसं 'विद्येचं माहेरघर' म्हटलं जातं, त्या धर्तीवर मला वर्धिनीला पुण्यात 'रचनात्मक व सर्जनशील' पद्धतीचं काम करणाऱ्या 'चांगल्या माणसांचं माहेरघर' म्हणावसं वाटतं. आज जगात 'चांगल्या' माणसांची खूपच वानवा आहे. मी याबाबतीत 'भाग्यवान' आहे, कारण - आज अल्पसं का होईना - जे 'यश' मी मिळवू शकलोय - ते 'यश' मला भेटलेल्या माणसांतल्या चांगुल - पणाचा परिपाक आहे. यात माझ्या 'साखरा' गावचे ग्रामस्थ, शिक्षक, मित्रमंडळी, घरमालक,

तुम्ही जरी कोणाच्या दोषांची मोजदाद करत बसलात तरी, त्याने कधीतरी त्याचे काही बिघडते काय ? तुम्हाला मात्र त्यामुळे अपाय होतो.

वर्धिनी व हितचिंतक-या सगळ्यांचाच प्रत्यक्ष /अप्रत्यक्षपणे समर्थपणाने उभा राहिलेला मदतीचा हात आहे. मी 'मात्र' त्यांचा 'प्रतिनिधी' आहे. आज माझ्यात जर काही 'चांगुलपणा' असेल तर तो या पदोपदी भेटलेल्या 'माणसांचा' व माझ्या निरक्षर 'आईचा' आहे. माझी 'सोशिक, भोळीभाबडी परंतु समंजस आई' जीला अजही दुसऱ्याच्या शेतांवर राबावं लागतंय, तिने 'पाच' बहिणींची जबाबदारी पार पाडतानाच मला 'इतकं शिकवलयं'. ५ वी तल्या ५६% ने सुरवात ते 'वालचंद इंजि. कॉलेज, सांगली' मधल्या ११/२ वर्षांच्या तपानंतर, मला माझ्या 'थकलेल्या वृद्ध आईला व अपंग अप्पांना' त्यांच्या हक्काचे विसाव्याचे दोन क्षण दाखविण्याची पहिली संधी या 'जिल्हा महिला व बालविकास अधिकारीपदानं' दिलीय.

समाजाच्या ऋणातून 'मी' कधीच उतराई होऊ शकणार नाही, परंतु 'प्रत्यक्ष दुर्बल व वंचितांसाठी' काम करण्याच्या माध्यमातून का होईना, अंशत: या सगळ्या माणसांच्या मदतीला न्याय देण्याचा माझा कायमच प्रयत्न राहील. या अल्पशा यशावर मी बिलकुल समा-धानी नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "एक हजार मुले ४ थी शिकून जे होणार नाही, ते 'एक Graduate' शिकला की होईल." हेच विधान - आजच्या घडीला - 'एक हजार मुले class II होऊन जे होणार नाही, ते 'एक IAS' झाला की होईल' - असे चपखलपणे बसेल. मला आता यापुढे UPSC साठी लढायचंय. तुम्हा सर्वांच्या सदिच्छासह - ह्यासाठी मी 'पूर्ण क्षमतेने' धडपडत राहीन. आणि मला विश्वास आहे कि - 'मी नक्कीच UPSC-ची परीक्षाही Crack करेन'. आजचं आम्हा सर्वांचं 'हे' अधिकारीपणाचं यश - जेव्हा माझ्यासकट इथे बसलेल्या प्रत्येकाला 'यशाकडे झेपावण्या-साठी' खुणावत राहील नि 'स्वच्छ हाताचे - समर्थ खांद्याचे - तल्लख बुद्धीचे व विशाल मनाचे' उच्च अधिकारी समाजात व एकंदर यंत्रणेत 'कार्यक्षमपणे विधायक बदल' घडवित असताना पाहून मला समाधान वाटेल.

झाड तोडताना आपल्याला शेवटचा 'एकच' घाव यश देणारा वाटत असतो. पण ते खरं नसतं. खरंतर याआधीचे कितीतरी 'घाव' याकामी पडलेले असतात. यशाचं तसंच आहे. एकेका यशाखाली अनेक 'अपयशं' पुरलेली असतात. माझ्याकडे तर अपयशाचा 'खजिनाच' आहे. अपयश आलं म्हणून थांबणं 'योग्य' आहे का? शेवटच्या घावाला यश मिळणार असलं तरी, (अपयशानंतरचाही) पडणारा प्रयत्नाचा 'प्रत्येक' घाव पूर्ण ताकदीचा नको का? अभ्यास सगळेच करतात, मग मोजकेच 'यशस्वी' का होतात? मला वाटतं याचं सगळ्यात मोठं कारण - आपण अभ्यासाइतकी मेहनत 'परीक्षातंत्रावर' घेत नाही. यश = अभ्यास + तंत्र. Every Indivisual is different. आयोगाला आपल्याकडून 'काय अपेक्षित' आहे याचा विचार करून 'भावनिक अभ्यास' न करता - आपापल्या व्यक्तिमत्वानुरूप या 'परीक्षातंत्रावर' आपण ज्यादा Work-out केलं, तर नक्कीच आपलंही नाव या 'Selected Candidate' च्या यादीत दिसेल.*

स्पर्धा परीक्षेचा निर्णय घेतलात तर माघार नको. Never Give up! स्पर्धा परीक्षेत अजूनही न पडलेल्यांना एक सांगेन की, '१००% जीवाचं रान करून चिकाटीने 'निष्ठेने' किमान दीड-दोन वर्ष प्रयत्नशील राहण्याची तयारी असेल तरच 'यात' पडा. 'यशस्वीतेची' व्याख्या तुमच्या 'निखळ-आनंद - आवड व समाधानाभोवती' फिरायला हवी. सुदैवाने, आपल्याकडे 'अनेक क्षेत्रं' उपलब्ध आहेत.

देवानं - निसर्गानं आपली 'माणूस' म्हणून निर्मिती करताना, प्रत्येकाला काही ना काही 'विशेष गुण' देऊन घडवलयं. परमेश्वरानेच 'निर्माण' केलेल्या 'या पृथ्वीवरचे' - अनादी काळाच्या तुलनेत - काही क्षणांचेच 'पाहुणे' आहोत. आपल्या प्रत्येकाकडे त्यानं एकच 'आयुष्य' दिलयं - जिथं पुन्हा Once More नाही. 'आयुष्यात काय मिळवून - काय देऊन जायचं' ही आपापली Choice आहे. आपल्या-तल्या नैसर्गिक - दैवी - विशेष गुणांचं संवर्धन व सक्षमीकरण करण्यासाठी 'प्रयत्नशील', इथल्या प्रत्येकाच्या धडपडीला ईश्वरचरणी आशीर्वाद मिळो, ही प्रार्थना करतो नि आपल्याला 'आनंदमयी आयुष्याचं' सुयश चिंतीतो.

वर्धिनीच्या या खास 'गुणगौरवानिमित्त नि यशाबद्दल' शेवटी एवढचं म्हणेन -

"अभी तो नापी है मुठ्ठीभर जमीन -
आगे तो सारा 'आसमान' बाकी है।"

जयहिंद !

* माझ्यासारखा सामान्य, ग्रामीण, दारिद्र्यरेषेखालील, अशिक्षित कुटुंबातील - कसलाही आगापिछा नसणारा साधा मुलगा :- 'परिस्थितीशी झगडून' - IAS ची स्वप्नं बघत असेल - स्पर्धा परीक्षेत यशस्वी होत असेल - तर "तुम्ही" का नाही होऊ शकणार "यशस्वी"?

**एखाद्याने माझ्यासाठी क्षुल्लक काम जरी केलं, तरी त्याची देखील आठवण ठेवण्याचा मी प्रयत्न करतो.**

# पाकोळी बालवाडी

### ❖ बालवाडी संक्रांत उत्सव -

बाल विभागाचा मकर संक्रमण उत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये झाला. प्रमुख पाहुण्या म्हणून भावे पूर्व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मा. सौ. मेधाताई दाते व अध्यक्ष म्हणून पाकोळी बालवाडीचे माजी विद्यार्थी मा. श्री. चेतन सूर्यवंशी हे लाभले.



ओंकार पूजनानंतर बालवाडी शिक्षिकांनी 'भुवनमण्डले नवयुगमुदयतु सदा विवेकानन्दमयम्।' हे पद्य सादर केले. सौ. मनिषाताईंनी प्रास्ताविक केले. मोठ्या गटातील मुलांनी नव्याने सुरू केलेल्या इंग्रजी व संस्कृत विषयांची गाणी म्हटली. 'राजाची फजिती' ही संगीतिका सौ. संगीताताईंनी बसवली होती. हे कार्यक्रम पालकांना फार आवडले. बालशाखेतील मुलांनी संगीताच्या तालावर तालबद्ध योगासने केली. सौ. मेधाताईंनी मुलांना प्रबोधनपर गोष्ट सांगितली. सकस आहाराबाबत पालकांना मार्गदर्शन केले.

### ● पालखी सोहळा -

२२ जूनला वटपौर्णिमेनिमित्त मोठ्या गटाची वृक्षदिंडी काढण्यात आली. ''वडाची फांदी तोडू नका'' अशा घोषणा देऊन मुले सिद्धेश्वर मंदिरात पोहोचली. तेथे वडाच्या पाराखाली बसून ताईंनी 'पर्यावरण' या विषयावर गोष्ट सांगितली.

१९ जुलैला आषाढी एकादशीचे औचित्य साधून पाकोळी बालवाडीने ज्ञानेश्वर पालखी सोहळा आयोजित केला होता. उत्सवप्रमुख म्हणून सौ. संगीताताई व सौ. अपर्णा ताई या काम पहात होत्या. आषाढी एकादशीच्या दिवशी सर्व मुले वारकऱ्यांच्या, संतांच्या वेशभूषा करून सकाळी ९ वाजता उपस्थित होती. प्रथम श्री. शिरीष पटवर्धन व श्रीमती पुष्पाताई ह्यांच्या हस्ते पालखीतील पादुकांचे पूजन झाले. ''ज्ञानबा तुकाराम ज्ञानबा तुकाराम'' असा जयघोष सुरू झाला आणि पालखीचे प्रस्थान 'कण्वाश्रम' विठ्ठल मंदिराच्या दिशेने सुरू झाले. बालवाडीतील व शाखेतील मुलांनी विठ्ठल-रखुमाईची वेशभूषा केली होती. त्यामुळे ह्या पालखीत वारकऱ्यांसमवेत 'प्रत्यक्ष देवही अवतरले' असे वाटत होते.

'ज्ञानबा तुकाराम-ज्ञानोबाची पालखी, विठूचा गजर, हरिनामाचा झेंडा रोविला' अशा अनेक घोषणा देत सर्व मुले देहभान विसरून आलेल्या पावसाचा आनंद घेत विठूमय झाली होती.

पालखी 'कण्वाश्रम' विठ्ठल मंदिरात येऊन पोहोचली. त्यानंतर मंदिरात सौ. संजीवनीताई, सौ. कविता ताई यांनी पर्यावरण ह्या विषयावर कीर्तन सादर केले. त्यानंतर उपस्थित पालकांसमोर 'स्त्री-भृणहत्या' हा विषय घेऊन सौ. मालनताई, सौ. संगीताताई, सौ. मृदुलाताई व सौ. राणीताई यांनी भारुड सादर केले. प्रत्यक्ष पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन केल्याचा अविस्मरणीय अनुभव मिळाला.

❖ ❖ ❖

**क्षमावृत्ती असणे ही तपस्याच आहे.**

**❖ गुरुपौर्णिमा –**

मधल्या व मोठ्या गटात गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा झाला. सर्व गटातील विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देऊन शिक्षकांना वंदन केले. भक्ती करताना नेहमी मन लावून करावी अशा आशयाची स्वामी विवेकानंदांची गोष्ट विद्यार्थ्यांना सांगण्यात आली.

---

## ❖ बालवाडी शिक्षिका शिबिर

**विषय :** वार्षिक प्रशिक्षण शिबिर **स्थळ :** 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू

**कालावधी :** सोम. दि. ३ जून ते शनि. दि. ८ जून

| अ.क्र. | विषय | व्याख्याते |
|---|---|---|
| १. | शुभारंभ सत्र – बालशिक्षणाची उद्दिष्टे | श्री. रामभाऊ डिंबळे |
| २. | बालमानसशास्त्र | सौ. कुंदाताई वर्तक |
| ३. | कार्यक्रम-उत्सवांचे नियोजन | श्रीमती माधुरीताई देशपांडे |
| ४. | बालकल्याण | श्रीमती पुष्पाताई नडे |
| ५. | मूल्यशिक्षण | सौ. अद्वैता उमराणीकर |
| ६. | कविता कशा कराव्यात ? | सौ. हेमाताई लेले |
| ७. | बालकांविषयी पालकांशी संवाद | डॉ. सौ. अनघा लवळेकर |
| ८. | विज्ञानातील गमती-जमती | श्री. सुनिल कुलकर्णी |
| ९. | संगीत शिक्षण | श्रीमती गुळवणी ताई |
| १०. | सामाजिक सेवा एक श्रेष्ठ करियर | प्रा. शिरीष आपटे |
| ११. | पपेट शो प्रशिक्षण | सौ. संध्याताई साबणे |
| १२. | गणित अध्यापन | सौ. अंजली कार्येकर |
| १३. | प्रकल्पांची पूर्वतयारी | सौ. प्रिया कुलकर्णी |
| १४. | हस्तकला प्रशिक्षण | सौ. भडसावळे |
| १५. | कीर्तनातून बालशिक्षण | डॉ. प्रदीप आगाशे |
| १६. | शिक्षिका : बालआयुष्याच्या शिल्पकार | सौ. संगीता मावळे |
| १७. | हस्तकला (पिशव्या-परडी बनविणे) | कु. तेजश्री शिंदे |

### हार्दिक अभिनंदन

वर्धिनीच्या अभ्यासिकेतील खालील विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले –

१) **राकेश बुरा** चार्टर्ड अकाऊंटंट ही परीक्षा उत्तीर्ण.

२) **प्रशांत मुंढे** याचा बी.फार्मसी. मध्ये A.I.S.S.M. महाविद्यालयात प्रथम व महाराष्ट्रात ३४ वा क्रमांक.

**प्रत्येकाने सहन करायला हवं. सगळं काही सहन करा. न्याय देणारा ईश्वर आहे.**

# कार्यालय विभाग

**❖ असे रंगले चर्चासत्र -**

कार्यालय विभागातील सर्व कार्यकर्त्यांचे Who moved my cheese या पुस्तकाचे वाचन झाले. वाचनानंतर पुस्तकातील विविध प्रसंगावर चर्चासत्र घेण्यात आले. सर्व कार्यकर्त्यांनी आपली मते या चर्चासत्रामध्ये मांडली. काहींनी पुस्तकातील प्रसंगांना समांतर अशा आपल्या जीवनात घडलेल्या अनुभवांना उजाळा दिला. या चर्चासत्राचे संचालन वर्धिनीचे कार्यकारिणी सदस्य श्री. अविनाश जोशी यांनी केले.

**❖ दैवायत्तं कुले जन्म। मदायत्तं तु पौरुषम्।।-**

दि. ३१ मेच्या 'सकाळ' वृत्तपत्रातील बारावीच्या परीक्षेत ८१% गुण मिळविणाऱ्या कु. प्रदीप शिंदे या विद्यार्थ्याची बातमी वाचण्यात आली. या मुलाला जन्माला आल्यापासून फक्त आईच समोर दिसली. वडील कधी परागंदा झाले ते त्याला आठवतही नाही. तो ९ वीत असताना आईला कर्करोगाचे निदान झाले. सोबतीला कोणीही नातेवाईक नाहीत अशा परिस्थितीत त्याने आईची चार महिने सेवा केली. परंतु आई वाचू शकली नाही. अशा वेळी 'आपलं घर' या संस्थेने त्याला आधार दिला व तो १० वीची परीक्षा (कोणताही क्लास न लावता) ८५% गुणांनी पास झाला व यावर्षी तो १२ वीची परीक्षा ८१% गुणांनी पास झाला. या विद्यार्थ्याशी 'आपलं घर' या संस्थेत कार्यालयाने संपर्क साधला व त्याचे अभिनंदन केले. तसेच 'आपलं घर' या संस्थेतील कार्यकर्त्यांना व प्रदीप शिंदे या विद्यार्थ्यालाही 'स्व-रूपवर्धिनी'ची माहिती दिली. जर आपल्याकडे जिद्द असेल तर प्रतिकूल परिस्थितीतही अपेक्षित यश मिळविता येते हेच या उदाहरणावरून लक्षात येते. **दैवाच्या हाती कुणाच्या पोटी जन्म देणे, कशा परिस्थितीत जन्म देणे ही गोष्ट असेल पण माणसाने ठरवलं तर संपूर्ण प्रतिकूलतेच्या वातावरणात जन्माला आलेली व्यक्तीसुद्धा आत्मविश्वासाच्या बळावर पराक्रम घडवू शकते हेच प्रदीपच्या उदाहरणातून अधोरेखित झाले आहे.**



**❖ चित्रकला स्पर्धा -**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीदिवशी वर्धिनीच्या वास्तूत खुली चित्रकला स्पर्धा झाली. त्यामध्ये ९१ स्पर्धकांनी सहभाग घेतला. बरीच वर्षे खडू, रंग, ब्रश यांच्यापासून दूर राहिलेले हात चित्र रेखाटू लागले आणि विविध चित्रकृती साकारत गेल्या. मनातील रंगरेषा कागदावर उमटल्या आणि सर्वांचे चेहेरे निखळ आनंदाच्या रंगात रंगून गेले. स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी दुपारी २.००

**कुणी जर प्रत्येक गोष्टीत वाईटच पहात बसेल तर त्याला दु:ख होतं.**

वाजता माडगांवकर सभागृहामध्ये करण्यात आला. वर्धिनीमध्ये वेगवेगळ्या प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला. यावर्षी पहिल्यांदा कार्यालयामध्ये काम करणाऱ्या श्रीमती प्रगती विकास तांबट यांना स्मृतीचिन्ह देऊन कौतुक करण्यात आले. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. जयंत कवठेकर यांची उपस्थिती लाभली. तसेच वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे, श्री. सुनिल कुलकर्णी व श्रीमती पुष्पाताई नडे हे पदाधिकारी उपस्थित होते.

विजेत्या स्पर्धकांची नावे खालीलप्रमाणे -

१) सुहास धस,अभ्यासिका विभाग - प्रथम

२) पूजा गड्डम, सहायक परिचारिका वर्ग-द्वितीय

३) रविराज जाधव,स्पर्धा परीक्षा केंद्र - तृतीय

**उत्तजेनार्थ -**

१) मंजुश्री गायकवाड,स्पर्धा परीक्षा केंद्र - प्रथम

२) दामिनी पवार,प्रौढ साक्षरता वर्ग - द्वितीय

३) नजमा शेख, सहायक परिचारिका वर्ग-तृतीय

### ❖ रक्षाबंधनानिमित्त राखी बांधून केली गांधीगिरी -

राखीपौर्णिमेला कार्यालय विभागाने नागनाथ पार येथे एक अनोखा उपक्रम राबविला. ज्या रस्त्यावर प्रवेश बंद अशी पाटी असूनही जे नागरिक या नियमाचा भंग करत होते अशा सर्व नागरिकांना अडवून कार्यकर्त्यांनी त्यांना राख्या बांधल्या. **या उपक्रमातून त्या सर्वांना एकच सुचवायचे होते, वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे म्हणजेच स्वत:च स्वत:च्या प्राथमिक सुरक्षेची काळजी घेणे.** या उपक्रमाची दखल अनेक वृत्तपत्रांचे बातमीदारांनी घेतली.

### ❖ प्रशिक्षण वर्ग -

शनिवार, दि. १४-१२-२०१३ रोजी डॉ. अरुणाताई कौलगुड यांची 'कार्यालयीन प्रशासन' या विषयावर कार्यशाळा वर्धिनीच्या 'माडगावकर सभागृहा'त संपन्न झाली. कौलगुड यांनी एम.ए.अर्थशास्त्रात व पी.एच.डी. 'कॉर्पोरेट प्लॅनिंग' या विषयात केली आहे.

कौलगुड यांनी 'ससा कासव शर्यत' ही गोष्ट चार वेगवेगळ्या प्रकारे मांडून त्यातून **'आपले शक्तीस्थान ओळखा, स्पर्धकाच्या त्रुटी ओळखा, संघ करून जिंका व गुणांची बेरीज करून पुढे जा'** अशा गोष्टी सांगितल्या.

वक्त्यांनी आपल्या व्याख्यानात मांडलेले ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे -

१. संस्था म्हणजे कायद्याच्या अधीन राहून केलेल्या घटनेप्रमाणे चालणारा नोंदणीकृत संघ.

याला प्रशासन आवश्यक आहे.

२. माणूस हा परावलंबी, स्वावलंबी व परस्परावलंबी असतो.

३. संस्थेत विभाग व त्याच्या पद्धती असाव्यात. काम करताना खालील गोष्टी महत्त्वाच्या आहेत- १) कार्याचे नियोजन २) प्रशासन ३) अहवालीकरण ४) जाहिरात ५) हिशेब ६) आढावा ७) मनुष्यबळ व्यवस्थापन.

४) विभागाचे वा व्यक्तिगत नियोजन करताना ते संस्थेच्या ध्येय धोरणाशी सुसंगत असावे. त्यात काळ निश्चिती असावी. उद्दीष्ट हे साध्य करता येण्याजोगं, मूल्यमापन करता येणारं व मूर्तस्वरूप असावे.

५) आपले काम करीत असताना आपली वृत्ती, कार्यसंस्कृती महत्त्वाची. आपल्याला लोकांनी आपल्या कामामुळे लक्षात ठेवावे.

**दुसऱ्याच्या मनास लागेल असं अप्रिय सत्य कुणीही बोलू नये.**

## युवा विभाग

❖ **शिळीम सहल -**

जुलै महिन्याच्या पहिल्या रविवारी स्वामी योगानंद शाखेतील ४६ जुन्या युवकांची 'पावसाळी सहल' शिळीम या गावी गेली. पावसाचे थेंब अंगावर घेत, धबधब्याखाली मनसोक्त भिजण्याचा आनंद घेत सर्व युवकांना आपल्या बालपणाची आठवण झाली.



'स्वप्नउद्योग' या वर्धिनीतील युवकांनी चालवलेल्या संस्थेच्या पौड व कोळवण परिसरातील शिळीम येथील Agro tourism या प्रकल्पाच्या येथे ही सहल काढण्यात आली. यात सर्वांनी सुरुवातीला शाखेत खेळले जाणारे खेळ खेळले. नंतर शेजारी वाहणाऱ्या ओढ्यात मनमुराद भिजले. नंतर ग्रामीण भागातील भोजनाचा आस्वाद घेतल्यावर शाखेतील जुन्या आठवणींच्या गप्पांचा कार्यक्रम रंगला. कुणी गाणी म्हटली, कुणी किस्से सांगितले अशी एक वेगळी सहल झाली आणि सर्वांनी ठरविले की जुलै महिन्याच्या पहिल्या रविवारी आपण इथेच यायचे.

❖ **वाचन कौशल्य कार्यशाळा**

युवकांमध्ये वाचन कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने ऑक्टोबर महिन्यात वाचन कौशल्य कार्यशाळा झाली. महिन्यातील चारही रविवारी स. ९ ते १ या वेळेत ही कार्यशाळा वर्धिनीत घेण्यात आली. यामध्ये ३० युवक युवती सहभागी झाले होते. वाचन वेग, वाचलेले लक्षात ठेवणे, आकलन, शब्दसंग्रह या विषयांचा समावेश करण्यात आला होता. या कार्यशाळेत वाचनासंदर्भातील विविध खेळ घेण्यात आले. या कार्यशाळेसाठी श्री. राहुल कोकीळ, सौ. मानसी कोकीळ आणि सौ. जयश्री मांडके यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा समारोप 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाच्या अभिवाचनाने झाला.

❖ **व्यावसायिक युवक-युवती मेळावा -**

कोजागिरी पौर्णिमेला युवक-युवतींचा मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध सिने अभिनेते व लेखक श्री. गिरीश कुलकर्णी लाभले. श्री. कुलकर्णी यांनी त्यांच्या जीवनात अभिनयाची सुरुवात कधी झाली व कोणकोणते अनुभव त्यांना आले याबद्दल सर्वांशी संवाद साधला. त्यांच्या गाजलेल्या चित्रपटातील प्रसंगाबद्दलच्या गमतीजमती त्यांनी सांगितल्या. सृजनशीलता तसेच आत्मविश्वास या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी असून त्याच्या वाढीसाठी प्रत्येकाने प्रयत्नशील असले पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमात गिरीश कुलकर्णी यांची मुलाखत शिल्पा पोफळे यांनी घेतली. मार्गदर्शनानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. अभ्यासिका, शाखा विभाग व व्यावसायिक युवक-युवती असे एकूण १५० जण सहभागी झाले होते.

❖ **अन्य विशेष :**

● २३ नोव्हेंबला बालगंधर्वला 'नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान होण्यास योग्य की अयोग्य' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाला आपले १५ युवक सहभागी झाले होते.

**प्रत्येकाने काळजीपूर्वक जीवन घालवावं. केलेल्या प्रत्येक कर्माचं फळ तर मिळतंच.**

● १४ डिसेंबरला बालसाहित्यिक राजीव तांबे वर्धिनीत आले होते. यानिमित्ताने शाखांमधील प्रमुख युवकांसाठी त्यांच्या एका सत्राचे आयोजन करण्यात आले. यात त्यांनी शाखेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत कशी मैत्री करावी ? त्यांना समजून कसे घ्यावे ? यासंदर्भात युवकांशी गप्पा मारल्या.

● २८ डिसेंबरला भाग २ मधील युवकांसोबत श्री. सुमीत डोळे यांच्या गप्पांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री ९.३० ते १२ अशा वेळात हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये सुमीत डोळे यांनी त्यांच्या अहमदाबाद येथील दौऱ्याबद्दल माहिती दिली. या एकत्रीकरणाला १५ युवक जमले होते.

**❖ १६ डिसेंबर विजय दिवस**

बांगलादेश स्वतंत्र करून देण्यात भारतीय सैन्याचा मोठा वाटा होता आणि १६ डिसेंबर विजय दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने भाग २ मधील युवकांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी संरक्षण विषयाचे अभ्यासक श्री. प्रसाद बर्वे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात २० युवक सहभागी झाले.

**❖ चक्रव्यूह चित्रपट**

वर्धिनीतील काही युवकांचा गट गडचिरोली येथे नक्षलग्रस्त भागाचा अभ्यास करण्यासाठी जाणार आहे. यानिमित्ताने 'नक्षल' विषयाची प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी युवकांना 'चक्रव्यूह' हा चित्रपट दाखवण्यात आला. नंतर यावर चर्चाही घेतली गेली.

**❖ जय भीम कॉम्रेड**

समाजात तयार होत असलेली विषमता व त्याची जागरुकता ही आपल्या युवकांमध्ये असणे आवश्यक आहे. यासाठी या विषमतेचे भीषण चित्रण असणाऱ्या 'जय भीम कॉम्रेड' हा माहितीपट वर्धिनीत दाखवण्यात आला. यामध्ये सर्व शाखांमधील प्रमुख युवक-युवती, कार्यकर्ते-कार्यकर्त्या सहभागी झाल्या. माहितीपट दाखवल्यानंतर श्री. संजय तांबट यांनी या विषयाची माहिती दिली व त्यावर चर्चा घडवून आणली. यामध्ये युवकांनीही अनेक प्रश्न विचारले. नंतर श्री. संदीप मोरे व श्री. चंदन हायगुंडे यांनी नक्षल चळवळीबद्दल माहिती सांगितली तर श्री. निलेश धायरकर यांनी चळवळीतील गीताने या कार्यक्रमाचा समारोप केला.

### करूया मैत्री - वैदिक गणिताशी

*वर्धिनीचे संस्थापक सदस्य आणि भूतपूर्व कार्याध्यक्ष कै. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांचा 'वैदिक गणित' हा अत्यंत आस्थेचा विषय. त्यांचे पुत्र व वर्धिनीचे सभासद श्री. भूपेंद्रभाई यांनी कै. पुरुषोत्तमभाईंच्या स्मृतीप्रित्यर्थ वर्धिनीच्या शाखांवर 'वैदिक गणित प्रशिक्षण वर्ग' या वर्षी सुरू केले. त्यासाठी ख्यातनाम प्रशिक्षकांची रचना केली गेली. वैदिक गणिताच्या सूत्रांमुळे अत्यंत कमी वेळात होणारी गणिती प्रक्रिया वर्धकांमध्ये रुजू लागली आहे. याचा उपयोग परीक्षेतील गुणांबरोबरच व्यावहारिक जगामध्ये होताना सर्वजण अनुभवत आहेत. येत्या २ वर्षात सर्व शाखांवर हे वर्ग व्हावेत अशी योजना आहे.*

**इतरांशी कधीही कठोर शब्दांनी बोलू नये अथवा त्यांच्या दु:खाचं कारण होऊ नये.**

# आर्थिक स्थिती व आवाहन

'विकसित व्हावे, अर्पित होऊन जावे' या उक्तीप्रमाणे संस्थेअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या सर्व विभागांचा कार्यविस्तार आपण या अंकात वाचलात. या सर्व कार्यासाठी महत्त्वाचे असते ते आर्थिक बळ. संस्थेत वेळोवेळी आर्थिक विषयावर पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन या विषयातही खालील प्रयत्न सुरू केले.

- संपूर्ण संस्थेचे अंदाजपत्रक मार्च २०१३ मध्ये पूर्ण करून कार्यकारिणीत चर्चा करून निश्चित केले.
- प्रत्येक विभागाने अंदाजपत्रकाप्रमाणे सूक्ष्म नियोजन केले व त्याप्रमाणे दर महिन्याला अंदाजे खर्च किती येईल याचा आराखडा तयार केला.
- दर महिन्याच्या देणगीतून जमा तसेच खर्च याचा आढावा तयार करून त्याप्रमाणे कार्यकारिणीत वेळोवेळी माहिती सादर केली.
- आर्थिक गुंतवणूक समितीच्या बैठका घेऊन देणगीतून जमा झालेला निधी खर्चापूर्वी कसा वाढविता येईल याचा विचार करून गुंतवणूक केली.
- सर्व विभागातील खरेदी किंमतीप्रमाणे वर्गवारी करून कमीत कमी किंमतीत खरेदीसाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.
- संगणक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व विभागांना मागील ४ वर्षांपासून आजपर्यंत खर्चाची आकडेवारी उपलब्ध आहे.

**२०१२-१३ खर्चाची टक्केवारी -**

| | |
|---|---|
| शाखा विभाग | ४१% |
| महिला विभाग | १६% |
| बालवाडी | ११% |
| अभ्यासिका | १४% |
| स्पर्धा परीक्षा व अन्य कार्यालय व Admin | १८% |
| | १००% |

एकूण खर्च - ५०.७५ लक्ष रु.

२०१३-१४ अंदाज - ८५ लक्ष. यामध्ये युवक विभाग हा नव्याने सुरू झालेल्या कामाचा समावेश आहे. त्याचप्रमाणे कार्यविस्तारासाठी चऱ्होली व पानशेतजवळील कातवडी या ठिकाणी बहुआयामी प्रशिक्षण संकुल तसेच शिबीर स्थळाचा विकास करण्याचे ठरविले आहे. यासाठी ६० लक्ष रुपये यावर्षी खर्च होणार आहेत. तसेच पुढील ४ वर्षात १४ कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. आपणा सर्वांच्या सहाय्याने हे शक्य होणार आहे. यासाठी वर्धिनीने वेबसाईटवरून ई-ट्रान्स्फर, ऑनलाईन डोनेशन सेवा सुरू केल्या आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ECS (Electronic Clearance Service) सुविधेमार्फत आता इच्छुकांना दर महिन्याला आपल्या मिळकतीमधून ठरावीक रक्कम वर्धिनीच्या बँकेत जमा करता येईल. याची सर्व माहिती वर्धिनीत वेळोवेळी उपलब्ध असेल व त्याप्रमाणे देणगीच्या पावत्या आपल्यापर्यंत पोचविल्या जातील.

80G अंतर्गत प्राप्तीकरातील सवलत आता कायमस्वरूपी उपलब्ध आहे. 35AC अंतर्गत सवलतीचा कालावधी नोव्हेंबर २०१२ मध्ये संपल्यावर लगेचच त्यासाठीचा पुढील प्रस्ताव सरकारात दाखल केला आहे. ज्यावेळी 35AC सवलत पुन्हा लागू होईल त्यावेळी सर्व देणगीदार व हितेच्छुकांना कळविण्यास आम्हाला आनंदच होईल. याबद्दल अधिक माहिती वर्धिनी कार्यालय, दूरध्वनी तसेच E-mail व Website वर उपलब्ध होईल.

**प्रत्येकाने काम करणं आवश्यक आहे. केवळ कर्मानेच आपल्याला कर्मबंधनं तोडता येतात.**

## आठवणी दाटतात

- वर्धिनीचे हितचिंतक व पालक श्री. अशोक तावरे व श्रीमती सुमन बर्डीवाले यांचे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीचे देणगीदार श्री. मधुकरराव वैद्य यांचे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीच्या कार्यकारिणी सदस्या ॲड. नीलिमाताई गोखले यांच्या मातोश्रींचे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या सौ. मंजूषाताई कुलकर्णी यांच्या वडिलांचे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. सचिन शितोळे यांच्या वडिलांचे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीचे माजी कार्यालय प्रमुख व आपले कार्यकर्ते केदार भंडारे यांचे वडील श्री. चंद्रकांत भंडारे यांचे दु:खद निधन झाले. मरणोत्तर कोणतेही विधी न करता ती रक्कम त्यांची अंतिम इच्छा म्हणून वर्धिनीस अर्पण करण्यात आली.
- वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. चंदन हायगुंडे व कु. लिना हायगुंडे यांचे आजोबा श्री. नारायण हायगुंडे यांचे वृद्धापकाळामुळे निधन झाले.
- वर्धिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. जयंतराव कवठेकर यांच्या पत्नी सौ.विद्याताई कवठेकर यांचे दु:खद निधन झाले.
- वर्धिनीत अनेक वर्षे सेविकेचे काम करणाऱ्या श्रीमती ताराबाई खरात यांचे दु:खद निधन झाले.
- ज्येष्ठ पंचांगकर्ते, 'कालनिर्णय'चे सर्वेसर्वा व ज्येष्ठ समाजसेवक श्री. जयंत साळगांवकर यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.
- वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. मकरंद केळकर यांच्या मातोश्री श्रीमती वसुधा वसंत केळकर यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार त्यांचे नेत्रदान व देहदान करण्यात आले.
- वर्धिनीच्या परिवारातील युवक कार्यकर्ता श्री. पराग मुतालिक यांचे पिताश्री श्री. जयंत मुतालिक यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. निवृत्तीनंतर काकांनी आपला संपूर्ण वेळ वर्धिनीत कार्यालयीन कामासाठी दिला. वर्धिनीत कोणतेही काम ते मोठ्या उत्साहाने आणि प्रामाणिकपणे करीत. उतारवयातही त्यांचा उत्साह हा नवयुवकाला लाजवेल असा होता.
- रमणबाग शाळेचे माजी मुख्याध्यापक व दरवर्षी वर्धिनीच्या विशेषांकाचे काव्य स्वरूपात कौतुक करणारे वर्धिनीचे हितचिंतक श्री. अरविंदराव हर्षे यांचे दु:खद निधन झाले.

**विनम्र श्रद्धांजली**

समाजातील अंधश्रद्धा दूर व्हावी या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन काम करणारे **डॉ. नरेंद्र दाभोळकर** यांची दुर्दैवी हत्या झाली. या घटनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करत आहोत आणि डॉ. दाभोळकरांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून आदरांजली अर्पण करत आहोत.

**मृत्यू केव्हा येईल हे माहीत नसल्याने विशिष्ट वेळेची वाट पहात न बसता संधी मिळाली की पवित्र हेतू पार पाडण्यास चुकू नका.**

## दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

शाखा विभागप्रमुख- श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२

### ग्रामीण शाखा

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | ग्रामीण शाखा | रामेश्वर विद्यालय, मु. पो. विंग ता. खंडाळा, जि. सातारा | **अमोल लोखंडे** ✆ : ७७०९६४२१०१ |

### भाग १ (शहर विभाग)

भागप्रमुख : श्री. चेतन पैलवान ✆ : ९८८१२३०३०२

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | समर्थ रामकृष्ण शाखा | बाबुराव सणस कन्याशाळा, २२/१, मंगळवार पेठ, पुणे - ११. | **कु. हरीष मिसाळ** ✆ : ९६२३५५६२८४ |
| ॐ | स्वामी योगानंद शाखा | एम. ए. एस. भावे हायस्कूल, सदाशिव पेठ, पुणे - ३० | **कु. वेदांग बेहेरे** ✆ : ९७६२१५२५२८ |
| ॐ | स्वामी श्रद्धानंद शाखा | म. गांधी विद्यालय घोरपडे पेठ, पुणे - ४२ | **कु. शुभम जगताप** ✆ : ९५९५२१२६४४ |
| ॐ | वीर अभिमन्यू बालशाखा | 'स्व'-रूपवर्धिनी वास्तू २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११ | **कु. प्रवीण कदम** ✆ : ९०११०३८८२४ |

### भाग २ (बिबवेवाडी विभाग)

भागप्रमुख : श्री. उमेश बिबवे ✆ : ७३५०५०९९९०

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी अखंडानंद शाखा | सिताराम आबाजी विद्यालय, बिबवेवाडी, पुणे - ३७ | **कु. चेतन ठाकरे** ✆ : ८६२५०५८९४२ |
| ॐ | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर, पुणे - ३७ | **कु. मयूर देशमुख** ✆ : ७२७६४०१४२२ |
| ॐ | स्वामी शिवानंद शाखा | कै. वि. स. खांडेकर शाळा सहकारनगर, पुणे-९. | **कु. पवन पवार** ✆ : ९५९५१८४८४१ |
| ॐ | धर्मवीर शंभू राजे शाखा | प्रेरणा माध्यमिक विद्यालय, गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | **श्री. विशाल शिंदे** ✆ : ९५२७५१९२४७ |

**तुम्ही ज्याचं रक्षण कराल ते तुमचंही रक्षण करील.**

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. मयूर शेडगे,** ✆ : ७७९८११४४८४

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी सुबोधानंद शाखा | पंडित दिनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे - ५२ | कु. गजानन केंडे ✆ : ९७६३०५०५२६ |
| ॐ | स्वामी ब्रह्मानंद शाखा | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे - ५१ | कु. प्रतीक जाधव ✆ : ९९२३२०६०७० |
| ॐ | राजर्षी शाहू शाखा | सम्राट अशोक विद्यालय, कर्वेनगर, पुणे - ५२ | श्री. अशोक इंगवले ✆ : ९८८१५५८१८० |
| ॐ | नरवीर तानाजी मालुसरे शाखा | कै. बंडुजी खंडुजी चव्हाण विद्यालय, धायरेश्वर मंदिराजवळ, धायरी. पुणे ४१ | कु. प्रथमेश मातेरे ✆ : ९७६२१७२३१३ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : कु. चेतन कुसाळकर** ✆ : ९८८१४४४९६१

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | स्वामी विवेकानंद शाखा | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-१६ | कु. अभिजित दोडके ✆ : ९९७५६५६३१६ |
| ॐ | स्वामी अभेदानंद शाखा | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - १६ | कु. सागर मोहिते ✆ : ८६९८०१९६०९ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : कु. लिना हायगुंडे** ✆ : ९९६०१७९५६४

| | शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|---|
| ॐ | भगिनी निवेदिता शाखा | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११ | कु. त्रिशाला शासम ✆ : ८७९३०७८५४९ |
| ॐ | भवानी पेठ मुलींची शाखा | लहुजी वस्ताद शाळा, जन. अरुणकुमार वैद्य स्टेडियमजवळ, भवानी पेठ, पुणे - १६ | कु. सरोज शिंदे ✆ : ८८०५१४१२९४ |
| ॐ | घोरपडे पेठ शाखा | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२ | कु. तेजश्री शिंदे ✆ : ९५४५३७०१७९ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६ ते ८.३०, शनिवार- दु. ४.३० ते ७.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

**वस्तूचे किंमतीवरून वस्तूचे महत्त्व मापायचे असते का ?**
**ज्या प्रेमानं आणि भक्तीनं वस्तू दिली जाते तेच महत्त्वाचे.**

## शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

महिला विभाग सहाय्यक – **सौ. सुनिता गंगावणे**

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. शामला टापरे**

बचतगट समन्वयक – **सौ. उषाताई पोफळे**

❖❖❖

## उद्योगशिक्षण वर्ग

१) सहायक परिचर्या (पुणे वर्ग) – **सौ. विजयालक्ष्मी कुलकर्णी, सौ. लता सत्तूर**
   सहायक परिचर्या (आंबवणे वर्ग, नसरापूर) – **सौ. शशिकला विटेकर**
   सहायक परिचर्या (माले वर्ग) – **सौ. नंदाताई बेंडखळे, सौ. साधना सातपुते**

२) शिवण वर्ग (पुणे) – **सौ. संगिता पाटील**
   शिवण वर्ग (विंग) - **सौ. कमलताई तुपे, सौ. संगीता कोंडेकर**

३) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

❖❖❖

## प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**

सौ. मनिषाताई नरडेकर (०२०–२६१२१७०४)

**अभ्यासिका केंद्र**

श्री. निलेश धायरकर (९०२९०७४५२१)

**ग्रंथालय**

श्रीमती नीलाताई कुडलिंगार (०२०–२६१२१७०४)

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

**पुणे मनपा शिक्षण मंडळ आणि 'स्व'–रूपवर्धिनी संचालित संयुक्त अभ्यासिका केंद्र**

सरदार कान्होजी आंग्रे विद्यालय,

शुक्रवार पेठ – श्री. वसंतराव भिडे ✆ : (०२०) २४४७१५०८

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

**तुम्ही जर शुद्ध अन्न खाल्लंत तर तुमचं रक्त शुद्ध होईल व मन शुद्ध होत जाईल. बल निर्माण होईल. शुद्ध मनात शुद्ध भक्ती उपजते, प्रेम उत्पन्न होतं.**

## असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र)– प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र – प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
९) बचतगट
१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळांमध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

सौ. मेघा नडे-नगरे

**कार्यालय विभाग**

कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
श्री. अशोकराव चिपळूणकर, श्री. श्रीकृष्ण साठे, कु. निरंजन अभंग, कु. दत्ता तुपे
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**प्रत्येकाने आपल्या आईची सेवा केली पाहिजे.**



## प्रार्थना



नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।



हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३ ।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

लज्जा हेच स्त्रियांचं भूषण आहे.

With Best Compliments From

**PROTOTYPE ENGG. CO.**

*Govt. Approved Valuers for Plant Equipment/Machinery Consulting / Chartered Engineers*

Tel. : 22662496, 22631214,
Cell :9820302436

E-mail : vijayswar@hotmail.com

**नील इंजिनियर्स**

*सिव्हील इंजिनियरींग, वॉटर अॅण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस*

**श्री पराग लकडे**

फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

ब्लॉक नं १०, युनिट नं. २
सद्‌गुरु जंगली महाराज सोसायटी
सेनापती बापट रोड,
पुणे ४११ ०१६

With Best Compliments From :

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.**

Plot No. 4, S. No. 17/1-B,
Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune 411 038
Ph : 25431474, 25441124,
25464551
E-mail : adept@vsnl.com

**'निरामय'**
**योग चिकित्सा केंद्र**

**सहवास कॉर्नर बस स्टॉप समोर,**
**कर्वेनगर, पुणे ४११ ०५२**

**श्री. केदार पारगावकर**
**मोबा. ९८८१२ ०२०७०**

फूल देवतेला अर्पण केलं तरच त्या फुलाचं सार्थक.
नाहीतर ते तसंच झाडावर सुकून गेलेलं बरं.

*With Best Compliments From*

## THE POONA MOTOR GOODS TRANSPORT

***Fleet-Owners & Transport Contractors***
***Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa***
***Full truck load service for Maharashtra & Gujrath State***

❖ ❖ ❖

**Head Office :** 780, Sadashiv Peth, Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ **Branch** ❖

137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.
Phone : 27656925, 27656935

❖

13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi, Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210

❖

Ramraj Yadav Chal, Gala No. 2, 90 Ft. D.P. Road, Sakinaka,
Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072, Phone : 28513018

CHEM-TECH

**With Best Compliments From**

## *M/s. Chemtech Laboratories Pvt. Ltd.*

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex, Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com

कर्मापासूनच सुख-दुःखं सर्व येतं.

## संपदा सहकारी बँक लि.,पुणे

मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२
दूरध्वनी क्र. २४४३३१५५, २४४९३२६१
ई-मेल : sampadabank@rediffmail.com

ऑडिट 'A' वर्गातील लाभांश देणारी बँक

* उद्योजक व व्यापारी बंधूंसाठी स्पर्धात्मक व्याजदराने कर्ज.
* कर्ज प्रकरणांची जलद छाननी व मंजुरी.
* त्वरित सोने तारण कर्ज उपलब्ध.
* आयकर, सर्व्हिस टॅक्स व व्हॅट इ. कर ऑन-लाईन भरण्याची सुविधा.
* RTGS / NEFT द्वारे त्वरित पैसे पाठविण्याची सोय.
* CBS द्वारे कोणत्याही शाखेतून व्यवहार.

**सुभाष रावळ** – मुख्य कार्यकारी अधिकारी
**अश्विनीकुमार उपाध्ये** – उपाध्यक्ष
**सीए विवेक मठकरी** – अध्यक्ष



## प्लास्टिकचा पुनर्वापर ही आपली जबाबदारी आहे

प्लास्टिकचा पुनर्वापर म्हणजेच पर्यावरणाचे रक्षण...

**NICHROME**
Packaging Solutions

PACKAGING INTEGRATION SERVICE SINCE 1977

**NICHROME INDIA LTD.**
Safire Park Galleria, 4, Pune-Mumbai Road, Shivajinagar, Pune-411 005, India.
**Tel. :** +91-20-6601 1001 | **Fax :** +91-20-6601 1010
**E-mail :** marketing@nichrome.com | **www.nichrome.com**

Packaging Solutions For • Liquid • Grains • Powders • Seeds • Snacks • Pharma • Personal Care


**ज्याचं मन पवित्र असते त्याला सगळे काही पवित्रतच दिसते.**

*With Best Compliments From*

# M/S KBC Systems

- Cold Storage and Refrigeration Engineers
- Manufactures of Surface Coating Systems
- Authorized Distributor for TTK Healthcare Ltd. Panipuri and other Fryums product for Maharashtra

**Vijay Bane** 9422301700

**Satish Chapekar** 9422031071

## हार्दिक शुभेच्छा !

# मनकर्णिका

केवढे तुम्ही भाग्यवान की, तुम्हाला मानवदेह मिळाला.
जितकी अधिक करता येईल तितकी परमेश्वराची प्रार्थना करा.

*With Best Compliments From*

# DECENT DECORATORS

***PROTECTIVE AND DECORATIVE PAINTING***

✣ ✣ ✣

# GURUPRASAD CONTRACTORS

***CIVIL ENGINEERS AND CONTRACTORS***

✣ ✣ ✣

# PRODUCT COATING

***SHELL CORE AND ASSEMBLIES***

***AN ISO 9001 : 2000 CERTIFIED COMPANY***

✼✼✼

# JANSEVA BHOJANALAYA

***AUTHENTIC MAHARASHTRIAN THALI***

✣ ✣ ✣

# MEHFIL CATERING SERVICES

***ALL TYPES OF CATERING SERVICES***

✣ ✣ ✣

# *HARSHAL HALL*

***Two Specious Marriage Halls With All Amenities***


**तुम्ही खूप परिश्रम केले पाहिजेत. श्रम केल्याविना कोणतीही गोष्ट मिळणे कठीणच असते.**




कर्मापासूनच सुख–दुःखं सर्व येतं.

*With Best Compliments From*

# M/S. D. PRATAP


## *IRON MERCHANTS*

***DEALERS IN BEAM, CHANNELS, ANGLES, SHEETS & PLATES***

**1196, BHAWANI PETH,**
**PUNE 411 042.**

- **TEL. : 26353585, 26353595 (Office)**
- **2426 4847 (Residence)**

ऐहिक कार्यात तुम्ही गुंतला असला तरी प्रार्थनेसाठी आणि
अध्यात्मिक साधनेसाठी तुम्ही रोज काही तरी वेळ राखून ठेवलाच पाहिजे.




परमेश्वराच्या चरणकमली आपले मन केंद्रित करणे आणि परमेश्वराच्या विचारात मग्न होणे हीच अध्यात्मसाधना होय

*With Best Compliments From*

BS

# LANDMARK
DEVELOPERS

"KRUTANJALI"
65/20, ERANDAVANA,
SHANGRILA RESTAURANT LANE,
LAW COLLEGE ROAD,
PUNE - 411 004
TEL. : (020) 2543 3200 / 2543 3000
FAX : (020) 2543 2300
E-MAIL : kbaldota@rediffmail.com


ईश्वर दर्शन म्हणा, ध्यान म्हणा–सारं मनावर आहे. मन स्थिर झालं म्हणजे सर्व होतं.

NIRMAL
















# NIRMAL WATER SYSTEM AND SERVICES

**Reverse Osmosis Plant | Water Softening Plant | Demineralization Plant | Sand Bed Filter**
**Activated Carbon Filter | Effluent Treatment Plant | Sewage Treatment Plant | Cooling Tower Chemicals**

**Corporate Office :** Shop No.003, Plot No. 12, Karishma CHS, Near Bhawani Chowk, B-Cabin Road, Ambernath (E), Dist : Thane - 421 501
**Phone :** (0251) 6481958, 9326884736, 9923134736, 9324284736
**Email : nirmalwater@hotmail.com | sales@nirmalwater.com | Web : www.nirmalwater.com**

**मंत्र तंत्र हे काहीच नाही. भक्तीच सर्व काही आहे.**

# अर्थसहाय्य इथून घ्यावे... सुखी, समृद्ध, संपन्न व्हावे !



**विविध कर्ज योजना**
- जनता गृहकर्ज योजना
- जनता गृहोपयोगी वस्तू खरेदी योजना
- जनता वाहन कर्ज योजना
- जनता सोने कर्ज योजना
- रेंट डिस्काउंटिंग कर्ज योजना

**विविध लाभदायक ठेव योजना**
- जनहित ठेव योजना • चिरंजीव ठेव योजना • स्वधन ठेव योजना

**अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा**
- नेट बँकिंग • एनी ब्रँच बँकिंग • एसएमएस बँकिंग • टेलि बँकिंग • एटीएम सुविधा • डिमॅट सुविधा
- ॲट पार चेक सुविधा • म्युच्युअल फंड सुविधा • लाईफ इन्शुरन्स व जनरल इन्शुरन्स
- फ्रँकिंग सुविधा • पॅन कार्ड सुविधा • पर्सनलाईज्ड चेकबुक • NEFT व RTGS सुविधा

*अटी व नियम लागू

**I.S.O. 27001 आणि I.S.O. 9001 प्रमाणित डेटा सेंटर असलेली सहकारी बँक**

## जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे २. फोन : २४४५३२५८, २४४५३२५९
फॅक्स : ०२० - २४४५३४३० email : jsbho@vsnl.com www.janatabankpune.com


**भगवत् तत्त्वाची चर्चा करता करता तत्त्वज्ञानाचा उदय होतो.**



माझी योजना म्हणजे भारतातील या सामान्य जनतेपर्यंत पोहोचावे अशी आहे. असे समजा की सर्व भारतभर तुम्ही गरिबांच्याकरिता शाळा सुरू केल्या, पण तरीही तुम्ही त्यांना शिक्षण देऊ शकणार नाही. ते कसे तुम्हाला शक्य आहे ? कारण ४ वर्षांचा मुलगा तुमच्या शाळेत येण्यापेक्षा, नांगर धरणे अगर दुसरे काही काम करणे हे अधिक पसंत करील.... पण तेच जर शिक्षणासाठी येऊ शकत नसतील, तर मी म्हणतो, शिक्षणाने त्यांच्याकडे का जाऊ नये ?

**- स्वामी विवेकानंद**

**माझे मूल जर चिखलाने भरले किंवा धुळीत लोळले तर धावत जाऊन त्याला उचलणे, स्वच्छ करणे आणि मांडीवर घेणे हे माझे कर्तव्यच नाही का ?**

# With Best Compliments from

autohangar 15 YEARS
PARTNERING MERCEDES-BENZ


**Prabhadevi**: Ground Floor, Electric Mansion, Appasaheb Marathe Marg, Mumbai - 400 025. Tel.: (022) 6743 4360/61/62/63/64

**Andheri (W)**: Kotia Nirman, Ground Floor, Off New Link Road, Mumbai - 400 053.Tel.: (022) 6710 6660/1/2/3

**Hughes Road (Off Marine Drive)**: Metro Motors Auto Hangar Division, Motor House, Ground Floor, 66 Hughes Road, Mumbai - 400 007. Tel.: (022) 6612 3500

- **Email: info@autohangarindia.com**
- **Website: www.autohangar.com**

'SWA'-ROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR / 2007 / 26609 24 / 12 / 2008
Concessional postage under Regd. No. PNCW / M-137 / 2014-2016
DT. of Publication - 25th every month
Dt. of Posting - at PSO Kasba Peth, Pune on 25th of every month




हे मासिक 'स्व'रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग. १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११ येथे प्रसिद्ध केले